# माणूस



२५ पैसे

१५ मार्च १९६५



# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

## तिसरी सचित्र आवृत्ती

## प्रसिद्धी : अक्षय्य तृतिया शके १८८७

पूर्वग्राहक व ठेवीदार यांना
प्रसिद्धीनंतर लगेच ग्रंथ पाठविला जाईल.

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.



# रंगभरी होळी

महाराष्ट्रात आपण रंगोत्सव साजरा करतो तो रंगपंचमीच्या--फाल्गुन वद्य पंचमीच्या दिवशी. परंतु मुळात होलिकोत्सवाचाच हा भाग आहे. या सणाची प्राचीनता इसवी सनापूर्वी काही शतकांइतकी मागे जाते. पूर्वमीमांसासूत्रांवरील शबरभाष्य, न्यायमालाविस्तर, वात्स्यायनाची कामसूत्रे इत्यादी ग्रंथांतून या उत्सवास 'होलाका' या नावाने संबोधिले आहे. 'ज्या उत्सवात लोक शिंगांच्या पिचकाऱ्यांतून परस्परांवर रंग उडवितात आणि सुगंधी चूर्णे फेकतात असा उत्सव म्हणजे 'होलाका' असे या उत्सवाचे वर्णन वात्स्यायनाने केलेले आहे. शिशिराची समाप्ती सुचविणारा आणि वसंतोदयाची प्रकाशमय प्रसन्नता घोषित करणारा हा उत्सव गेली दोन-अडीच हजार वर्षे भारताच्या सर्व भागांत चढत्यावाढत्या उत्साहाने साजरा होत आलेला आहे. हा उत्सव साजरा करण्याची पद्धती आणि उत्सवाच्या दिवसांची संख्या प्रांतोप्रांती वेगवेगळी आढळते. मदनाचा सखा असलेल्या वसंताचा स्वागतसोहळा प्रणयरंगाने रंगविण्यासाठी लोक गुलालाची आणि सुगंधी चूर्णांची उधळण मुक्तपणे करतात. उत्तर भारतातील लोकवाङ्मयांत आणि संतवाङ्मयांत ही 'रंगभरी होली' प्रसन्नतेने साजरी झालेली आढळते.

—रा. चिं. ढेरे



वर्ष चौथे : अंक पंधरावा

★

१५ मार्च १९६५ : पंचवीस पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २

★

दूरध्वनी : ५७३५९

# या अंकांत

व्यक्ती आणि वार्ता : ● 'मराठी रंगभूमी दर्शन'कार
□ श्री. देशमुख

कथा : ● टॉवर ऑफ सायलेन्स
□ श्री. भा. श्रोत्री

● कमल
□ जीवन बोरले

कविता : □ शरद गजानन वाघ
□ कुमुदिनी आपटे
□ शरद साटम

ललित लेख : ● अक्का आजी
□ विद्याधर भागवत

लेख : ● विवाह व पत्रिकामेलन
□ श्री. के. केळकर

पुस्तकपरिचय : ● नाझी भस्मासुराचा उदयास्त
□ रा. म. शास्त्री

शिवाय : ● जगाच्या पाठीवर, दिल्ली दरबार,
रंगभूमी, चित्रपट, क्रीडा, विनोद
ही नेहमीची सदरे

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे
चालक सहमत असतीलच असे नाही.

ब. मो. पुरंदरे

यांचे

ऐतिहासिक कथावाङ्मय

• शिवचरित्रविषयक

लाल महाल

प्रतापगड

पन्हाळगड

राजगड

पुरंदर

आग्रा

• पेशवेकालीन कथा

मुजऱ्याचे मानकरी

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

# ४० हजार बिस्किटांचा आनंद !!

चीनमध्ये 'चिरक्रांती' चा ( Permanent Revolution ) प्रयोग सुरू आहे. 'साम्यवादी जगा'चा ध्येयवाद चौथ्या पिढीच्या कानामनापर्यंत नेऊन बिंबवल्याशिवाय तो वज्रलेप झाला असे चिनी नेते—विशेषत: माओ—मानीत नाहीत. भारतात 'चिरदास्या'चा (Permanent Slavery) प्रयोग सुरू असावा असे एकूण इथले राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक वातावरण आहे. मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या एका दैनिकाच्या पहिल्याच पानावर नुकतेच येऊन गेलेले हे छायाचित्र पाहा. पावबिस्किटांचे चार तुकडे आमच्या लहान मुलांना, भारताच्या भावी आधारस्तंभांना वाटले जात आहेत. बातमीत म्हटले होते, "मुंबई महापालिकेच्या २५ शाळांतील मुलांना ४० हजार बिस्किटे आज वाटण्यात आली, तेव्हा त्या मुलांना झालेला आनंद **अवर्णनीय** होता." वाटप करणाऱ्या बाई अर्थातच अमेरिकन आहेत. कोवळ्या वयाच्या मुलांवर संस्कार कोणते, तर कोणापुढे तरी हात पसरण्याचे, कोणाकडून तरी मिळणाऱ्या चार तुकड्यांवर 'अवर्णनीय' आनंद मानण्याचे. पाचपंचवीस वर्षांपूर्वी जेव्हा हा देश परतंत्र होता, खेडीपाडी दारिद्र्यात पिचत होती, तेव्हाही कितीतरी 'श्यामच्या आया' आपल्या 'श्यामां' ना कुणापुढेही हात पसरू देत नसत. पसरला तर हाताला डाग देत असत. आज ते 'श्याम' ही गेले, त्या 'आया'ही गेल्या. त्यांच्या सिनेमांना फक्त राष्ट्रपती-पारितोषिके मिळतात. देशात मात्र घुडगूस चालतो भिकेच्या सोहोळ्यांचा, 'हात पसरण्याच्या' समारंभाचा.

### मदत आणि भीक

आर्थिक विकासासाठी, आक्रमणाच्या प्रतिकारासाठी मदत घेणे वेगळे आणि ही लाचारी वेगळी. मदत ही उभयपक्षी स्वार्थसाधनासाठी असते व त्यामुळे लाचारी निर्माण होण्याचे काहीच कारण नसते. लाचारी वाढते, याचे कारण आपण कोण आहोत, आपल्याला कुठे जायचे आहे याचे अज्ञान असते. आत्मविश्वासाचा पूर्ण अभाव असतो, यामुळे. १९४१ सालची गोष्ट आहे. हिटलरच्या फौजांनी मॉस्कोपर्यंत धडक मारली होती. स्टॅलिन उभा होता, पण मोठ्या पेचात सापडला होता. हयातभर ज्या अमेरिकेची 'भांडवलशाही देश' म्हणून भरपूर निंदानालस्ती केली त्याच देशाकडून मदत स्वीकारण्याचा प्रसंग आला. पण स्टॅलिनची दादागिरी काही कमी होईना. ॲव्हरिल हॅरिमन हे अमेरिकेचे प्रतिनिधी मॉस्कोत मदतीच्या वाटाघाटींसाठी आले असता स्टॅलिनने त्यांच्यापुढे एक भली प्रचंड यादी टाकली. तीत विमानांपासून




● पारतंत्र्याचे बाळकडू

टेलिफोनपर्यंत सर्व वस्तू होत्या. रणगाड्यांच्या चिलखती पत्र्यासाठी लागणारे पोलाद हॅरिमन कमी देत होते (एक हजार टन). स्टॅलिन खवळून म्हणाला, " जो देश पाच कोटी टन पोलादाचे उत्पादन करतो त्याने केवळ एक हजार टन देऊ करणे म्हणजे मदतीची चेष्टा आहे." पोलाद, विमाने, रणगाडे वगैरे भारी माल तर स्टॅलिनने दांडगाई करून मिळवलाच. पण अगदी बुटांचे जोडही मागण्यास त्याने कमी केले नाही. ४ लक्ष बुटांचे जोड अमेरिकेने रशियाला यावेळी दिल्याची कागदोपत्री नोंद आहे. पण या मदतीची जाहीर प्रदर्शने केल्याची नोंद मात्र कुठे सापडत नाही. काय हरकत होती, हॅरिमन यांच्या सुपत्नी एका सैनिकास बुटाचा एक जोड देत असल्याचा एखादा 'भावपूर्ण' समारंभ घडवून आणण्याची ! पण स्टॅलिनला 'संस्कारां'चे महत्त्व कळत होते, राष्ट्राचा स्वाभिमान कसा जागवावा,

फुलवावा याची राजविद्या त्याला अवगत होती.

याच स्टॅलिनने, आणि नंतर क्रुश्चेव्हने मोठ्या प्रमाणावर चीनला मदत दिली. पण चीन लाचार बनला नाही. उलट अणुगुपिते रशिया देत नाही हे पाहिल्यावर रशियावरच उलटण्यास त्याने मागेपुढे पाहिले नाही.

तेव्हा मदत देण्याचा किंवा स्वीकारण्याचा हा प्रश्न नाही. प्रश्न आहे, ती पचवण्याचा, राष्ट्रीय स्वाभिमान आणि स्वातंत्र्य यांच्या जाणीवेतून ती वापरण्याचा. ही जाणीव नसेल तर मदत ही भीक ठरते. लाचारी आणि भिवेपणा यांव्यतिरिक्त त्यातून काही निष्पन्न होत नाही.

## नासरही अधिक स्वतंत्र !

नुकतेच नासरच्या बाबतीत घडलेले एक उदाहरण. अॅडनॉवर प. जर्मनीचे चॅन्सेलर असताना त्यांनी इस्रायलशी शस्त्रास्त्रांबाबत एक गुप्त करार केला होता. पुढे अॅडनॉवर गेले व करार पूर्ण करण्याची जबाबदारी नवीन चॅन्सेलर एरहार्ड यांचेवर आली. त्यांनी त्याप्रमाणे शस्त्रास्त्रांचा पहिला हप्ता पाठविला. इजिप्तला याचा सुगावा लागला व नासरने प. जर्मनीला धडा शिकविण्याचे ठरविले. कारण इस्रायल आणि इजिप्त यांचे हाडवैर. नासरने प. जर्मनीचा हाडवैरी पूर्व जर्मनीचा अध्यक्ष वॉल्टर उल्रिच याला इजिप्त–भेटीचे निमंत्रण पाठविले. आता पूर्व जर्मनीला इजिप्तने मान्यता दिली तर त्या देशाशी प. जर्मनीला संबंध तोडणे आलेच. तेव्हा एरहार्ड यांनी स्पेनमार्फत मध्यस्थी सुरू केली व नासर यांनी वॉल्टर उल्रिच यांना पाठविलेले निमंत्रण रद्द करावे, बदल्यात प. जर्मनी इस्रायलला यापुढे शस्त्रास्त्र न पाठविण्याचे आश्वासन देईल, अशी माघार घेतली. नासर तरीही बधेना. तेव्हा 'प. जर्मनी इजिप्तला जी आर्थिक मदत देत आहे ती सर्व बंद केली जाईल', अशी एरहार्ड यांनी धमकीची भाषा चालू केली. नासरने यालाही भीक घातली नाही. त्याने कळविले, 'खुशाल बंद करा. यात इजिप्तपेक्षा प. जर्मनीचेच नुकसान जास्त आहे. कारण मदत काही फुकट घेत नाही. भरपूर व्याज आमच्याकडून प. जर्मनीला दिले जात आहे.' इजिप्तएवढी देखील स्वायत्तता आमच्या या विशाल देशाला असू नये ? आमचे अर्थमंत्री प. जर्मनीला गेले तेव्हा त्यांची साधी भेट घेण्यासही या एरहार्डला वेळ नव्हता म्हणे ! आणि हे पं. नेहरू हयात असताना घडले ! आता तर काय आनंदच आहे. टिचभर सिलोनची मुख्यमंत्रीणही आमचा खिसा सहज कापून जाते. व्हॅटिकनचा पोप आला तर आमचे राष्ट्रपती दिल्लीहून मुंबईला धावतात तर इतरांची काय कथा ! कितीही परकीय मदत मिळाली आणि धान्याच्या बोटी मागवल्या तरी अशा मार्गाने कधीही हा देश स्वतंत्र आणि स्वायत्त होणार नाही. कारण स्वातंत्र्याचे, स्वायत्ततेचे, स्वाभिमानाचे संस्कारच येथे होत नाहीत. येथे संस्कार आहेत ते उदंड लाचारीचे, पराधीनतेचे. ज्यावर अवलंबून राहायचे तो मालक दर वेळेला निराळा असेल; पण भाटगिरी तीच, पोपटपंची तीच. –श्री. ग. मा.



## दिल्ली दरबार

# □ लालकिल्ला सजीव होत आहे

सुमारे एक महिन्यापूर्वी दिल्लीचे सरकार एकदम खडबडून जागे झाले असा भास झाला होता. संसदेचे अधिवेशन चालू होताच अर्थमंत्री श्री. टी. टी. के. यांनी भयसूचक घंटा वाजविण्याच्या थाटात घोषणा करून ठेवली की, भारताची विदेशांतील गंगाजळी (फॉरिन एक्स्चेंज रिझर्व्ह) गेल्या पंधरा वर्षांत इतक्या कमी पातळीवर कधीच येऊन ठेपली नव्हती. [ १२ फेब्रुवारीला ही गंगाजळी अवघी रु. ७९ कोटी आहे, असा अचानक शोध लागण्याजोगी भाषा सध्या चालू झालेली आहे. ] ही गंगाजळी निदान रु. १०० कोटींच्यापेक्षा अधिक पातळीवर नित्य राहिली पाहिजे, असा आजपर्यंतचा अलिखित संकेत आहे. ही गंगाजळीची पातळी कमी झाली की, "विदेशांत भारताविषयी चिंतेने चर्चा चालू होते की 'आर्थिक क्षेत्रांतही भारतात दिवाळखोरी दिसू लागणार की काय ?' अर्थात् ही विदेशांतील गंगाजळीची पातळी (लेव्हल) वाढवावयाची असेल तर निर्यात कमी करा व आयात वाढवा, अशा घोषणा उच्चरवाने चालू झालेल्या आहेतच. शिवाय, भारतात विदेशी पाहुण्यांची वर्दळ वाढवा म्हणजे विदेशी नाणी (चलन) अधिक प्राप्त होईल, हा सूरही तार-स्वरात सध्या ऐकू येऊ लागलेला आहे. भारताला प्रतिवर्षी या विदेशी पाहुण्यांमुळे सरासरी सुमारे २० कोटींचे विदेशी चलन प्राप्त होते. तेव्हा यात भर पडली की, विदेशांतील गंगा-जळीची पातळीही वाढेल, असा आशावाद व्यक्त होत आहे. विदेशी पाहुण्यांची आयात वाढेल कशी, भारताकडे ते अधिकाधिक कसे आकृष्ट होऊ शकतील, त्यांना कोणत्या अधिक सवलती व सुखसोयी उपलब्ध

करून देणे शक्य आहे, अन्य देशांत ‘ हिल्टन ’ (अमेरिकन छाप) थाटाची आलिशान हॉटेल्स प्रस्थापित झाली आहेत, तशी भारतातही प्रस्थापित करावीत का, या पाहुण्यांसाठी दारुबंदी नियम सैल करता येतील का, या विदेशी मंडळींसाठी विशेषरीत्या ‘ रंगीन रात्री ’ (नाईट क्लब) सादर करणे इष्ट होईल का आदी प्रश्नांचा विचार सध्या साधकबाधकरीत्या येथे होत आहे.

विदेशी पाहुण्यांना दिल्लीचे आकर्षणही अधिक कसे वाटेल व वाढेल याची चिंता येथे व्यक्त होऊ लागलेली आहे. खुद्द पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री यांनीसुद्धा दोन सप्ताहांपूर्वी उघडपणे बोलून दाखविलेले आहे की, भारताच्या आधुनिक राजधानीतील—नवी दिल्लीतील—अनेक गचाळ रस्ते (खड्ड्यांनी परिपूर्ण असे) पाहिले, की लाज वाटू लागते ! दिल्ली महापालिका व नव्या दिल्लीतील (नियुक्त) म्युनिसिपल कमिटी पंतप्रधानांच्या वरील अभिप्रायानुसार लज्जित होऊन ज्या दिवशी पूर्णतया कार्यक्षम होईल, ठरेल, तो दिवस साऱ्या जगाला लज्जित करणारा ठरेल, अशी प्रतिक्रिया पंतप्रधानांचे स्पष्ट उद्‌गार वाचल्यानंतर ऐकावयास मिळू लागलेली आहे. वाईटातून नेहमीच काही चांगले काढता येते, या न्यायानुसार दिल्लीचे आकर्षण वाढविण्यासाठी केंद्र सरकारच्या पर्यटन विभागाने मात्र चंग बांधलेला दिसत आहे. सुप्रसिद्ध ऐतिहासिक ‘ लाल किल्ला ’ लौकरच रोज सायंकाळी सुखद संगीत व प्रभावी प्रकाशाच्या पार्श्वभूमीवर ‘ बोलका ’ केला जाणार आहे. हा अभिनव कार्यक्रम सुमारे ४५ मिनिटे चालेल, अशा पद्धतीने वसविण्याचे काम ब्रिटिश तज्ज्ञांच्या देखरेखीखाली जवळ जवळ पूर्ण होत आले असल्याचे कळते. [ लंडनमधील प्रसिद्ध ‘ टॉवर ऑफ लंडन ’ ही थेम्स नदीच्या किनाऱ्यावरील वास्तू वा इजिप्तमधील कैरो शहराच्या आसमंतातील जगप्रसिद्ध भव्य ‘ पिरॅमिड ’ ही वास्तू ज्या पद्धतीने ‘ बोलकी ’ करण्याचा प्रयोग गेल्या काही वर्षांपासून चालू आहे त्याच धर्तीवर ‘ लाल किल्ला ’ ही वास्तूही बोलू लागणार आहे. ] या अभिनव कार्यक्रमाची जी कच्ची रूपरेषा उपलब्ध झाली आहे, तिच्यावर नजर टाकताच एवढे ध्यानी येत आहे की पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना व ‘ बोलका लाल किल्ला ’ या तिन्ही पैलूंचा सुरेख संगम (सिंक्रनायझेशन)

साधला जाईल तर अतीव मनोज्ञ असा कार्यक्रम सादर होऊन विदेशी प्रवासीच काय पण दिल्ली दर्शनार्थ येणारे देशी यात्रेकरूही बेहद्द खूप होऊन जातील. सुमारे साडेतीनशे वर्षांचा 'लाल किल्ल्याचा इतिहास 'जिता जागता' सादर करण्याचा हा प्रयोग आहे. एकपात्री नाटक वा चित्रपट पाहून थक्क होणाऱ्या मंडळींना हा नवा प्रयोग अधिकच थक्क करून सोडील, अशी आशा व्यक्त केली जात आहे; कारण या अभिनव प्रयोगात एकही पात्र न राहाता, न दिसता, 'आवाज' ऐकू येणार आहेत व त्या आवाजांचेद्वारा लाल किल्ल्याच्या आसमंतातील, परिसरातील अनेकविध ऐतिहासिक प्रसंग ताजेतवाने होऊन प्रेक्षकांच्या स्मृती चाळवून, त्यांच्या विचारांना चालना देणार आहेत. अंधारात बसून लाल किल्ल्याकडे पाहात असणाऱ्या प्रेक्षकांना त्या वास्तू सभोवताली एकदम विविध छटांचे प्रकाशझोत व त्या प्रकाशझोतांशी रंगसंगती साधणारे रसरंग (पार्श्वसंगीताचे सुसंवादी स्वर) ऐकावयास मिळू लागतील. यामुळे एकूण जे वातावरण निर्माण होईल त्याचा पूर्णतया लाभ घेऊन निव्वळ विविध आवाजांचेद्वारा सारा इतिहास 'बोलका' करून सादर केला जाणार आहे. हा अभिनव प्रयोग सफल झाला तर देशातील अन्य काही प्रमुख वास्तू, विशेषतः काही मराठी किल्ले 'बोलके' करून ननीन चेतना, नवीन प्रेरणा निर्माण करण्याचा प्रयोग केंद्र सरकारच्या वा राज्य सरकारांच्या पर्यटन विभागाला हाती घेता येऊ शकेल, अशी अपेक्षाही व्यक्त केली जाऊ लागली आहे.

## □ मोरारजींची नखे

दिल्ली दरबारात सध्या संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू असल्याने स्वाभाविकपणेच अर्थकारण व राजकारण यांची सांगड घालून चर्चा चालू आहे. 'गुप्त धन' ( काळा पैसा ) बाहेर काढण्यासाठी अर्थमंत्री आटापिटा करीत आहेत. काही राजकारणी कुप्रसिद्ध व्यक्तींनी जो अमाप पैसा गोळा केला आहे, त्याची चौकशी व्हावी व त्यांना सजा व्हावी, म्हणून अनेक खासदार मागणी करू लागलेले आहेत. पंजाबचे माजी मुख्यमंत्री सरदार प्रतापसिंह कैरों यांच्यावरील आरोपांची चौकशी होऊन गतवर्षी जी कृष्णकृत्ये उघडकीस आली त्यामुळेच या धाडसी मुख्य-

मंत्र्याला पदच्युत व्हावे लागून त्यांचा दरारा कमी झाला. हा दरारा कमी होताच त्यांचे दबून राहिलेले शत्रू प्रबल झाले व त्यांनी त्यांचा खून करून सूड उगविल्याची ताजी घटना सर्वांच्या स्मरणात अद्याप ताजी आहेच. दिल्ली सरकारने जम्मू-काश्मीर राज्यातही गेल्या १७ वर्षांत कोटी कोटी रुपये खर्च केले असले तरी तेथेही या पैशांचा चुराडा झाल्याचा प्रवाद प्रबळ होताच तेथील माजी मुख्यमंत्री (तेथील घटनेनुसार पंतप्रधान म्हणतात) बक्षी गुलाम महंमद यांचे विरुद्धही रीतसर आरोप ठेवून चौकशीला प्रारंभ झालेला आहेच. ही पार्श्वभूमी तयार झाल्याने आता ओरिसामधील राजकारणी 'दादा' श्री. पटनाईक व त्यांचे साथीदार श्री. बिरेन मित्रा यांचे व्यवहाराविषयीही अशीच उघड चौकशी व्हावी, अशी मागणी जोर करू लागली आहे. केंद्र सरकारने काँग्रेसची अब्रू ओरिसात वाचविण्यासाठी माजी मुख्यमंत्री श्री. पटनाईक यांच्या अयोग्य व्यवहारांवर पांघरूण घालण्याचे नाटक रचलेले असले तरी चाणाक्ष व सदैव जागृत असलेले प्रसोपाचे खासदार श्री. हृ. वि. कामत यांनी पटनाईक-मित्रा प्रकरणींचे गुप्त प्रतिवृत्त लोकसभेत अचानक सादर करून शास्त्री-सरकारच्या आसनाखाली 'टाईम बॉम्ब' ठेवल्यागत सर्वांना हादरून टाकले आहे. हे गुप्त कागदपत्र विरोधी पुढाऱ्यांच्या हाती पडले कसे, ते कागदपत्र बनावटी नाहीत ना, त्या गुप्त कागदोपत्री सध्या जे आरोप केले गेलेले आहेत त्यांच्या आधारे या प्रकरणी चौकशी करणे आवश्यक नाही का, आदी संबंधित प्रश्नांची चर्चा ( ४ मार्च ) संसदीय गोटात जोरकसरीत्या चालू आहे. त्यातून काय निष्पन्न होईल, त्यावर भविष्यातील अनेक घटना अवलंबून आहेत. देशातील खाजगी संपत्तीमध्ये 'गुप्त' किती आहे याची कसून पाहाणी होणार असेल तर तत्पूर्वी राजकारणी 'दादा' व्यक्तींजवळ किती 'गुप्त धन' साठविले गेलेले आहे याची कडक तपासणी होणे आवश्यक असे मानले जाऊ लागलेले आहे. केंद्र सरकार या मागणीला मान तुकविणार की नाही व केंद्र सरकारने या संधीचा लाभ घेऊन जनतेचा विश्वास संपादन न केला तर सतत धुमसत असलेल्या अविश्वासाच्या वातावरणात भरच पडणार नाही का, आदी नैतिक प्रश्नांची उजळणीही या निमित्ते होऊ लागलेली आहे. राजकारण व अर्थकारण यांची सांगड नीट प्रकारे घातली

न गेल्यानेच ही गल्लत निर्माण होऊन देशाच्या उदात्त राजकारणाला सौदेबाजीचे हिडीस स्वरूप प्राप्त होऊ घातुलेले आहे. चालू अर्थअंकल्पीय अधिवेशनांत शास्त्री-सरकार नरमाईचे धोरण न दाखविता कडक बनून जनमानसात विश्वास निर्माण करण्यासाठी काय काय उपाययोजना करणार याकडेच मुख्यत्वे सध्या सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

अशा प्रकारे दिल्ली दरबारातील वातावरण पेटलेले असताना मोठमोठे म्हणून मानले गेलेले काँग्रेसी पुढारी काय करीत आहेत, हे पाहाण्याजोगे ठरेल. अर्थमंत्री श्री. कृष्णमाचारी लोकसभेत अर्थअंकल्प सादर करीत होते, त्यावेळी माजी अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई अक्षरश: आपली नखे घासून-पुसून तीक्ष्ण करीत असल्याचे विचित्र दृश्य पाहून अनेक पत्रकारांना व निरीक्षकांना धक्का बसला !. [ He was seen actually sharpening his nails in the House with a small pair of scissors! ] लोकसभेचे सदनात एकचित्त होऊन कार्यवाही ऐकणे महत्त्वाचे व प्रतिष्ठेचे, की असले निरर्थक बाष्कळ उद्योग तेथेच करीत बसणे महत्त्वाचे हा प्रश्न त्यावेळी अनेकांना पडला ! वास्तविक ही दु:खद घटना घटकाभर दूर सारली तरी त्यांचा 'लाक्षणिक अर्थ' भयानक ठरू शकेल असाच आहे. वर्तमान शास्त्री-सरकार केव्हा कोलमडते व ते स्थान पटकाविण्यासाठी आपण दबा धरून सिद्ध अवस्थेत नखे काढून बसले पाहिजे, अशी जी मनस्थिती काही काँग्रेसजनांची झालेली आहे त्याचेच हे द्योतक आहे ! शास्त्री-सरकारचे विरोधक व स्वजन ( म्हणजेच काँग्रेसजन ) दोघे मिळून नकळत कशी समान पावले टाकीत आहेत आणि वर्तमान केंद्र सरकारचे वाभाडे काढण्यासाठी पुढे सरसावीत आहेत याचेच हे प्रतीक आहे. पंधरा मार्चपर्यंत हे वाभाडे काढणारे विशेष प्रकारे सक्रीय राहातील अशी माहिती मिळालेली आहे. त्यामुळे शास्त्री-सरकारची या प्रसंगी कसून कसोटी लागणार आहे. पंतप्रधान श्री. लालबहादूरजी सौम्य प्रकृती म्हणून प्रसिद्ध असले तरी ते संधी येताच 'कठोर' बनून कारवाई करू शकतील असे त्यांच्या निकटवर्तियांना विश्वासपूर्वक वाटते. शास्त्री-सरकारने गेल्या नऊ महिन्यांत अंतर्गत वेदना अत्यंत सोशिकपणे सहन केल्या. परंतु, सर्वत्र हा असंतोषाचा वणवा पेट घेत असतानाच पुन्हा सीमेवर शत्रूशी निकराचा संघर्ष निर्माण झाला तर मात्र श्री. शास्त्रीजींना अग्निदिव्यातूनच जावे लागेल असे दिसू लागलेले आहे.

—दरबारी

# गोव्याचे नागालँड होऊ नये...

गोवे महाराष्ट्रात विलीन करण्याबाबत फार काळ वाट पाहावी लागणार नाही, अशी आश्वासने केंद्रीय गृहमंत्री नंदांपासून महाराष्ट्राचे गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांचेपर्यंत सर्वांकडून दिली जात आहेत. ही आश्वासने लवकर पूर्ण झाली नाहीत तर गोव्याचे नागालँड होण्यास संधी मिळेल असा धोका आहे. या दृष्टीने पुढील एक–दोन घटना, गोव्याच्या नुकत्याच झालेल्या माझ्या दौऱ्यात मला समजल्या. त्या वाचकांसमोर विचारार्थ ठेवतो.

(१) गोव्यातील हिंदू व ख्रिश्चन यांच्या लोकसंख्येत आज एक लाखाचा फरक आहे. पूर्वीप्रमाणे बाटवाबाटवी व धर्मांतर करून लोकसंख्या वाढविण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत. तेव्हा नवीन क्लृप्त्या ख्रिश्चन नेत्यांकडून योजल्या जात आहेत. गेल्या वर्षी पूर्व पाकिस्तानात भयानक जातीय दंगली झाल्या व लक्षावधी हिंदू व ख्रिश्चन पाकिस्तान सोडून भारतात आले. यांपैकी केवळ ख्रिश्चन आदिवासींना गोव्यात आणून त्यांची एक स्वतंत्र वसाहत वसविण्याचा प्रयत्न गोव्यातील ख्रिश्चन पुढाऱ्यांनी करून पाहिला. पण त्यांना यश आले नाही हे आपले सुदैव.

(२) गोव्यातील मँगेनीजच्या खाणींपैकी काही ख्रिश्चनांच्या मालकीच्या आहेत. आज अशा ख्रिश्चन खाणमालकांनी केरळ भागातून रोमन कॅथॉलिक कामगार आपल्या खाणींतून भरती करण्याचा सपाटा लावला आहे. या प्रयत्नाला शह बसावा म्हणून काही महाराष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रातून मजुरांची भरती व्हावी, असे प्रयत्न सुरू

## के. ल. जोग

केले. महाराष्ट्रातील मजूर संघटनांकडे त्या दृष्टीने खटपट केली. परंतु रोज सात ते दहा रुपये मजुरीचे आकर्षण असूनही जेमतेम ५००-६०० मराठी मजूर गोव्याकडे गेलेले आहेत. याउलट उत्तर प्रदेशातून येथे आजवर दोन हजार भय्ये भरती केले गेलेले आहेत. काही प्रलोभने दाखविली गेली तर त्यांचीही मते महाराष्ट्रवादी पक्षाला न मिळता 'युनायटेड गोवन्स' च्या पेटीतच पडतील, अशी शक्यता आहे.

(३) गोव्यातील पोर्तुगीज राजवट संपली आणि अनेकांचा चोरट्या मालाच्या व्यापाराचा किफायतशीर धंदा बसला. या असंतुष्ट वर्गाची सहानुभूतीही 'युनायटेड गोवन्स' कडे आहे.

गोवे दहा वर्षे स्वतंत्र राहिले तर आज असलेले हिंदु ख्रिश्चन लोकसंख्येतील एक लाखाचे अंतर अशा युक्त्याप्रयुक्त्यांनी भरून काढता येईल व ख्रिश्चनांचे बहुमत झाले तर नागालॅन्डप्रमाणेच गोव्यासाठीही स्वतंत्र राज्याची मागणी लोकशाही मार्गाने पुढे रेटता येईल, अशी स्वप्ने 'युनायटेड गोवन्स' चे नेते आज पाहात आहेत.

दुसरीकडे म्हैसूर काँग्रेसचे नेते शरावतीची वीज म्हैसूर सरकार कोयनेच्या विजेपेक्षा स्वस्त दराने गोव्याला देईल. गोव्यातील बंदरांच्या विकासासाठी भरपूर द्रव्य साहाय्य गोव्याला म्हैसूरकडून मिळेल, अशी प्रलोभने गोव्यातील काँग्रेस नेत्यांपुढे ठेवीत आहेत.

या कारवाया व प्रलोभने यांच्या दडपणामुळे परिस्थिती बदलण्यापूर्वी महाराष्ट्रात गोवा विलीन होणे अवश्य आहे. नाहीतर 'बैल गेला आणि......' अशी महाराष्ट्राची अवस्था व्हायची. ●

# व्यक्ती
आणि
# वार्ता

## □ 'मराठी रंगभूमीदर्शन–'कार श्री. देशमुख

"तुम्ही परदेशांत जन्माला यायला हवे होतात. महाराष्ट्रात आलात हे तुमचे दुर्दैव," असे पु. ल. देशपांडे नांदेडला के. टी. देशमुख यांना उद्देशून सहज बोलून गेले.

पण देशमुखांसारखी माणसे परदेशांत असोत नाहीतर स्वदेशात किंवा महाराष्ट्रात जन्मास येवोत प्रतिकूल परिस्थितीशी सतत झगडा हा त्यांना द्यावाच लागत असतो. कारण एकच–चालू चाकोरी सोडून काहीतरी नवीन करण्याची त्यांची सतत धडपड चालू असते. चाकोरी बदलायची म्हणजे त्रास. चाकोरीतून चालणाऱ्या भोवतालच्या परिस्थितीशी, माणसांशी न जमणे, आर्थिक ओढाताण हे सर्व आलेच. पण देशमुखांसारखी माणसे हे सर्व स्वीकारीत असतात. कारण चाकोरीतील स्वस्थतेपेक्षा नाविन्याची ओढ त्यांना अधिक महत्त्वाची–मोलाची वाटत असते.

या नाविन्याच्या ओढीच्या मुळाशी ही स्वातंत्र्याची आवड मुख्य असते. कोणाची ताबेदारी नको, आपण आपले मालक ही भावना मराठी माणसांत विशेष प्रबळ आहे. सह्याद्रीचा–डोंगराळ मुलुखाचा हा विशेष गुणधर्म असावा. पण त्यामुळेच देशमुखांसारखी एककल्ली, एकमार्गी स्वयंतंत्र माणसे महाराष्ट्रात अधिक प्रमाणांत जन्मास येतात–दुर्दैव म्हणा की सुदैव ! कुठेतरी कोपऱ्यात आपले छंद, आपली वेडे उराशी घेऊन धडपड करीत राहाणे केव्हा पांचपंचवीस वर्षांनी प्रसिद्धी, मानमान्यता पैसा––लाभेल त्यावर उर्वरीत जीवनाची घडी बसवून घ्यावी असा त्यांचा क्रम ठरलेलाच दिसतो.

देशमुखही या क्रमाला अपवाद नाहीत. सुदैव एवढेच की पहिली पांच-पंचवीस वर्षांची बिकट वाटचाल आता संपत आली आहे, त्यांच्या कार्याचे महत्त्व आता जाणकारांनी तरी ओळखले आहे.


फोटोग्राफी हा देशमुखांचा लहानपणापासूनचा छंद. यात काही वर्षांच्या अभ्यासाने तज्ज्ञता लाभली. चाकोरीतला नोकरीधंदा कुठेही मिळू शकत होता. पण काहीतरी वेगळे स्वतंत्र करायचे ही वृत्ती. तेव्हा लघुपट निर्माण करण्याकडे कर्तृत्वाचा ओघ वळला. खूप पैसा जवळ असता तर मोठे चित्रपटही त्यांच्या हातून निघणे अशक्य नव्हते. पण लघुपटनिर्मितीत त्यांना चांगले यश लाभले. त्यांनी दिग्दर्शित केलेला म. गांधींवरचा 'श्रद्धांजली' हा चित्रपट विशेष गाजला. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य संस्थापनेच्या मुहूर्तावर त्यांनी काढलेला 'मंगल कलश' हा लघुपट तर त्यांच्या या क्षेत्रातील कर्तृत्वाचा कळसच ठरला.



**देशमुखांसारखी माणसं पु. ल. ना 'कोपऱ्या'तूनच हुडकावी लागतात**

आता या मुक्कामावर देशमुख स्थिरावले असते तरी दगदग मिटली असती: आवडीचे काम, अर्थिक स्वास्थ्य सर्व काही लाभू शकत होते. पण ज्याचा सराव झाला, जे सहज जमू शकते, त्याची लगेच चाकोरी बनते व या चाकोरीतून चालणे देशमुखांसारख्या माणसांना मनापासून आवडत नसते. म्हणून पुन्हा नवी क्षेत्रे, नवीन धडपड, नवीन प्रयोग सुरू होतात. हल्ली देशमुख (संपूर्ण नाव—काशीनाथ त्रिंबक देशमुख) मराठी रंगभूमीचा १८४३ पासून १९४३ पर्यंतचा शंभर वर्षांचा इतिहास रुपेरी पडद्यावर आणण्याच्या मोठ्या खटाटोपात गुंतले आहेत. दोन-तीन वर्षे झाली: पदरमोड सुरू आहे. भटकंती चालू आहे. तंजावर, सांगली, इचलकरंजी, कोल्हापूर, इंदूर, बेळगाव, पुणे, महाड, ग्वाल्हेर, जळगाव, खामगाव, अमरावती, नागपूर—जेथे जेथे मराठी रंगभूमीसंबंधी एखादी आठवण, एखादे जुने हस्तलिखित, दुर्मिळ चोपडे, छायाचित्रे, साधी जाहीरातही मिळेल अशी शक्यता होती तेथे तेथे देशमुख जाऊन आलेले आहेत. किर्लोस्कर कंपनी टिळकांच्या वेळी एकदा कलकत्त्याला गेली होती हे त्यांना समजताच तेथे काही हाताशी लागेल या कल्पनेने देशमुखांनी कलकत्तावारीही केलेली आहे.

गेल्या दोनतीन वर्षांच्या अखंड उद्योगामुळे मराठी रंगभूमीदर्शनाची सामग्री आता देशमुखांजवळ तयार होत आली आहे. सुमारे पाच हजार छायाचित्रे त्यांनी जमा केली व त्यांतील दोन अडीच हजार छायाचित्रांच्या मोठ्या आकारातील सुबक प्रती प्रसिद्धीची वाट पाहात आहेत. ही अस्सल छायाचित्रे,



यशवंतराव आले : आता 'सरकार 'नेही यावे

नाट्यप्रसंग, निवेदन या सर्व अंगोपांगांनिशी 'मराठी रंगभूमी' हा संपूर्ण लांबीचा चित्रपट आता वर्षाभरात तयार होईल असा अंदाज आहे. वसंत शांताराम देसाई यांनी या चित्रपटाची कथा तयार केली असून निवेदनहि त्यांचेच राहाणार आहे. संगीताची बाजू वसंत देसाई यांनी उचलली आहे. व्ही. शांताराम यांचे तांत्रिक साहाय्य जमेस धरले आहे.

या दोन-अडीच हजार छायाचित्रांच्या संग्रहापैकी काही निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन देशमुख यांनी नांदेड नाट्य संमेलनात भरवले होते. संरक्षण मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी देशमुखांची पाठ थोपटली; पु. ल. तर भावविवशच झाले. देशमुखांना आपल्या परिश्रमांचे चीज झाले असे वाटले. आता त्यांची अपेक्षा एवढीच की सरकारी पातळीवरून या कार्याला मान्यता लाभावी. पु. ल. ही यशवंतरावांना म्हणाले, " हे काम सरकारने यापुढे हाती घेतले पाहिजे."

सरकार काय करील ते करो; पण मराठी रसिकांच्या दरबारी मात्र देशमुखांची ही सेवा रुजू झाल्याशिवाय राहाणार नाही. या सर्वसामान्य मराठी नाट्यरसिकांविषयी देशमुखांचे अनुभवही फार चांगले आहेत.

ते म्हणाले, " मी जमवलेली छायाचित्रे, हस्तलिखिते, चोपड्या यांपैकी रंगभूमीवरच्या कलावंतांकडून, नाटककारांकडून मला फारच थोडे मिळाले. खरे धन जतन केले होते ते सर्वसामान्य मराठी नाट्यरसिकाने. असा हौशी आणि जुन्या मराठी रंगभूमीविषयी प्रेम असणारा नाट्यरसिक नसता तर माझे काम उभेच राहू शकत नव्हते."

हा मराठी रसिकच देशमुखांच्या कार्याचे चीज करील अशी खात्री वाटते. ●

## कावा


जगायचे नाही
क्षणभरी आता
विठो घ्यावे आता पदरात ।
कोणत्या बोलाने
बोलवावे तुला
पापांचा रचिला डोंगर म्या ।
करिताना पाप
विसरलो तुला
नाही समजला कावा तुझा ।
पापाचे हे माप
शिगोशीग देता
मागू काय आता बदल्यात !

*शरद गजानन वाघ*

## दान

स्वप्न रंगल्या रात्री एका
मागितले दान काही
विसावता मिठीमध्ये
सर्वस्वाची वाटे ग्वाही
    —— आज रात्र सरलेली
    स्वप्नरंग फिकटले
    ओठांवर उरे व्रण
    वृथा मन व्याकुळले
    वेड्या पापणीत आता
    आले आभाळ भरून
    आणि रित्या ओंजळीत
    माझ्या आसवांचे दान

*कुमुदिनी आपटे*



## तो कसा !

तो म्हणाला, हास...मीही हासले
हासताना मी सुखाने स्फुंदले
तो म्हणाला, वेडुबाई ! रडू नको...
पाहिलो डोळ्यांत त्याच्या आसवे
तो उन्हासम भर्जरी, तो शीतळ
रात्रिला तो चंद्रसा स्वप्नातला
त्याचिया झाडातले मी पाखरू
श्वास तोही माझिया देहातला
रोज तंद्रीतून मुद्रा बदलते
खुपत काही त्याजला गे, सारखे
काहि पुसता हसुन मज जवळीच घे
पुसत काही तोच कधि या कुशित ये
मी तयाला वांछिले, मनि पूजिले
कळत ना मज...सर्व त्याला समजते
तो म्हणाला, सूर्य उगवे – पूर्व ती
पूर्व ती...मी तीच केवळ जाणिते
मी मधाने बोलता तो लोभतो
निर्मळाहून गोड तोही हासतो
राग माझा बाळ होउन पाहतो
केधवा नभथोर मजला वेढितो
मी म्हणाले हास...तोही हासला
हासताना तो सुखाने बिलगला
हटकिसी तू...' तो कसा गे,तो कसा ? '
तो असा...अन् तो तसा...पण तो कसा?

*शरद साटम*

# 'टॉवर ऑफ सायलेन्स'

: लेखक :

**माक्स डाऊथेंडाय**

: अनुवाद :


**श्री. भा. श्रोत्री**



'माणूस' च्या वाचकांना प्रा. श्रोत्री हे नवीन नाहीत. माक्स डाऊथेंडाय या जर्मन साहित्यश्रेष्ठाच्या आशियाविषयक कथा त्यांनीच यापूर्वी 'माणूस' मधून मराठीत अनुवादिल्या आहेत. 'माक्स डाऊथेंडायचे परदेशविषयक साहित्य' हाच त्यांचा पुणे विद्यापीठाला सादर केलेल्या प्रबंधाचा विषय आहे. त्यांनी जर्मन साहित्य प्रसाराला जी मदत केली, त्याच्या सन्मानार्थ न्युत्सबुर्क येथील 'माक्स डाऊथेंडाय सोसायटी'ने त्यांना सुवर्णपदक देऊन नुकतेच गौरविले आहे. या यशाबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

सध्या धारवाड येथील कर्नाटक कॉलेजात श्री. श्रोत्री हे जर्मन विषयाचे अध्यापन करतात.

त्यांनी अनुवाद केलेली ही आणखी एक खास कथा—



संध्याकाळचा समय. ' मरीन ड्राईव्ह 'वर आलिशान बग्यांची चाके फिरत आहेत बगीवाले चंदेरी घंटा वाजवत आहेत. काळविटासारख्या बारीक अंगकाठीच्या सहा ते आठ भारतीय स्त्रिया बसल्या आहेत आणि आपल्या बदामी रंगाच्या माना उंचावून समोवारचा देखावा पाहात आहेत. ड्राईव्हच्या रस्त्याने लोकल गाड्या, मोटारी व टॅक्सीज् खडखडत आहेत. त्यात पार्शी लोकांच्या बग्या उठून दिसत आहेत. मुंबईचे श्रीमंत जग म्हणून पारशांकडे बोट दाखविले जाते.

एका भल्या मोठ्या काळ्या चकचकीत बगीतून मुंबईतला एक फार मोठा श्रीमंत गृहस्थ आपला मुलगा एलिफार याच्याबरोबर मरीन ड्राईव्हकडे येत आहे. बगीच्या मागे चार नोकर उभे आहेत आणि त्यांनी हिरवा फेटा व तांबडे डगले घातले आहेत. दोन बगीवाले त्या पारशांची दोन घोड्यांची बगी चालवत आहेत. दोघाही पारशांनी गुडघ्याखाली पोहोचणारे अंगरखे घातले आहेत, त्यातून गुडघ्यापर्यंत पोहोचणारा पांढरा रेशमी शर्ट डोकावत आहे. त्यांच्या पोटऱ्या मोकळ्याच होत्या, पायांत मात्र सोनेरी रंगाचे जोडे होते. त्यांच्या डोक्यावर विशिष्ट प्रकारच्या काळ्या पगड्या मुकुट होत्या. त्यामुळे ते मोठ्या पाद्र्यांसारखे दिसत होते...

बगीचे घोडे भरधाव पळत होते. पायी जाणारे असंख्य लोक त्या घोड्यांच्या टापांखालून आणि बगीखालून क्षितिजाजवळच्या संध्याकाळच्या सूर्याकडे बघत आहेत. जणू काही हे गर्भश्रीमंत सूर्यास आपल्या पायांखाली तुडवीत पुढे जात आहेत.

निळ्या करड्या पाखरांप्रमाणे मरीन ड्राईव्हच्या दूरवर पसरलेल्या सावल्या इंग्रजी ' कुबम् ' च्या तांबट गुलाबी हिरवळीवर नाचत होत्या. पांढरा शुभ्र पोशाख परिधान केलेले टेनिस-खेळाडू पोपटी रंगाच्या ताडांचे झाडांखाली पुतळ्यांप्रमाणे उभे होते. गाड्यांच्या साखळीशेजारी समुद्र एखाद्या अजस्र रुपेरी टेबलासारखा पसरला होता आणि सूर्याचा गोळा जणू काही संध्याकाळच्या हिरवट निरभ्र आकाशातून पांढऱ्या समुद्राचे टेबलावर एखाद्या सोलून ठेवलेल्या संत्र्यासारखा घरंगळत

आला होता. किनाऱ्यावर असंख्य भारतीय फिरत होते. सात आणि दहा भारतीय स्त्रिया हातांत हात धरून शंखाच्या निस्तेज कुरणावरून समुद्र किनाऱ्याकडे निघाल्या होत्या. त्या सुरेख तरुणींची व स्त्रियांची नग्न अंगे (शरीरे) पाचूसारख्या हिरव्या, माणकासारख्या तांबड्या व नीलमण्यासारख्या निळ्या पोशाखांत गुंडाळली होती. संध्यासमयीची हवा पाण्यासारख्या नितट दुपट्ट्यांस स्त्रियांचे अंगकांतीशी झोंबाझोंबी करावयास लावत होती. समुद्राजवळ ते स्त्रियांचे समूह जणू काही निळ्या, तांबड्या आणि हिरव्या काचेतून ओतल्यासारखे उभे होते. भलीमोठी पागोटी घालून तरुणही समुद्रकिनाऱ्यावर हिंडत होते. तेमुद्धा हातांत हात घालून फिरत होते. काहीजण चेंडू खेळत होते, तर काहीजण आपल्या निळ्या सावलीशेजारी वाळवंटात बसले होते.

हवेत एकदम चीत्कार उडाला आणि काळ्या गिधाडांनी रस्त्यावर भिरक्या मारण्यास सुरुवात केली. काळी फडकी ज्याप्रमाणे आकाशात उडावीत त्याप्रमाणे ती भेसूर गिधाडे एकमेकांचा पाठलाग करत होती. मात्र त्यांच्याकडे कोणाचेच लक्ष नव्हते.

ती गिधाडे आली व गेली आणि मलबार टेकडीवरील हवा त्यांनी आपल्या अस्थैर्याने नांगरली. ही लहानशी टेकडी एका बाजूने समुद्रात घुसली आहे. तेथेच वर झाडांच्या गर्द झाडीमागे व बंगल्यांमागे पारशांची स्मशानभूमी दडली आहे. त्याला "टॉवर ऑफ सायलेंस" म्हणतात. तेथे पांढऱ्या मनोऱ्यांच्या छपरावर मयत पारशी लोकांस ठेवण्यात येते. गिधाडे येतात आणि साधारणतः तासाचे आत प्रेतांचा फडशा पाडतात. मृत पारशास हवा, पाणी अथवा अग्नी या कशासही दूषित करावयाचा अधिकार नाही, म्हणून त्याला गिधाडाचे पोटाशिवाय इतर कोठेही दफन मिळत नाही.

मनोऱ्यांजवळच्या आलिशान बागेत ताडांचे बुंधे तांबड्या गंजलेल्या लोखंडी स्क्रूसारखे उभे आहेत आणि गिधाडांचे चीत्कार शापांसारखे वाटत आहेत, सतत भांडणाऱ्या भुकेच्या भाषेसारखे. समुद्रकिनाऱ्यावर मजा उडविणाऱ्या माणसांना आपल्या स्वतःचे काळजीप्रमाणे गिधाडांचे चीत्कार परिचित झाले आहेत. पुरुष व स्त्रिया अत्यंत शांतपणे आणि कोठल्याही प्रकारे अस्वस्थ न होता विलासी सूर्यास्ताकडे पाहात आहेत. असंख्य माणसांच्या, घोड्यांच्या आणि वाहनांच्या सावल्यांप्रमाणे ती काळी गिधाडे संध्याकाळचे एक नेहमीचेच दृश्य आहे.

रस्त्याचे कडेला बग्या थांबत आहेत आणि फिरून परतणाऱ्यांची वाट पाहात आहेत. पारशानेही आपली बगी थांबवली आणि एलिफार खाली उतरला.

सूर्याच्या गोळ्याने समुद्राचे प्रदेशावर डोके ठेवताच, समुद्राची हवा बदलताच, भूमीच्या उष्ण वाऱ्यांची व समुद्राच्या थंड वाऱ्यांची अदलाबदल होताच व दुपट्टा घातलेल्या मुलींनी वाऱ्याकडे पाठ फिरविताच फिरणारे समूह आपल्या बग्यांकडे जाऊ लागले; वाहने आणि फिरावयास गेलेले लोक शहराकडे परतले.

म्हाताऱ्या पारशाचे लक्ष आपले मुलाकडे होते. तो बगीपाशी उभा होता व समुद्राकडून येणाऱ्या एका मुलींच्या घोळक्याची वाट पाहात होता. एलिफारने येण्याऱ्या मुलींस अभिवादन करावयाचे आधीच बगीतल्या वृद्ध पारशाने बाजूने जाणाऱ्या लोकांचे शब्द ऐकले, "एलिफार व अलुवा कधीच सुखी होणार नाहीत. पारशी जमातीतली ती खूप शिकलेली मुलगी आहे हे खरे, परंतु ती फक्त पुस्तकांवर प्रेम करू शकेल, माणसांवर नाही."

बिचाऱ्या बापाने दुःखाने एक निश्वास टाकला. त्याच्या हातात घड्याळाची सोनेरी साखळी होती व तिच्याशी तो चाळवाचाळव करीत होता. बगीच्या उघड्या दारातून साखळीवर मावळत्या सूर्याचा प्रकाश पडला होता आणि त्यामुळे साखळीतून पन्नासतरी सूर्य परावर्तित होत होते. आणि त्यानंतर समुद्रातल्या सूर्याबरोबर या पन्नास सूर्यांचा अस्त झाला तेव्हाच त्याने जाणाऱ्या लोकांचे उद्‌गार ऐकले. अलुवाने एलिफारशी उगीचच हस्तांदोलन केल्यासारखे केले आणि ती मैत्रिणींबरोबर निघून गेली. म्हातारा बाप स्वतःशीच म्हणाला, "अलुवा मला काही भेटावयास आली नाही हं. तिला माणसांबद्दल प्रेम असेल तर ना? तिचे हृदय काळचा मोत्यांसारखे उदासीन आहे. मघाशी लोक म्हणाले ते बरोबर होते. अलुवाला फक्त पुस्तकांचे प्रेम आहे. एलिफारशी लग्न करावयाचे आदले दिवशीसुद्धा तिला त्याच्याशी एकरूप होता येऊ नये ना?"

अलुवाचे बगीचे दार लावले गेले, घंटा वाजली आणि ती बगी पुढे निघून गेली. अलुवाखेरीज आणखी सहा मुली होत्या व सर्वजणींच्या डोळ्यांवर चष्मा होता. जाता जाता त्या मुलींनी म्हाताऱ्याकडे बघून वाकल्या न वाकल्यासारखे केले. जणू काही त्या सात हुशार मुंग्या होत्या आणि त्यांना कामामुळे आणि घाईमुळे वेळ नव्हता.

एलिफार बापाजवळ येऊन बसला. त्याचे ओठ दिमाखाने थोडे विलग झाले होते व काळेभोर ताठर डोळे अलुवाचे दिशेने बघत होते.

म्हातारा मनाशी म्हणाला, "माझा मुलगा मूर्ख आहे. त्याचा दिमाख व गर्व हेच त्याचे सारे शहाणपण. तो उमदा आहे, श्रीमंत आहे, प्रेमळ आहे, ताकदवान आहे आणि म्हणूनच तो अलुवाला आवडला असावा. ती खूप शिकलेली आणि हुशार मुलगी आहे. परंतु अत्यंत ताठर आहे. अशा मुली असत नाहीत. आणि आम्ही तिला मागणी घालावयास गेलो, तेव्हा तिने होकार का द्यावा याचे मला फारच आश्चर्य वाटते."

काही वेळ बाप व मुलगा काही न बोलता बगीतून चालले होते. रस्त्यावरील दुकानांच्या पाट्या ते वाचीत होते.

समुद्र आता धूसर आणि मृतप्राय शांत लाटांखाली पसरला होता. एखाद्या जाळ्याखाली मोठ्या पांढऱ्या राक्षसास अडकवून ठेवावे तसे समुद्राकडे पाहून वाटत होते.

" आज संध्याकाळपासून तुझ्या लग्नमुहूर्ताची सुरुवात झाली," बगी बंद फाटकासमोर आगगाडीला जाऊ देण्याकरिता थांबली तेव्हा म्हातारा आपल्या मुलास म्हणाला. गाडीचे खडखडाटात एलिफारने काय उत्तर दिले हे बापास समजले नाही, परंतु त्याच्या चेहेऱ्यावरून तो काय म्हणाला असेल हे तो जाणू शकत होता.

एलिफार फक्त त्याच्या दिमाखाचा विचार करीत होता. त्याच्यासारख्या श्रीमंत, राजपुत्रासमान, एखाद्या किंमत न करता येणाऱ्या दागिन्यासारख्या तरुणास नशीबाने अशा स्त्रीने पती म्हणून मान्य केले होते, की ती चष्मा घालणाऱ्या सर्व मुलींमध्ये अत्यंत हुशार होती. थोडासा विचार करूनच अलुवाने त्याच्या मागणीला होकार दिला होता, आणि ती प्रेमाची फेड करता येत नसतानासुद्धा प्रेम करून घ्यावयास तयार झाली होती, यांमध्येच एलिफारला समाधान होते.

एका छोटयाशा पिवळ्या रुमालातून एलिफारने एक अंगठी बाहेर काढली. तीवर दोन सोनेरी घोडे कोरले होते आणि जणू काही ते घोडे एकमेकांशी धावण्याची शर्यत करीत होते. अंगठी बोटावर चढविल्यावर घोडे बोटाभोवती धावत आहेत असा भास व्हावयाचा. जेव्हा गाडीच्या खडखडाटात एलिफारने बापाचे प्रश्नास उत्तर दिले तेव्हा त्याने अंगठीकडे बोट केले होते. एलिफार ही अंगठी लग्नात अलुवाला देणार होता हे बापाने ओळखले आणि ते दोन घोडे दोन हृदयांचे द्योतक आहेत हे त्याच्या ताबडतोब लक्षात आले. जणू काही एलिफारचा गर्व अलुवाच्या बुद्धीशी शर्यत करीत होता.

एलिफारचे डोळे अंगठीकडे बघत होते आणि बापास मूकपणे सांगत होते, " उद्या अलुवा माझी होणार आणि खूप तरुण माझा हेवा करणार.

" हेवा करून घेण्याकरिता कोणी लग्न करीत नाही, एलिफार. आजच्यासारखा उद्याही सूर्य अस्ताला जाऊ दे आणि त्या चष्मा घालणाऱ्या मुलीस ही अंगठी देऊ नकोस. मी तुझा दुसऱ्या एका मुलीशी विवाह लावतो."

एलिफारने अंगठी खिशात टाकली आणि पुन्हा बापास काही तरी उत्तर दिले. परंतु याही वेळी वाऱ्याच्या झोताने त्याचे शब्द खाऊन टाकले आणि बापास उत्तर ऐकू आले नाही.

एक गिधाड जोराने चीत्कारत त्यांच्या डोक्यावरून गेले. त्याचा आवाज एलिफारचे आवाजापेक्षा मोठा होता. फक्त एलिफारने उडविलेले खांदे म्हाताऱ्यास मूकपणे सांगत होते. " चष्मा न घालणाऱ्या मुली कंटाळवाण्या असतात. कारण त्या माझ्यासारख्या गर्विष्ठ असतात, बाबा. "

मलबार टेकडीवरील त्यांचे बंगल्यासमोर बगी थांबली. दोघेही खाली उतरत होते तोच ते गिधाड जोराने खाली आले आणि एका घोड्याचे पाठीवर येऊन बसले. त्यामुळे बगी थोडीशी पुढे सरकली आणि म्हाताऱ्या पारशाच्या घड्याळाची साखळी अडकून तुटली.

म्हाताऱ्या पारशाने त्या मृत्यूच्या पक्ष्याकडे आणि आपल्या तुटलेल्या साखळीकडे दचकून बघितले. लग्नाचे दिवशीच्या आदलेच संध्याकाळी हा अपशकून एका मोठ्या दु:खाची जाणीव करून देत आहे असे त्यास वाटले आणि आपण आपल्या मुलास पुन्हा लग्न न करण्याची विनंती करावी असे त्याने ठरविले. परंतु मुलाचा गर्व त्याला काही बोलू देत नव्हता; बंगल्यात शिरल्यावर तो नुसताच म्हणाला,

"जी माणसे एकमेकांवर प्रेम करीत नाहीत, त्यांना एकमेकांबद्दल कधीच आकर्षण वाटत नाही; मृत्यूसुद्धा त्यांची भावनाशून्य मने एकत्र आणू शकत नाही."

दुसरे दिवशी याच सुमारास लग्नास आलेले मुंबईचे श्रीमंत पारशी पांढराशुभ्र पोशाख घालून बंगल्याचे बागेत मजा करीत बसले होते. स्त्रियांनीसुद्धा पांढरा पोशाख घातला होता. जणू काही सर्वांनी रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्यांकरिता आपले स्वत:चे प्रदर्शन मांडले होते.

संध्याकाळमुळे निळा रंग घेतलेल्या हिरवळीवर नोकर जेवणाची पाने मांडीत होते आणि लग्नविधी संपत आला होता.

आपल्या पन्नास चष्माधारी मैत्रिणींसमवेत अलुवा बागेतल्या उघड्या सभामंडपांत बसली होती. त्या सर्व स्त्रियांचे अंगावरही पांढरे कपडे होते. मुलींच्या डोक्यांतली पांढरी फुले त्यांच्या चष्म्यांप्रमाणे गंभीर वाटत होती ! एक मोठे वर्तुळ करून त्या मुली खुर्च्यांवर बसल्या होत्या आणि काहीतरी विनोद चेष्टा करून एवढ्या शिकलेल्या असूनसुद्धा लहान मुलींसारख्या टाळ्या पिटीत होत्या.

नोकरांनी एक मोठा केक त्यांच्यासमोर आणून ठेवला व त्याबरोबर खूप चांदीच्या बशा. त्यांतून केक वाटण्यात येणार होता.

एलिफार अलुवाचे समोर येऊन उभा राहिला. त्याचेबरोबर पांढरे कपडे परिधान केलेले त्याचे अनेक मित्र होते. जणू काही ते सर्व संगमरवरी खांबच होते. नवऱ्यामुलाने नवऱ्यामुलीस बागेत आपलेजवळ बोलावले होते. परंतु ती न आल्यामुळे तो स्वत:च तिच्याकडे आला होता. तो समोर येऊन उभा राहिला तरी अलुवा उठून उभीसुद्धा राहिली नाही, तेव्हा तो नुसताच हसला.

आता नवविवाहित जोडप्याने इतरांचा निरोप घ्यावयाची वेळ आली. नवऱ्यामुलाचे घरातच ते आता जाणार होते. परंतु अजून अलुवा खुर्चीवरून उठावयास तयार नव्हती. ती एलिफारकडे ओठाचा चंबू करून नुसतीच बघत राहिली होती.

"मला आणखी तासभर तरी अविवाहित मुलगी म्हणून मजा करू द्या." ती गमतीने म्हणाली, "मला तुमची भीती का वाटते ते कळत नाही, एलिफार. मैत्रिणींनो, काय सांगू तुम्हांला ? मूल व्हावयाची मला भीती वाटते हो ? लग्न केल्यावर दोन जिवांचे एकत्रीकरण होते एवढेच नसून मुलेही होतात हे मी विसरून गेले होते. काहीतरी शिक्षा झाल्याशिवाय, मी मुलाला जन्म देऊ शकणार नाही, असे मला माझी विचारशक्ती सांगते आहे. मला वाटते, मग मला दफनभूमीवर नेले जाईल.

मला मूल झाले तर ते पाहाण्यास मी जगणार नाही."

अलुवा हे सर्व मोठ्याने आणि काहीही लाज न वाटता म्हणाली. प्रत्येक शब्द तिने मनापासून उच्चारला होता. तरीसुद्धा ती हसत होती. तिच्यामागे उभा राहून एलिफार हसत होता. हळूच त्याने तिचा हात आपल्या हातांत घेतला व तिचे बोटात अंगठी सरकवली.

अलुवाने हात झिडकारला आणि अंगठी खाली पडली. "माझ्या हातात अंगठी शोभत नाही. या बोटांनी मी फक्त पुस्तकांची पाने चाळू शकते, माझ्या बोटांना ही अंगठी जड आहे."

एलिफार पुन्हा हसला. त्याच्या गर्विष्ठ हसण्यास म्हणावयाचे होते, "तुला माझ्या अंगठीची सवय होईल, अलुवा. जशी तुला निसर्गाच्या निर्मितीची सवय होईल, जशी तुला मुले होण्याची सवय होईल, तशी अंगठीची सवय तू करशील."

अलुवाने मान डोलावली. तिचे मान डोलावणे म्हणत होते, "नाही, नाही, नाही! त्रिवार नाही!" परंतु मोठ्याने ती म्हणाली, "एलिफार, मला तुझ्या प्रेमाची सवय होणार नाही, मुलांना जन्म देण्याची नाही आणि तुझ्या सोन्याचीही नाही. मनुष्यजन्म घेतला आहे म्हणून आपण लग्न करतो; कारण आपले जीवन कशाकरिता याची माणसाला कल्पनाच नसते. माझ्या मातापित्यांची आज्ञा पाळण्याकरिता मी तुझ्याशी लग्न केले. तुला माझ्याशी लग्न करून दिमाख मिरवावयाचा आहे म्हणून केले आणि प्रेमाचे ढोंग मी करू नये अशी तुझी अपेक्षा आहे म्हणून मी लग्न केले."

सगळ्या पारशी मुलींनी तिच्या बोलण्याचे स्वागत केले.

एलिफारने फक्त मान डोलावली आणि अंगठी खिशात टाकली. काही न बोलता तो म्हणाला, "एक दिवस तुला सगळ्याची सवय होईल. तुझ्या नकळत मी तुझ्या बोटात अंगठी घालीन आणि तुला आपण अंगठी घातली आहे हेही लक्षात येणार नाही." अलुवाने पुन्हा मानेने खुणावले, "केव्हाही नाही, केव्हाही नाही!"

या प्रसंगानंतर काही महिन्यांनी एका मृत मुलास जन्म देताना अलुवाचा अंत झाला. तिचे प्रेत एका रेशमी पांढऱ्या वस्त्रात गुंडाळण्यात आले आणि "टॉवर ऑफ सायलेंस"च्या बागेत नेण्यात आले. तिथे खांद्याला खांदा लावून गिधाडे बसली होती आणि आपल्या भक्ष्याची वाट पाहात होती.

अलुवाचे मृत शरीरास गिधाडांचे ताब्यात दिल्यावर एलिफार आपल्या आलिशान बंगल्याच्या पडवीत उभा होता. गडी अलुवाची पुस्तके हिरवळीवर नेऊन त्यांचा एकत्र गठ्ठा करून जाळत होते.

एलिफार बागेत आला. चिलखती गाडीच्या रंगाचे आकाश त्याचे डोक्यावर पसरले होते. "मला दुःख का होऊ नये?" तो गर्विष्ठ माणूस स्वतःशीच म्हणत होता. "अलुवाचे मृत्यूमुळे मला रोज अस्त पावणाऱ्या सूर्याला पाहून जितके दुःख


व्हावे त्यापेक्षा यत्किंचितही जास्त दुःख होऊ नये ? तिनं माझ्या प्रेमाची कधीच सवय करून घेतली नाही, तिनं मला पुत्रही दिला नाही, परंतु मृत स्त्री म्हणून अखेरीस माझी अंगठी तिच्या बोटात आहे. मला तिच्या मृत्यूचे दुःख होत नाही याचे कारण मृत्यूमुळे तिच्या स्वतःचे जीवनापेक्षाही ती माझ्याजवळ आली आहे."
शेवटच्या सूर्यकिरणांनी ती बाग एकदम प्रकाशली. सूर्याची लाल किरणे बागेत असलेल्या छोटया हौदात लाल माशांप्रमाणे चमकू लागली. एलिफारच्या डोक्यावरून एकदोन गिधाडांची सावली पसरली आणि त्या सावलीने लाल प्रकाश मालवून टाकला.

थोडचा वेळाने बागेचा माळी एलिफारसमोर आला आणि त्याचेसमोर नम्रतेने वाकून उभा राहिला. एका पानावर ओरबाडलेले माणसाचे बोट त्याने आणले होते आणि त्या बोटावर एक सोन्याची अंगठी चमकत होती. ते पाहिल्यावर तो तरुण पारशी एकदम भीतीने मागे सरकला आणि काळानिळा पडला.

एका गिधाडाच्या चोचीतून ते बोट पडले असे माळयाने सांगितले.

एलिफारने त्या मृत बोटातून अंगठी काढून घेतली. त्या अंगठीवर दोन सोनेरी घोडे कोरलेले आहेत. एका रेशमी कापडात गुंडाळून बोट त्याने पुन्हा " टॉवर "वर पाठवून दिले. अंगठी मात्र आपल्या खिशात टाकली.

आता तो सारखा दिवसभर खिशातली अंगठी चाचपत असतो. आणि त्याचा गर्व रडत आहे, रडत आहे !



[ माक्स डाऊथेंडाय यांच्या 'Unter den toten tuermen' या कथेचा अनुवाद. ]



## विद्याधर भागवत ▫ ▫ ▫

अक्का आजी म्हणजे नानेलीची. सावंतवाडीपासून आठ मैलांवर असलेल्या एका खेडेगावात राहाणारी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांची बहीण–

लहानपणी मी जेव्हा सानेगुरुजींच्या दूर्वांच्या आजीचे वर्णन वाचत असे, त्या वेळी माझ्या डोळ्यांसमोर अक्का आजीची मूर्ती उभी राहात असे–

अक्का आजी म्हणजे नानेलीची. सावंतवाडीपासून आठ मैलांवर असलेल्या एका खेडेगावात राहणारी. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर यांची वहीण. सर्व गाव तिला अक्का म्हणत असे. आम्ही लहान मुलं तिला 'अक्का आजी' म्हणत असू. मी तिला लहानपणापासून वृद्ध असलेलीच पाहात असे. अगदी आठ-नऊ वर्षांपूर्वी ती वारली, तेव्हा तिचे जे वय होते तेच वय माझ्या लहानपणापासून चालू आहे असे नेहमी मला वाटायचे.

लहानपणी पाहिलेलं एक दृश्य या वेळी माझ्यासमोर उमं आहे. धूसर, अंधूक...

पुष्कळसे रॉकेलचे डबे एकावर एक रचून एक भिंत वनविलेली आहे . . . एका मांगरात मधोमधच उभी केलेली...त्या भिंतीच्या एका बाजूस भाताची रास ओतून ठेवलेली...पाच–सहा गडी माणसं मोजताहेत––

'लाहाभ ऽऽ, लाहाभ ऽऽ, दोन, – दोन, दोन... एका घोगऱ्या आवाजाने मांगर भरून गेला आहे ... बाजूला पानसुपारीचा पितळी डबा घेऊन बसलेली 'तांबडी' आजी. सुपारी कातरीत अधून मधून काहीतरी बोलत असलेली. गोठ्यातील गुरांच्या एका निराळ्याच वासानं दरवळलेलं वातावरण. हंऽवेऽऽ' करून वासरं

# अक्का आजी

ओरडताहेत...' गुरं आली वाटतं, बांध गोऽ जरा...' मधूनच एक अधिकारवाणीचा आवाज. किरणाच्या कवडशाप्रमाणं प्रखर व धारदार.

एखाद्या जिवंत, बोलक्या चित्राप्रमाणं मला ते चित्र दिसतंय. मात्र तो पडदा अंधूक झालाय्. त्यातील ती मध्यभागी बसलेली आकृतीच तेवढी स्पष्ट दिसतेय्–

त्यानंतरचा पुढचा काळ आठवत नाही. आठवतो तो अगदी अलीकडचा–

अक्का आजीची घरातील शिस्त फार करडी. मात्र त्या करडेपणातही भावनेचा ओलावा ठिबकत असलेला. सर्व गावात ती प्रिय. तरीही तिची वागणूक विक्षिप्तपणाची वाटे. गावात कुठंही कुळवाड्याकडचं लग्न असो, हिच्या घरातील तांदळाची मदत तिकडे पोचायची! "औंदा खंडाचं भात नाही रे मिळालं; पण हे घेऊन जा

तू ! आणि उजव तुझ्या पोरीला." आणि मग घरातील भाताच्या पोत्यांपैकी अर्ध-अधिक पोतं रिकामं होई. पाणावलेल्या डोळ्यांनी तो बिचारा घरातून बाहेर पडे भाताच्या ओझ्यावरोबरच कृतज्ञतेच्या ओझ्यानं वाकून. भरल्या तोंडानं दुवा देत.

एखादं कूळ भाताचा खंड घेऊन यायचं–

"आकानू ? वो आकानू !"

"कोण रे बाहेर ?"

"मी तो घाडी. भात घेऊन इलंय."

"याच वेळी इकडं मरायला तुला सवड कशी मिळाली रे ? ऐन दुपारी ?"

खरं म्हणजे ती दुपार नसायची. दुपार कलून बराच वेळ झालेला असायचा; पण त्यावेळी तिचं अंग घुणं चाललेलं असायचं. पुढं रांधणं–जेवण वगैरे दुपारचे कार्यक्रम.

तिच्या त्या वाक्यावर उत्तर मिळे–

"नाय् वो ऽ धाकटयाचा अंग फडफडताहा. भाताचो गोटो झालो नाय् औंदा. आकाचा तरी भात घेऊन जावचा !"

"तुझ्याकडे भात असतं कधी ? दर वर्षी तुझी हीच रड. कोल्हापूरहून भाऊ यायचे आहेत. त्यांच्यापुढे तुझी तक्रार मांड जा काय ती."

"माझ्या झिलाच्या टाळवेवर हात लावून सांगतंय् आका. औंदा कायदिखील पिकला नाय् जमिनीच्या तुकडयात !"

"माझा दुपारचा वेळ खायला कशाला आलास रे ? अस्से मेले रोज छळतात! जा. तुला जे काही सांगायचं असेल ते भाऊंच्याकडे सांग जा. चालता हो ! ते तुझे धनी. मी कोण ?"

असं म्हणून ती तणतणत आत यायची. घाडी बाहेरील सोप्यावर बसलेला असायचा. खांबाला टेकून पायांची ढोपरं दोन्ही हातांच्या मेखीत घेऊन बाहेरच्या रणरणणाऱ्या उन्हाकडे पाहात ती अशीच अंगावर खेकसते. त्याला हे सारं माहीत असतं. अगदी अंगवळणी पडलेलं.

मग आतून आवाज यायचा—

"शंकरा, दोन घास खाऊन जा. दुपारच्या वेळी दारावरून उपाशी नको जाऊस बावा ! मात्र वेळ लागेल. आताच भात शिजत ठेवला आहे."

"आकाचो प्रसाद टाकून नाय जावचंच मी !"

मग त्याचं जेवण यथासांग व्हायचं. जेवायला तीन-साडे तीन वाजत.

"बरा आका! जातंय् मी !"

"थांब पोराच्या औषधाला हे पैसे घे. हयगय करू नकोस. माणगावच्या डॉक्टरला घेऊन ये. असला पोर मिळायचा नाही पुन्हा."

पाणावलेल्या डोळयांनी शंकर घाडी पुढच्या पायऱ्या उतरायचा.

सुटी पडली की आम्ही नानेलीला अक्का आजीकडे जात असू. आजीचं घर म्हणजे आमच विश्रांतीचं ठिकाण. आम्हाला एवढं मोकळं वाटायचं तिथं ! आठच तर मैल दूर. शनिवारी इकडे यायचं. सोमवारी पुन्हा परतायचं.

चोहोबाजूला हिरवागार माळ. त्याच्या पुढं अफाट सडा. नागमोडी पायवाट सुरंगीच्या आंब्याकडून पुढं सरसरलेली. एक वळण घेऊन पुढं गडप होणारी. सुरंगीच्या आंब्याकडे दर शनिवारी ठराविक वेळी तिचे डोळे लागायचे. आंब्यासमोरच्याच कोपऱ्यातील खोलीच्या दाराकडे ती बसत असे. ती ठराविक वेळ चुकली की तिला काही सुचत नसे. मग अनेक प्रकारच्या काळज्या तिच्या मनाला गुदमरून सोडीत. नाही नाही ते विचार तिच्या मनात येत. तो शनिवार तसाच निघून जाई.

"आहे कुठं यांना काळजी ? मी आपली बसते वेडयासारखी वाटेकडे डोळे लावून !" असे पुटपुटत ती घरात आपल्या कामाला निघून जाई. एखाद्या दिवशी सुरंगीच्या आंब्याकडे एक-दोन पांढऱ्या आकृत्या दिसू लागल्या की तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर टवटवी दिसे. मग घाईघाईने ती चुलीकडे निघून जाई. चहाचं आधण ठेवी. आळसून पडलेला तिचा दिवस मग जोराचा वेग घेई. घरात पाय ठेवल्यावर तिचा पहिला प्रश्न–

"खुशाल ना सगळे ?"

"हो."

"जा. पाय धुवून या. पाणी घ्या. गूळ आहे त्या डब्यात."

"थांब आजी. जरा बसतो आम्ही."

"थांब नाही नि बिम्ब नाही. पाय धुवा अगोदर. पाय धुतल्याशिवाय घरात यायचं नाही. मग बसा खुशाल काय ते. शनिवार आहे. शाळा-बिळा काही नाही."

मग कमी साखर व कमी पावडर घातलेला पांचट चहा आम्ही मोठ्या मुश्किलीनं घशाखाली ओतत असू.

"हं. आता हवे तेवढे लोळा बाहेर जाऊन !"

आमच्याकडून ती वाचून घेई. तिच्या ट्रंकेत दोन पुस्तके ठेवलेली असत. चांगल्या वेष्टणाखाली गुंडाळून ठेवलेली. एक असायचे–दत्तक व इतर गोष्टी. दुसरे 'कांचन मृग' ही कादंबरी. ही दोन पुस्तकं तिला जिवाहून प्यार वाटत.

'माझा भाऊ फार लांब आहे; पण या पुस्तकांच्या रूपानं तो माझ्याजवळ राहतो." गहिवरलेल्या आवाजात ती म्हणे. मग रात्री त्या पुस्तकांचं वाचन व्हायचं. मी मोठ्यानं कांचनमृगातील काही प्रसंग वाचून दाखवायचा. प्रत्येक प्रसंगाबरोबर तिचं गत-जीवन तिच्या डोळ्यांसमोर उभं राही. कितीतरी आठवणी जाग्या होत. सुपारी कातरीत ती आपले गत-जीवन आमच्यापुढं उभं करी. शिरोड्यातील खांडेकरांच्याबरोबर राहून घालवलेले ते दिवस...तो त्यांचा गरिबीचा संसार,

वगैरे सर्व वर्णन करून ती सांगे. तिची वर्णनपद्धती इतकी भावपूर्ण असे की ऐकणाऱ्याला गहिवरून यायचे. मग ती कादंबरी अपूर्णच राही.

"माझ्या भाऊनं किती गरिबीत दिवस काढलेन ! विघ्नेश्वरा तूच त्याला हे चांगले दिवस आणलेस रे बाबा!" मग नकळत तिचे हात डोळ्यांतील टिपं पुसत. गोष्टीवरून गोष्टी निघायच्या—

"ते समोरचं झाड आहे ना, त्या झाडानेच त्या रावळाचा सत्यानाश केलान्."

"काय झालं आजी ?"

"अरे होणार काय ? हे माजोरे लोक. यांचा विश्वास नाही देवाभुतांवर."

"तो आबा राऊळ मेला ?"

"तो मेलाच; पण त्याच्या पोरावरदेखील लागण आली."

आम्ही चेहऱ्यावर आश्चर्य दाखविलं की ती सांगायला सुरुवात करी—

"अरे, तो रावळाचा पोर. चार बुकं शिकलाय्. झाला लगेच माजोर. त्यानं बापाला अडविलं. बाप निघाला होता कोंबडा कापायला त्या झाडाखाली. दरसाल कापावा लागतो. ही देवस्की जर केली नाही, तर झाडावरचा तो समंध बसतो मग काठावर ! मग घुमताहेत आपले एक–एकजण ! त्या पोरानं कोंबडा कापायला दिलान् नाही. मग रे काय ? संध्याकाळी त्याच्या बापावर आलं वारं–'मी तुज्या घरचो सतिनास करतलंऽयऽ. माझा वार्षिक चुकलाहाऽऽ !'

सर्वजण घाबरले. बाप जो आजारी पडला तो उठलाच नाही. पोरानं काही माफी नाही मागितली. त्यालाही ताप भरला. बैल मेले. आता त्या घरात कुणीच नाहीत...

अरे, माझ्यावर काय कमी उठवलंय् ? मी या गावात नसाय झालेय् लोकांना. पण मी काही त्याचं वाईट नाही रे केलं ! तो विघ्नेश्वर पाठीराखा आहे माझा." मग लगेच हात जोडले जात. "माझ्या माणसांना सुखी ठेव रे विघ्नेश्वरा. सारेजण चांगल्या स्थितीत असताना एकदा डोळे मिटलेले बरे. अरे, जगात काय सगळेच दिवस सारखे असतात ? बरं-वाईट सगळं परमेश्वर बघतो. मी आपली स्वार्थी. बरं तेवढंच बघायला मागणारी !"

किती तरी वेळ ती गप्प असे. मग आमची चुळबूळ सुरू होई. एकजण घड्याळाकडे पाहू लागे. अकरा वाजून गेलेले असत.

"चला झोपा रे ! उद्या काही घाई नाही. लवकर नको उठायला."

आम्ही बाहेरच्या पडवीत झोपायला गेलो तरी बराच वेळ ती जागी असायची. देवापुढे नंदादीप तेवत असायचा. आम्ही झोपेनं पेंगुळलेले– तशा त्या स्थितीत पान-सुपारीच्या कातरण्याचा आवाज ऐकू येई.

पुढं नोकरीला लागल्यावर मला तिच्याकडे वरचेवर जाता येत नसे. पण सुटीत गेल्यावर मात्र–

" घोड्यावरून नाही ना आलास ?"
" नाही आजी. सुटी आहे."
" जाणार कधी ते सांग."
" परवा."
" मग आलास कशाला ? आताच चालता हो ! तुला कितीदा सांगून ठेवलंय् की आल्यासारखी आठ दिवसांची रजा काढून ये म्हणून ?"
असं स्वागत झालं की मग विचारपूस सुरू होई. " काय खबर तुझ्याकडची ?" मग चहा घेता घेता गोष्टीला आरंभ व्हायचा. रात्री जेवल्यावर—
" तू लिहितोस म्हणे हल्ली काही तरी ?"
" काय लिहिणार आजी ?"
" अरे मला तरी म्हणून दाखव तुझी कविता ! मी जास्त आग्रह करणार नाही. हवी तर म्हण." तिचा थोडा करडा स्वर ऐकला की मी एखादी कविता म्हणून दाखवी. तिला त्यातलं काय कळत असे, देव जाणे ! पण लगेच तिचं मन मात्र गतस्मृतींकडे धाव घेई. तिला बोलायला फार हवे होते. कवितेवरून ती यशवंतांची 'आई' कविता म्हणून दाखवी. तिला ती सर्व पाठ येत असे. शिरोड्याचे जीवन तिला पुन्हा आठवायचे. भाऊंच्या एक एक गोष्टी सांगू लागली की तिचे हृदय गदगदायचे. आमचंही तसंच होई. मग मी म्हणे—
" आजी, खरंच तुझे हे अनुभव म्हणजे महाकाव्य आहे !"
" बाबा, हे सर्व सोसलंय् रे मी ! हृदयातले अनुभव हृदयच बोलतं...त्यापुढं माणसाचे शब्द फिके पडतात !"
आजीच्या या उद्गारांत जिवंत काव्य असे. शिकलेल्या माणसालादेखील असले विचार सुचायचे नाहीत.
आपल्या हेकेखोर स्वभावानं तिनं आपल्या प्रकृतीची आबाळ मात्र केली होती. तिचा देह खंगत चालला.
आठ वर्षांपूर्वीचा तो प्रसंग अद्याप माझ्या डोळ्यांसमोर उभा आहे—
सुटी असल्यामुळं मी माझ्या भावाला घेऊन नानेलीला गेलो होतो. योगायोग वेगळेच असतात. माझे वडीलही त्याचवेळी घरून आले होते. आमची ती खेप तिच्या सान्निध्यातली शेवटचीच ठरली होती.
दुपारी जेवण झाल्यावर आजी उठली. ती लवकर का उठली ते आम्हाला कळेना. घरासमोरच्या खळ्यात गेली. सभोवार परड्यात नजर फेकली. आपल्या गोठ्यात पाहिलं. पूर्वी त्या गोठ्यात अनेक गुरं असायची. आता तिथं फक्त दोन म्हशी होत्या. आजी एकटीच राहायची. तिला कशाला हवी होती एवढी गुरं ? सर्व गुरं तिनं पूर्वी अशीच वाटून टाकली होती.—
" हां. ही गुणी म्हैस तुझी. तुझी मुलं दूध पितील हिचं. मला काय करायची

आहे ?" कितीतरी लोकांवर तिने असे उपकार करून ठेवले होते.

त्या दिवशी तिनं म्हशीच्या अंगावरून हात फिरवला. आपल्या आवडत्या चिंचेच्या झाडाखालून फिरून आली.

"माझा भाऊ मला आता भेटायचा नाही ! विघ्नेश्वरा, सर्व मुलांवाळांना सुखी ठेव."

ही असं काय करते आहे, कुणालाच कळेना. मी अगदी गोंधळून गेलो.

"काय होतंय् आजी ? आज बरं नाही वाटत ?"

"नाही रे ! सर्वांची आठवण आली. आता गेलं पाहिजे मला. विघ्नेश्वराचं बोलावणं येतंय् !"

"आजी, तू फिरू नकोस. झोप जरा."

"झोपायचं आहेच रे ! आता कोण उठणार आहे पुन्हा ? त्यापूर्वी सगळं पाहून घेतेय्."

तिचे ते उद्‌गार ऐकून सर्वांची हृदयं पिळवटून गेली. माझ्या लहानग्या भावाला तिनं हाक मारली; "दिनू !"

"काय आजी ?" त्यानं आचवून विचारलं.

"तुझं मराठी चौथीचं पुस्तक आहे ना रे ?"

"होय. मी दाखवू वाचून त्यातल्या गोष्टी ?" त्यानं विचारलं.

"हो. दाखव वाचून."

मग माच्यावर बसून पानसुपारीचा डबा उघडीत ती म्हणाली.

"सगळं नको. माझ्या भाऊची गोष्ट तुझ्या पुस्तकात असेल तर वाच."

"होय आजी. ही बघ."

"वाच तर."

दिनूनं वाचन सुरू केलं. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या.

दिनूनं विचारलं, "आजी तू रडतेस ?"

"होय बाळ. माझा भाऊ या वेळी कोल्हापूरला आहे रे ! तो मला आता कसा भेटणार ? तू धडा वाचलास की तो मला माझ्याजवळ आहे असं वाटतं. वाच पुढं—"

वातावरण गहिवरलं....सर्वांची अंतःकरणं थरारलीं. "हं पुरे ! भाऊ भेटला मला माझा ! आता मी सुखानं मरेन."

असे ती बोलते न बोलते तोच तिला एकदम झटका आला.

सर्व डॉक्टरी उपाय थकले. दुसऱ्या दिवशीच तिनं जगाचा निरोप घेतला !

अक्का आजीला जाऊन आठ-दहा वर्षं झाली आहेत, पण भाऊ भेटला नाही, म्हणून भावानं लिहिलेल्या एका लेखावर समाधान मानून शेवटचा श्वास सोडणारी अक्का आजी माझ्या हृदयात कायमची राहिली आहे.... ● ● ●

कॅल्शियमयुक्त

# बिटको

## ग्राइप

नेहमी दिल्याने
लहान मुले सशक्त, बांधेसूद
व गुटगुटीत होतात.

अत्यंत लोकप्रिय

# बिटको

## काळी
## टूथ पावडर

नेहमी वापरल्याने
दात मोत्यांसारखे स्वच्छ
व चकचकीत होतात.

## बिटको केमिकल इंडस्ट्रीज,

नाशिक रोड.

आता माझ्या मनातली हुरहुर थांबलेली असते.
कमलमधील एका ध्येयवेड्या करारी मनानं पुन्हा मला जिंकलेलं असतं.

**जीवन बोरले**

# कमला

ऑफिसात पोहोचताच मी प्रथम गणू चपराश्याला बजावतो, " मिस् देशमुख आल्या की प्रथम माझ्याकडे पाठव त्यांना."

"जी साहेब." गणू चपराशी उत्तरतो, अन एक झोकदार मिलिटरी टाईप सलाम ठोकतो. त्याचा सलाम स्वीकारत मी केबिनमध्ये आपल्या खुर्चीत जाऊन बसतो. टेबलावर पडलेल्या फाईली उगाचच चाळतो. सकाळच्या डाकेनं आलेलं टपाल नजरेखाली घालतो. नकळत पत्रांचं वर्गीकरण करतो. अन् नेमका त्या वेळी त्यात मिस् कमल देशमुखांचा आजारी रजेचा अर्ज दिसतो. माझ्या कपाळाला आठ्या पडतात. आखलेला कार्यक्रम रद्द करावा लागणार म्हणून माझ्या रागाचा पारा चढतो.

आतापावेतो ऑफिसातील सारा स्टाफ आलेला असतो. आफिसचं ' रुटीन वर्क ' सुरु झालेलं असतं. पंख्याची गरऽऽगर वाढलेली असते. जा-ये चालू झालेली असते.

मी संतापानं कॉल-बेल वाजवतो, तसा गणू चपराशी आत येतो. यावेळी तो किंचित घाबरलेला दिसतो. रागानं त्याच्यावर खेकसण्याचा विचार होतो. पण मी टाळतो.

"काय रे, मिस् देशमुखांचा हा अर्ज कुणी आणून दिला?" संतापाचे भाव चेहऱ्यावर येऊ न देता मी त्याला विचारतो.

"त्यांच्या धाकटचा भावानी दिला आणून. म्हणाला, काल रात्रीपासूनच बरं नाही त्यांना." गणू स्वत:जवळ असलेल्या माहितीची शिदोरी सोडतो.

"मग आधी का सांगितलं नाहीस तसं.—बरं जा, मिस्टर कापसेंना पाठवून दे आत." मी त्याला सूचना करतो.

तो निघून जातो. मी मिस् कमल देशमुखांचा अर्ज पुन्हा वाचतो. एक एक अक्षर...एक एक शब्द पुन्हा पुन्हा...

मिस्टर कापसे येतात. आपल्या नेहमीच्या पद्धतीनं मॅनिला शर्टची कॉलर एका हातानं वरचेवर सावरीत–दुसऱ्या हातात पेन पकडलेलं असतं त्यांनी. या वेळी त्यांचा पांढराशुभ्र कापसासारखा टिनोपाल-वॉश केलेला मॅनिला शर्ट माझ्या डोळ्यांत खुपतो.

" हे बघा मिस्टर कापसे, मिस् देशमुखांचा आजारी-रजेचा अर्ज आलाय आज. कालचं स्टेटमेंट हेड ऑफिसला आजच डिसपॅच व्हायला हवं नि ते तर टाईप-देखील झालेलं नाही—" मी सिरीअसपणे बोलतो.— " तुम्ही असं करा, मिस्टर नवघरेंना तुमच्या टेबलावर बसायला सांगा. तुम्ही स्वत: तेवढं टाईप करून घ्या. जमेल ना ? "

" यस सर, मी करतो सारी अ‍ॅरेंजमेन्ट. " मि. कापसे निघून जातात. अन दोन-तीन मिनिटांनीच टाईपरायटरची फटऽऽफट सुरू होते. मला मात्र कसली तरी हुरहुर वाटू लागते. टाईपरायटरचा फटऽफट असा आवाज कानांवर पडतो. पण तो आवाज आज कानाला गोड वाटत नाही. आवाजात ती लय नसते. तो आवाज अगदीच वेगळा वाटतो—–नाटकात स्त्रीपार्ट करणाऱ्या नटासारखा !



माझी अस्वस्थता वाढते. कामातून लक्ष उडते. घड्याळाच्या काट्याकडे सारखी नजर फिरते. कसं तरी काम रेटतो. ऑफिस संपल्यावर घरी पोहोचतो.

सकाळच्या सजविलेल्या फ्लॉवर-पॉटमधील फुलं कोमेजलेली असतात. नीटनेटकं केलेलं सामान अस्ताव्यस्त पडलेलं दिसतं. मला खोलीत बसावसं वाटत नाही. माझ्याच खोलीचा मला उबग येतो. एकटेपण खायला उठते. मी दाराला कुलूप घालतो. स्कूटर स्टार्ट करतो. कुठं जायचं हे ठरलेलं नसतं. स्कूटरचा वेग मात्र वाढतो. हात-पाय आपलं काम करतात.

रस्त्यात अपरिचित-परिचित चेहरे मागे टाकले जातात. डांबरी रस्त्यावरून स्कूटर खारीसारखी पळते. नकळत स्कूटर एक वळण घेते अन् मला आठवतं हा रस्ता मिस् कमल देशमुखांच्या घराला जाणारा आहे. मी अनेकदा या रस्त्यानं फिरल्याचं आठवतं. पण अनेकदा या रस्त्यानं फिरून एकदाही मी तिच्याकडे गेलेला नसतो. खरं म्हणजे तिनंच मला टाळलेलं असतं. माझी तयारी असून, इच्छा असून तिनंच मला चुकवलेलं असतं.

" ऑफिसचे साहेब एका साध्या टायपिस्टकडे येतात, बरोबरीच्या नात्यान वागतात, एकत्र फिरतात, हसतात, खिदळतात, मजा करतात. चाळीतल्या लोकांनी हे पाहिलं तर काय वाटेल त्यांना ? भलताच संशय घेतील ते. आपण बाहेरच भेटत चलू. " तिच्या संवादाची टेप-रेकार्ड मी वाजवतो. मीही तिच्याशी बोलत असल्याची नक्कल करतो—" अग, आपलं एकत्र फिरणं-वागणं-हसणं-खिदळणं पाहून त्यांना वाटावं कमलचं नि तिच्या ऑफिसातील साहेबाचं प्रेम-प्रकरण सुरू झालंय म्हणून. आता लवकरच लाडू मिळणार. कमलनं आपल्या जाळ्यात चांगला देवमासा पकडला. भारीच चतुर आहे पोरगी, इत्यादि सारं वाटावं त्यांना म्हणून तुझ्या घरी मला वारंवार यायलाच हवं. मी माझे संवाद बेमालूमपणे बोलतो. या वेळी ती स्कूटरवर माझ्या पाठीमागे माझ्या गळ्यात आपले नाजूक हात टाकून बसली असल्याचा भास होतो. सारं अंग शहारतं—गोड संवेदनांनी. पण तो नुसता भासच असतो क्षणापुरता.—मात्र आता तिची गोड मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहाते. असंख्य आठवणी घेऊन सिमीनरी हिलच्या नागमोडी वळणाची चढण आता लागलेली असते. गेअर बदलण्याची गरज वाटते.

आता मला जाणीव होते—तिच्या घराचा रस्ता ओलांडून आपण खूप दूरवर आलेलो आहो याची. पुढे जावसं वाटत नाही. सिमीनरी हिलवर फिरायला येणाऱ्यांची तुटक वर्दळ चालू असते. मी रोडच्या बाजूला असलेल्या बाकावर सागाच्या झाडाखाली बसतो. बसायला मन होतं म्हणून बसतो—एकटाच...कमल देशमुखाच्या असंख्य आठवणी घेऊन.

यावेळी मला वाटू लागतं...या एकांतात कमल देशमुख हवी. अशी जवळ...

अगदी जवळ. दोघांमध्ये तसूभर अंतर राहाणार नाही इतकी जवळ...एकमेकांना अगदी बिलगून. ऑफिसात बोलता येत नाही. फिरायला गेल्यावरहि एकांताच्या अभावी उघडं करता येत नाही ते सारं इथं सांगण्यासाठी. कधी न घेतलेलं तिचं शरीर मिठीत घेण्यासाठी...

मी नकळत असाच तिच्या विचारांत खोल खोल शिरतो.......

सडपातळ, गव्हाळचा वर्णाची, केसाचा अंबाडा पाडणारी कमल देशमुख टायपिस्ट म्हणून कामावर रुजू होते. पहिल्याच दिवशी ती माझ्या मनात भरते. मला ती आवडते एका वेगळ्या अर्थानं. तिच्या ठिकाणी मला हवी असलेली व्यक्ती दिसते. तिच्या डोळचांत मला माझंच प्रतिबिंब दिसतं. मी तिच्यावर भाळला जातो.

ऑफिसचं नवीन वातावरण...नवीन काम, नवीन अपरिचित चेहरे. ती बुजते... संकोचते, घाबरते. अनेकदा चुका करून बसते. कामातील चुकांबद्दल कापसे तिला बोलतात. तिच्यावर आपले इम्प्रेशन मारण्याचा प्रयत्न करतात. मी हे सारं पाहात असतो. तिच्या हालचालींवर नजर ठेवण्याचं मला वेडच लागलेलं असतं.

एक दिवस अनाहूतपणे ती केबिनमधे येते.

" सर, मला परवानगी हवी. " ती काहीशी संकोचून बोलते.

" कशासाठी बुवा ?" मी आश्चर्यानं विचारतो.

" माझं टायपिंगचं काम बरचसं पेंडिंग असतं रोज. ऑफिस अवर्समध्ये संपत नाही. ते ओव्हर-टाईम बसून करावं म्हणते मी. "

" काय, एकटचा बसणार ऑफिसात तेवढचासाठी ?"

" एकटी कुठे—चौकीदार राहील ना सोबतीला. "

" बरं, तुमच्या इच्छेनुसार. बाकी तुम्ही ओव्हर-टाईम बसावं असं मला मुळीच वाटतं नाही. दिवसभर काम करून थकल्यावर ओव्हर-टाईम बसायला मन तरी लागेल का ?"

" सकाळी एक तास आधी येऊन करणार आहे मी काम. "

" अच्छा, मग दिली परवानगी. बाकी कामाचा ताण पडायला नको शरीरावर, तसा मनावर. " मी किंचित हसरा चेहरा करून बोलतो.

कसल्यातरी जाचातून सुटल्याचं समाधान तिच्या चेहऱ्यावर खेळतं. समाधानी मनानं ती परतते.

दुसऱ्या दिवसापासून रोज ती एक तास आधी येऊन कामाला लागते. त्या दिवसापासून मीही एक तास आधी येऊ लागतो. काहीतरी काम काढून, मुद्दाम काही काम काढून तिच्याशी बोलतो. तिच्या अंतराचा ठाव घेण्याचा प्रयत्न करतो. तिची खाजगी विचारपूस करतो घरगुती बाबतींत.

ती मात्र माझ्याशी मर्यादेनं वागते. मी ऑफिसचा बॉस आहे हे जाणूनच ती माझ्याशी बोलते. तिचा प्रत्येक शब्द विणेच्या तारा छेडून निघणाऱ्या स्वरांसारखा

असतो–हृदयाला खोलवर जाऊन भिडणारा ! वागताना-बोलताना प्रत्येक ठिकाणी मर्यादा, संयम, विवेक, शिष्टाचार ती पाळते. प्रत्येक कृती तिची नाजूक, रेखीव कोरलेल्या शिल्पासारखी मनावर आपली छाप ठेवून जाणारी असते. मी तिच्या खाजगी जीवनात अधिकच खोल शिरण्याचा प्रयत्न करतो. कारण मला ती हवी असते.

माझ्या सलगीमुळे ती संकोचते. कधी कधी अबोल बनते. आपली पातळी टिकवून धरते. शिष्टाचाराच्या लक्ष्मण रेषा ओलांडण्याचं टाळते. मी मात्र तिच्याशी मोकळेपणानं वागतो. माझ्या मनात तिच्याबद्दल निर्माण झालेली ओढ मी तिला बोलून दाखवतो, तिला विश्वास देतो.

अन् तेव्हा कुठे तिला माझ्या डोळ्यांतील भाव कळतात. ती परकेपणा विसरते. तिऱ्हाईतपणाची वागणूक सोडते. ऑफिसव्यतिरिक्त आपले काही खाजगी रिलेशन आहे याची जाणीव तिला होते. माझं मन, माझ्या भावना दुखवणार नाहीत याची ती खबरदारी घेते. माझा एक एक शब्द कानांत पंचप्राण आणून ऐकते. तिचे डोळे माझ्या हालचालींवर वेड्यासारखे स्थिरावतात. तिच्या मनात मी–दिलीप नाडकर्णी शिरलेला असतो. दिलीप–नाडकर्णी ऑफिसचा बॉस म्हणून नव्हे–तर तिचा प्रियकर दिलीप...फक्त तिचा दिलीप, तिच्या हृदयाचा राजा–तिच्या सर्वस्वाचा स्वामी ! त्यानंतर एका वर्षात कितीतरी मधुर घटना घडतात. स्वप्न रंगवलं जातं. मनोरथांचा महाल उभा केला जातो. मिस् कमल देशमुखला मिसेस नाडकर्णी–मिसेस दिलीप नाडकर्णी बनविण्याचं माझं स्वप्न (पोटात गर्भ वाढावा तसं) वाढत जातं....

* * *

अंधार पडायला लागतो. मी स्कूटर स्टार्ट करतो. रिकामं मन अधिकच रिकामं होतं. मनाला लागलेली हुरहुर सारखी वाढते. स्कूटरचा वेग न वाढविता मी निघतो.

रस्त्यावरचे दिवे लागलेले असतात. रहदारी वाढलेली असते. मी नकळत स्कूटर कमलच्या घराकडे वळवतो. ओळखीच्या खुणा नजरेखाली घालतो.

किराण्याचे दुकान दिसते. त्यामागे एक लांबशी चाळ, समोर मैदान अंगणासारखं, मैदानातच एक नळ पाण्याचा. ऐकलेल्या खुणा जागच्या जागी दिसतात. ओळख पटते.

मी एका गृहस्थाला विचारतो, " काय हो, कमल देशमुख राहातात ना इथे ?"

" हो की, ब्लॉक नं. ३. " तो उत्तरतो.

" थँक यू. " मी त्याचे आभार मानतो. स्कूटरच्या आवाजानं आतून एक दहा-बारा वर्षांची मुलगी बाहेर येते तीन नंबरच्या ब्लॉकमधून. मी तिला विचारतो, " कमल आहेना घरी ?"

" आहे की. कालपासून आजारामुळं पडून आहे बेडवर. थांबा हं. मी ताईला निरोप देते. "

मी अंगणातच उभा असतो.

" अय्या, तुम्ही ! या ना आत. असे बाहेर का उभे राहिलात आतापावेतो ?" ती दारात येऊन माझं स्वागत करते. तिच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटते. दोन दिवसांच्या आजारानंच ती फार अशक्त दिसते. चेहरा सुकलेला. केस विस्कटलेले...साडी चुरगळलेली. सारं काही अस्ताव्यस्त असतं. ती मला खणेनं बसायला सांगते. मी मुकाट्याने खुर्चीवर बसतो.

ती आत जाऊन कसली तरी सावरासावर करते.

" कमल, तूं आजारी आहेस ना ? मग हे काय चालविलंस, निवांत बसायचं सोडून ?" बोलल्यावाचून मला राहावत नसतं.

" आज तुम्ही आलेत नि नेमकी आई बाहेर गेलेली आहे. तुम्ही प्रथमच आलात घरी माझ्या...म्हणून—"

" म्हणून काय एवढी वर वर कर म्हणतोय मी? बरं, जाऊ दे. तुझी प्रकृती कशी काय आहे ? औषध घेतलंस ना !"

" घेतलं ना, पण तुम्ही वाट कसे चुकलात आज ?" खुर्चीत बसत ती मला विचारते.

" तुझा आजारी रजेचा अर्ज दिसला. वाटलं ज़ावं पाहून प्रकृती कशी काय आहे ? ह्या निमित्तानं तरी दर्शन झालं तुझ्या घराचं. "

" कसं काय वाटतं आमचं घर ?"

" वा. अगदी छान. घर म्हणून असायला हवं तसं."

" साध्या फराळासाठी इतकी स्तुती जास्त होणार बरं "—ती हसते. फुलाच्या कोमजलेल्या पाकळ्यांतून सुगंध पसरावा तशी. मीही हसतो. ती आपल्या छोट्या बहिणीला काहीतरी आणायला बाहेर पाठवते. घरात आम्ही दोघेच उरतो. घरात यावेळी एकांतवास, अगदी निःशब्द शांतता, मला हवी असलेली शांतता असते जे विचारावसं वाटतं ते विचारण्यासाठी. एकमेकांना अधिक समजून घेण्यासाठी.

मी सांगतो—" संगमची दोन तिकिटं आणली मी आजच्या पहिल्या खेळाची. पण तुझा रजेचा अर्ज दिसला नि बेत फसला माझा. जाऊ दे. तुझ्या प्रकृतीपुढे सिनेमाचं काय मोठसं ?"

" मग ती काय वाया घालविता ? सोबत कुणाला घेऊन जायला हवं होतं."

" ज्यांच्यासाठी खरीदले ते त्यांच्याच उपयोगी पडलेले आवडते मला"

" म्हणजे आता ते वाया जाणार असच ना."

" अर्थातच."

" तुम्ही मोठी माणसं. सामान्य जगाहून तुमचं जग वेगळंच असणार."

" अन् माझ्यापेक्षा सारं वेगळं तुझं असतं. एका वर्षात आणलंस कधी मला घरी ? तुझ्या घरच्या लोकांशी दिलीस माझी ओळख करून ? दर वेळी तू टाळलस मला. आज हट्टानं आलो, म्हणून घर तरी बघायला मिळालं." मी हट्ट करावा तसं बोलतो.

ती अबोल बनते या वेळी. कसल्या तरी विचारांचे भाव चेहऱ्यावर उठतात. शांत पाण्यात उठणाऱ्या तरंगांसारखे ! कसल्या तरी गुंगीत ती शिरते.

"अग, बोल की." मी तिला जागवतो.

"माझ्या घरची सारीच माणसं ओळखतात तुम्हांला. तुमच्याबद्दल आदर आहे प्रत्येकाच्या मनात." धागा जोडावा तशी ती बोलते.

"फक्त आदरभाव ?" मी तिच्याकडे तिरकस नजरेनं पाहात विचारतो.

माझ्या तिरकस नजरेत तिला काहीतरी गवसतं. डोळयांची भाषा ती ओळखते. मग स्वतःच काहीतरी विचार करू लागते.

"अग कमल."—माझा स्वर आर्द्र बनतो—आवाज कंप पावतो.

"हूं !" ती साद देते.

"किती दिवसांपासून विचारावी म्हणतोय मी—एक गोष्ट. आज विचारतो. कमल, अव्हेरणार तर नाहीस ना ?"

"विचारा. गोष्ट माझ्या शक्तीपलीकडची असायला नको म्हणजे झालं."

"कमल, या वर्षी माझी बदली होण्याची शक्यता आहे ग!" मी एखादं गुपीत सांगावं तसं बोलतो. थोडा घुटमळतो.

"आज तर झालेली नाही ना ?" ती मला धीर देते.

"बदली झाल्यावर मी एकटाच निघून जाईन. अगदी एकटा. जसा आलो तसा एकटा. पण या वेळी एकटं जाणं किती जड जाईल मला. हृदयाचा एक तुकडा इथं सोडून जाण्यासारखं होईल ग मला."

"म्हणजे. मी समजले नाही." कोडं पडल्यासारखं ती बोलते.

"कमल, तुला इथं सोडून मला कसं जाता येईल ग ? म्हणून वाटतं त्या आधी आपलं लग्न व्हायला हवं. तूं आईजवळ या बाबतीत कुणाकरवी बोल. मी आई-जवळ तुला मागणी घालायला येईन. तू दूर......मी दूर आता हे दूरपण मला असह्य झालं ग ! मला छळतं हे दूरपण, आज तू ऑफिसात नव्हतीस......सारा दिवस घडयाळाच्या काटयांकडे पाहात घालविला मी. घरी गेलो—घर खायला उठलं मला. एकटेपणाची जाणीव भुतासारखी पाठीशी लागली बघ माझ्या. कमल, मी तुझ्यापासून दूर राहूं शकत नाही ग." मी भावनाविवश होऊन बोलून जातो. कमलच्या चेहऱ्याकडे पाहू लागतो.

ती गंभीर झालेली असते. खिडकीतून रोडवर प्रकाशणाऱ्या मर्क्यूरी लाईटकडे ती पाहात असते. खोलीत गंभीर शांतता पसरलेली असते.

"कमल, मी काय म्हटलं ऐकलंस ना. बोल तुला काय वाटतं......तुझ्या मनात काय येतं ?"

ती खिडकीतून आपली नजर आत घेते. कसल्या तरी विचारतंद्रीतून जागी होते.

"माझ्या मनात येणारं ऐकून घ्याल तुम्ही?" ती एकदम सारे शब्द बोलून जाते.

— स्वप्नात बडबडावं तसं.

"तूं माझं ऐकून घेतेस मग तुलाही हक्क आहेच की मला ऐकायला भाग पाडण्याचा."

"खरंच! मी सांगेन त्याप्रमाणे वागाल तुम्ही?"

"माझ्या हिताचं असल्यावर मी का वागू नये?"

"आपलं लग्नच होऊ नये......या मोहापासून आपण दूरच राहायला पाहिजे." या वेळी ती आपला स्वर कठोर करते.

"कमल, हे ग काय ? तुला वेड तर —" माझ्या मनावर तिचे शब्द कुऱ्हाडीसारखे घाव करतात. मला काहीच सुचेनासं होतं.

ती बोलते — "खर सांगू, माझ्याशी लग्न करून तुम्हाला सुख मिळणार नाही. तुमच्या ऑफिसातील एक साधी टायपिस्ट अन् त्याच ऑफिसचे तुम्ही साहेब. कसं हो शोभणार हे सारं तुम्हाला."

"टायपिस्ट काय माणूस नसते. त्याला काय भावना नसतात. माणूस माणसावर प्रेम करतो. संसार माणसाशीच करावा लागतो — रक्तामांसाच्या माणसाशी. ऑफिसातील लहानमोठ्या पदांचा ह्याच्याशी काय संबंध ?"

"लहान-मोठ्या पदांचा परिणाम माणसाच्या खाजगी जीवनावरही झालेला असतो. तुमच्या अपेक्षा — माझ्या अपेक्षा यांतच पाहा किती अंतर दिसेल. तुमच्या अपेक्षा निळ्या आकाशाच्या उंचपणाचा वेध घेण्यासाठी आतुर असतात नि माझ्या — जमिनीवरच सरळ चालता यावं याच्या धडपडीत असतात."

ती काहीतरी गूढ बोलते.

"कमल, तुला म्हणायचं तरी काय ?" मी स्पष्टच विचारतो.

"मला वाटते तुमच्या-माझ्या आपल्या साऱ्यांच्या हितासाठी आपला स्नेह — आपलं प्रेम लग्न-बंधनात बांधला जायला नको आहे. तुम्हाला — तुम्ही माझ्या घरातील एक समजून सांगते मी..." ती अधिक मोकळी होते. पण तिचा मोकळेपणा या वेळी मला बोचतो.

ती पुन्हा बोलू लागते — "मी माझ्या आईचं पहिलं अपत्य. घरातली आजच्या स्थितीला एकुलती एक कमवती मुलगी. घरात मला धरून पाच जीव. आई, सुधीर, विमल नि विलास. या साऱ्यांचं भवितव्य माझ्यावर अवलंबून आहे. सुधीर कमावता होईपावेतो लग्न करून मी माझं स्वतःच सुख पाहिल तर — यांचं काय होईल ? सुधीरचं कॉलेज सुटेल. विमल-विलासची शाळा बुडेल. दोन वेळेच्या जेवणाचीसुद्धा विवंचना पडेल. अन् हे सारं विसरून मला संसारात पतीच्या सहवासात, प्रीतीची चांदरात अनुभवता येईल का ? मी माझ्या पतीला सुख देऊ शकेन का ?" तिचे डोळे पाणावतात.

"पतीला हवं असणारं सुख मी देऊ शकेनही. पण माझ्या मनात पेटलेली आग,

जाळणारी चिंता माझं मन टवटवीत, प्रसन्न ठेवणार नाही. पतीला हवी पत्नी सदा गुलाबाच्या फुलासारखी टवटवीत, सुगंधानं भरलेली......कधी न कोमेजणारी. रसमय फुलासारखी, भुंग्याच्या प्रतीक्षेत अधिरतेनं क्षणक्षणानी विरहकाल मोजणारी ......अन् मी......"

"मग तू लग्न करणार नाहीस ?"

"सध्यातरी माझ्या मनात तसा विचार नाही. मला तो आणता येत नाही. माझं ध्येय सफल झाल्याशिवाय–सुधीर कमावता झाल्याशिवाय–कुटुंबाचे कर्तेपण सुधीरच्या हातांत सोपवल्याशिवाय मला लग्न करता यायचं नाही. संसाराचा डाव मांडता यायचा नाही."

"आजपर्यंत आपलं हे प्रेम कशासाठी होतं ? याचं अंतिम ध्येय तुझ्या दृष्टीनं काय होतं ? काय समजून तू मला साथ दिलीस ?" तिचा ध्येयवाद मी बाजूला सारतो.

"मला तेच सांगता येत नाही. हा प्रश्न मी स्वतःला विचारला. अनेकदा विचारला. पण उत्तर माझं मलाच मिळालं नाही. उत्तर फक्त मिळतं अश्रूंच्या रूपानं. मी स्वतःच रडून घेते. बाकी तुमचा स्नेह...तुमचे प्रेम...तुमचा आधार मला हवासा वाटतो. माझं जीवन तुमच्या प्रेमाशिवाय—"

आता ती रडते. गालांवर ओघळणारे अश्रू विजेच्या प्रकाशात मोत्यांसारखे चमकतात.

"मग हे प्रेम जपून तरी काय करायचं ?" मी व्यवहारी दृष्टीनं प्रश्न टाकतो. मी माझ्या भावनाविवश मनाला सावरतो.

"मला हे प्रेम जपायचं आहे...हे सारं सांभाळायचं आहे. स्त्रीच्या जीवनात सांभाळण्यासारखी प्राणाहून मोलाची जी वस्तू असते–ती मला सांभाळायची आहे त्या क्षणाच्या आगमनासाठी. माझी साधना सफल होण्यासाठी. तुमच्यावर केलेली भक्ती सफल ठरण्यासाठी. मला तुमच्यावर प्रेम करावं लागणार आहे. तुम्ही मला झिडकारून देईपर्यंत...माझा अव्हेर करीपर्यंत."

"मी काय समजायचं शेवटी ?"

"माझ्यावर तुमचा विश्वास उरला असेल तर तुमच्या मनाला कळेल सारं."

"म्हणजे तुझं माझ्यावर प्रेम आहे. माझ्या प्रेमाशिवाय तू जगू शकणार नाहीस असच ना ?" मी गुपित उघडावं तसा बोलून जातो.

तिच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसतात. तिचा चेहरा उजळतो. ती उठून आत जाते.

बाहेरच्या खोलीत मी एकटा उरतो...घड्याळात साडेसात वाजतात.

गुलाबी रंगाच्या सरबतानं भरलेला पेला घेऊन ती बाहेर येते.

"आज एवढाच पाहुणचार करते तुम्हाला...अन् आई येईपर्यंत थांबाल तर

काही गोडधोड मिळेल." सरबताचा पेला माझ्या हातांत देत ती बोलते.

"तू घेणार नाहीस सरबत?" मी विचारतो.

"नको. प्रकृती सुधारायला हवी ना लवकर."

"मी एकटा पिणार नाही. शिष्टाचाराला शोभत नाही हे."

"माझी शपथ आहे तुम्हाला...आज प्रथमच आलात तुम्ही घरी. साधं सरबतही घेतलं नाहीत अन् हे आईला कळलं तर किती वाईट वाटेल तिला."

"अन तुला?"

"ते तुम्हांलाच कळायला हवं" ती खुलते. तिच्या चेहऱ्यावरचा पूर्वीचा गंभीरपणा गेलेला असतो. एक मिश्कील खट्याळपणा उमटतो.

"अस्स होय?" उत्साहानं मी बोलतो. सरबताचा पेला ओठांना लावतो. ती आपले डोळे माझ्यावर ठेवते. माझी हालचाल नजरेनं टिपते.

पेला अर्धा रिकामा होतो. तसाच तो मी टेबलावर ठेवतो. तिच्याकडे पाहात मी म्हणतो--"एकटं प्यायलादेखील कससंच वाटतं. सरबत किती छान केलेस तू! पण तूच प्याली नाहीस. सरबताची लज्जतच सारी वाया गेली त्यामुळं."

"अस्स!" ती किंचित हसते.

टेबलावरचा उष्टावलेला सरबताचा पेला ती हातांत घेते. क्षणाचाही विलंब न लावता ती ओठाला लावते. पाहता पाहता अधाशासारखी सरबत सारं पिऊन टाकते.

मी आश्चर्यानं तिच्याकडे पाहातो. तिच्या चेहऱ्यावर कसल्यातरी समाधानाचं तेज दिसतं.

मी विचारतो--"उष्टावलेलं सरबत का प्यालीस? आजारी माणसानं दुसऱ्याची उष्टावलेली वस्तू प्यावी का? अशानं एखादा नवीनच रोग व्हायचा तुला!"

"उष्टावलेल्या सरबताच्या गोडीपुढं त्याची कसली भीती. अन रोग का अजून व्हायचा राहिला मला–एक वर्षापासूनच जडलाय तो!" तिच्या शब्दांचा रोख मला कळतो, मी हसतो, तीही हसते. खोलीतील वातावरणही हसतं. मनमोकळेपणानं पौर्णिमेच्या चांदण्यासारखं!

मला माझं उत्तर मिळालेलं असतं. माझ्या मनातील एकाकीपण नाहीसं होतं.

घड्याळात आठाचे ठोके पडतात. मनगटी घड्याळ त्याला दुजोरा देते.

"बराच वेळ झालाय ग! मी निघतो आता. आईला माझा नमस्कार सांगशील?" मी उठतो.

मला निरोप देण्यासाठी तीही उभी राहते. तिचे हात मी हातांत घेतो. ते गरम वाटतात. मी ते दाबतो. तिच्या चेहऱ्यावर समाधान नाचतं. काहीशी सुखावलेली दिसते. तृप्त दिसते ती.

"कमल, मी थांबणार आहे तुझ्यासाठी. तुझे ध्येय सफल होईपर्यंत! तुझं ध्येय

सफल व्हावं म्हणून मीही तुला साथ देणार आहे यापुढे. कमल, तू माझी आहेस ग ! फक्त माझी......" मी भावनाविवश होतो.

तिचे हात मी सोडतो. पण माझे हात ती धरते. तिच्या मनात काही तरी येते. मी विचारतो––" काय ग !"

" काही नाही " ती मनात येणारं लपवते.

" काही तरी खास !" मी तिच्या हाताचं चुंबन घेतो. अगदी पहिल्यांदा. ती निश्चल उभी असते. तिचा श्वास वाढतो.

मी पायऱ्या उतरून खाली येतो. ती दारातच उभी असते. मी स्कूटर स्टार्ट करतो.


ती सूचना करते––" सांभाळून जा हं. " अन् हात हालवून निरोप देते. स्कूटरचा वेग वाढतो. वेगानं पळणारी स्कूटर ती चाळ माझ्या नजरेआड करते. पण निरोप देतांना हलणारा तिचा हात माझ्या नजरेपुढे तसाच हलताना दिसतो. आता माझ्या मनातली हुरहुर थांबलेली असते. मी एका नवीन ध्येयानं भारावलेला असतो.

––अन कमलमधील एका ध्येयवेड्या करारी मनानं पुन्हा मला जिंकलेलं असतं.




तुमच्या यशाचे सुचिन्ह

M B



बँक ऑफ महाराष्ट्र लि.

तुमची जिव्हाळ्याची बँक



THE RISE AND FALL OF THE THIRD REICH
या WILLIAM L. SHIRAR
यांच्या पुस्तकावर आधारित लेखमाला

लेखांक तेरावा




# भस्मासुराचा उदयास्त

## रा. म. शास्त्री

हिटलरचा कावा उघड होता. ३० ऑगस्टला बर्लिनला पोलंडचा प्रतिनिधी आला की बेनेस व डॉ. हाचा यांचेप्रमाणे त्याला गांगरवून टाकून दडपण वाढवावयाचे. वाटाघाटी फिसकटल्याच तर या निमित्ताने पोलंडवर हल्ला करून मोकळे व्हावयाचे म्हणूनच हेंडरसनला त्याने गर्भित इशारा दिला होता—" My soldiers are asking–'Yes' or 'NO'"

परंतु हेंडर्सनला मात्र अजून वाटत होते की कदाचित पोलंडचा प्रतिनिधी उद्या-पर्यंत बर्लिनला आला तर युद्ध टळेलही. त्याने हिटलरचे उत्तर लंडनला कळवले व त्याचबरोबर बर्लिनमधील पोलिश वकिलाला बोलावून सांगितले की, वॉर्साला फोन करून त्वरित तुमचा प्रतिनिधी वाटाघाटींसाठी बर्लिनला येईल अशी व्यवस्था करा.

ब्रिटनमध्ये मात्र हॅलिफॅक्स थंड होते. हेंडर्सनने फोनवरून हिटलरचे उत्तर व भेटीचा वृत्तांत कळवला. तो ऐकून लगेच त्याने सांगितले—

" उद्या ३० ऑगस्टला येथून अधिकृत उत्तर येईलच. परंतु उद्याच्या उद्या पोलिश प्रतिनिधी वॉर्सात हजर ठेवावा अशी अपेक्षा जर्मनीने करणे चुकीचे आहे--"

३० ऑगस्ट उजाडला. या दिवशी निरनिराळे चार संदेश लंडनहून हेंडर्सनला आले. पहिला चेंबर्लेनचा हिटलरला व्यक्तिगत साधा निरोप होता की-" जर्मनीच्या सूचनांचा विचार चालू आहे." त्याचबरोबर चेंबर्लेन यांनी हिटलरला विनंती केली होती, की विचार चालू असेपर्यंत जर्मन-पोलिश सरहद्दीवर चकमकी वगैरे होऊ नयेत. असाच अधिकृत संदेश हॅलिफॅक्सने नंतर पाठविला. तिसरा पाठोपाठ आला तो जर्मनीने पोलंडमध्ये घातपाती चळवळी सुरू केल्याच्या वृत्तांताबाबत होता व तो ब्रिटनच्या परराष्ट्र खात्याने धाडला होता. चौथा संदेश सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी आला व हेच ब्रिटनचे उत्तर होते. यात प्रामुख्याने सांगितले होते--

"While arranging direct negotiations between Berlin & Warsaw the British Govt. considers that it would be impracticable to establish contact so early as today."

[ बर्लिन व वॉर्सा यांचेमध्ये सरळसरळ बोलणी सुरू व्हावी, असे ब्रिटिश सरकारला वाटत असले तरी आजच्या आज संपर्क साधता येण्याकरता काहीही करणे ब्रिटनला शक्य नाही. ]

## रिबेन्ट्रॉप व हेंडर्सन

हे उत्तर घेऊन नेव्हिल हेंडर्सन हे ३० ऑगस्टला रात्री रिबेन्ट्रॉपच्या भेटीला गेले. या भेटीचा चक्षुर्वै वृत्तांत डॉ. श्मिद या दुभाष्याने लिहून ठेवला आहे. तो मोठा थरारक आहे.

" या सर्व भेटींत रिबेन्ट्रॉप......हिटलरचा आव आणून वागण्याचा प्रयत्न करीत होता."

हेंडर्सनने लिहून ठेवले आहे--

" मी ब्रिटिश सरकारच्या उत्तरातील एक एक विधान वाचू लागलो. माझे एक संपते न संपते तोच रिबेन्ट्रॉप खुर्चीतून उठून विचारी- 'झाले का ? की आणखी काही सांगावयाचे आहे ?' मी प्रत्येक वेळी उत्तर देई......' आणखी आहे.' "

डॉ. श्मिद सांगतो--

" रिबेन्ट्रॉपच्या या वागण्याने हेंडर्सनही खुर्चीतून उठून रागारागाने उभा राहिला. एकदा तर दोघे एकदम उठून एकमेकांकडे इतक्या त्वेषाने पाहात नजरा रोखून उभे राहिले की मला वाटले आता बहुतेक गुद्दागुद्दीच सुरू होणार ! "

आपले उत्तर वाचून होताच हेंडर्सनने विचारले, की आता पोलिश प्रश्नाबाबत जर्मनीने तडजोडीचा काय मसुदा तयार केला आहे ? यावर रिबेन्ट्रॉप म्हणाला--

" आता वेळ निघून गेली आहे. पोलंडचा प्रतिनिधी आलेला नाही."

इतके म्हणून रिबेन्ट्रॉपने तडजोडीचे १६ मुद्दे जर्मन भाषेत भराभर वाचण्यास सुरुवात केली. हेंडर्सनला जर्मन चांगले येत नव्हते......रिबेन्ट्रॉप इतक्या भराभर वाचीत सुटला की हेंडर्सनला काही नीट समजू नये असाच त्याचा यत्न उघड दिसत होता. रिबेन्ट्रॉपला उत्तम इंग्रजी येत असूनही त्याने आपली १६ कलमी योजना मात्र जर्मन भाषेत वाचली. यामुळे हेंडर्सनने तक्रार केली--

"तुमच्या अटी मला पाहण्यास द्या. त्यांचा अभ्यास करावा लागेल व नंतर काय ते सांगता येईल."

यावर रिबेन्ट्रॉपने सांगितले—

"आता त्याचा काय उपयोग आहे ? आता मध्यरात्र उलटून गली आहे. पोलंडच्या प्रतिनिधीचा अजून पत्ता नाही—"

या ज्या १६ मागण्या रिबेन्ट्रॉपने वाचल्या त्या फारच सौम्य होत्या—

(१) डँझिग जर्मनीला परत मिळावे.

(२) कॉरिडॉरबाबत सार्वमत घेण्यात यावे.

(३) कॉरिडॉर कुणाकडेही राहिला तरी विरुद्ध पक्षाला त्यातून रेल्वेमार्ग व रस्ते करण्याची सवलत राहावी.

(४) वादग्रस्त विभागांत लोकसंख्येची अदलाबदल करावी.

या चार मागण्या या सोळा मागण्यांतील सर्वांत महत्त्वाच्या होत. जर वाटाघाटींना पुरेसा वेळ देऊन त्या शांतपणे रिबेन्ट्रॉपने मांडल्या असत्या, तर बहुधा त्या ब्रिटनने मान्य करून–पोलंडला मान्य करण्याकरता गळ घातलीही असती. परंतु या साध्या मागण्या आपण केल्या व त्याही पुऱ्या करण्याची कदर पोलंड व ब्रिटनने केली नाही, असे सांगता यावे......एवढ्यासाठीच रिबेन्ट्रॉपने त्या तयार केल्या होत्या. त्या मान्य करून युद्ध टळावे अशी जर्मनीची इच्छा नव्हती. सर्व जय्यत तयारी झालेली होती. मोर्चे बांधून जर्मन सैन्य आज्ञेची वाट पाहात होते. झडपेसरशी पोलंडच संपवण्याची हिटलरची खरी इच्छा होती. याचसाठी रिबेन्ट्रॉपने या मागण्या लेखी स्वरूपात हेंडर्सनला लगोलग दिल्याच नाहीत.

दुसऱ्या दिवशी रात्री जर्मनीने पोलंडवर हल्ला चढविण्याची आज्ञा सोडली व लगेच रेडिओवर या सोळा मागण्या जर्मन जनतेला व जगाला ऐकवण्यात आल्या. शिररने त्या स्वतःच्या कानाने जेव्हा ऐकल्या, तेव्हा त्यालाही असेच वाटले, की या सर्व मागण्या अन्यायकारक नसताना पोलंडने युद्धाचा मार्ग पत्करून काय साधले ?

हेंडर्सन चॅन्सेलरीतून आपल्या वकिलातीत परतला, तेव्हा ३१ ऑगस्टचे पहाटेचे दोन वाजले होते. त्याने लंडनला तारपत्र लिहिले—

"हिटलर डँझिग बंदर व कॉरिडॉरमध्ये सार्वमत मागत आहे. रिबेन्ट्रॉपने या मागण्या लेखी दिल्या नाहीत, परंतु या फारशा अन्यायकारक दिसत नाहीत. (They

are not too unreasonable.) मी पोलिश वकील लिपस्की याला विनंती केली आहे, की त्याने फील्डमार्शल गोअरिंग व पोलंडचा फील्डमार्शल स्मिग्ले रिडझ् (Rydz) यांची भेट घडवून आणावी. "

## डाल्वेरुसची धावपळ

३१ तारीख उजाडली. रात्रभर डाल्व्हेरुस हा गोअरिंगच्या पाळतीत होताच. त्याने गोअरिंगला मध्ये घालून रिबेन्ट्रॉपच्या मागण्यांची लेखी प्रत हेंडर्सनला द्यावी असा आग्रह धरला.

डाल्व्हेरुस व गोअरिंग यांना आशा वाटत होती की, अखेरच्या क्षणी तरी युद्ध टळेल.

डाल्व्हेरुसच्या प्रयत्नांना यश येऊन ३१ ऑगस्टला सकाळी १० वाजता जर्मनीच्या १६ मागण्यांची टंकलिखित प्रत घेऊन डाल्व्हेरुस स्वतःच हेंडर्सनला येऊन भेटला.

या मागण्या हाती पडताच हेंडर्सनने आपण लिपस्कीमार्फत चालवलेल्या खटपटीची माहिती त्याला सांगितली व या मागण्यांची एक प्रत घेऊन डाल्व्हेरुसलाच लिपस्कीकडे पिटाळले. लिपस्कीला समजेना की हा डाल्व्हेरुस कोण ? हा ना जर्मन वकिलातीचा, ना ब्रिटिश वकिलातीचा ! हेंडर्सनचा हा निरोप सांगतो की, ताबडतोब गोअरिंगची गाठ घेऊन—या मागण्या स्वीकारल्याचे कळवा ! लिपस्की आधीच गेले दोन दिवस हैराण झालेला होता. आता तर तो मोठ्याच पेचात पडला, की काय करावे ?

इकडे लंडनमधून वॉर्सावर दडपण वाढत होतेच. ३० ऑगस्टलाच हॅलिफॅक्स यांनी कर्नल बेक् याला कळवले होते–" बर्लिनशी वाटाघाटींना तयार आहोत असे ताबडतोब जाहीर करा. " वॉर्सामधील ब्रिटिश वकील केनॉर्ड (Kennard) याने बेक् यांची भेट घेऊन सांगितले–

" आजच ब्रिटिश सरकारचे उत्तर हेंडर्सन रिबेन्ट्रॉपला देतील. तुम्ही फक्त वाटाघाटींना तयार असल्याचे घोषित करा. ब्रिटनने जर्मनीला दिलेल्या उत्तराची प्रत तुम्हाला आज रात्री मिळेल. "

३१ ऑगस्टला सकाळी बेक्‌ने केनार्डला लेखी कळविले की–जर्मनीशी वाटाघाटी करण्यास आम्ही तयार आहोत व याबाबत ब्रिटनने जर्मनीला जे सुचवले आहे ते आम्हाला मंजूर आहे.

यावर केनॉर्डने विचारले–

" जर इंग्लंडचे उत्तर पाहून रिबेन्ट्रॉपने आपल्या सुधारलेल्या मागण्या पुढे केल्या, तर त्या लगेच स्वीकारण्यासंबंधी जर्मनीतील पोलिश वकील लिपस्की याला कळवले आहे काय ? "

यावर बेक्‌ने सांगितले–

" नाही. अशा मागण्या स्वीकारण्याचा अधिकार लिपस्कीला नाही."

परंतु प्रत्यक्षात कर्नल बेक्ने लिपस्कीला हेही कळवले नाही की......वाटाघाटीस तयार असल्याचे रिबेन्ट्रॉपला सांगा! त्याने लिपस्कीला कळवले ते असे–

" रिबेन्ट्रॉपला कळवा, ब्रिटिशांची सूचना मिळाली असून त्यावर आम्ही विचार करीत आहोत व अधिकृत उत्तर पुढील काही तासांत येईल."

म्हणजे लिपस्कीला ३१ ऑगस्ट उजाडेपर्यंत त्याने पोलंडच्या वतीने बर्लिनमध्ये काय भूमिका घ्यावी, याचाच उलगडा होत नव्हता. वॉर्साहून उलगडा झाला तो वरीलप्रमाणे. कर्नल बेक्ने त्याला एक सांगितले व ब्रिटिश वकील केनॉर्ड याला दुसरेच सांगितले.

३१ तारखेला सकाळी डाल्व्हेरुस नावाचा स्विडिश माणूस, जर्मनीच्या १६ मागण्या घेऊन येतो व हेंडर्सनचा निरोप सांगतो–" तावडतोब गोअरिंगला भेटून या मागण्या मान्य करा–" तितक्यात कर्नल बेक्चा संदेश वॉर्साहून येतो.–

" रिबेन्ट्रॉपला भेटून सांगा, ब्रिटिश सूचनांचा विचार चालू आहे."

## लिपस्कीला ताटकळत ठेवले

लिपस्कीला काय करावे हे सुचेना. अखेर शेवटी आपल्या सरकारने सांगितल्याप्रमाणे करावे, हे उत्तम असे ठरवून त्याने दुपारी १ वाजता रिबेन्ट्रॉपची भेट मागितली. या विनंतीत जर्मन परराष्ट्रखात्याकडून दोन तास प्रतिसादच आला नाही. दोन तास लिपस्कीला बोंबलत ठेवल्यावर ३ वाजता रिबेन्ट्रॉपच्या वतीने त्याला फोनवर विचारण्यात आले–

" तुम्ही पोलंडचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून येत आहात, की अन्य काही नात्याने येत आहात ? "

यावर अर्थात् लिपस्कीने सांगितले–

" I am asking for an interview as ambassador to present a declaration from my Government–"

[ मी माझ्या देशाचा वकील म्हणून, माझ्या सरकारचा एक संदेश पोचता करण्यासाठी भेट मागत आहे —]

पाच वाजले. सहा वाजले. पुन: सर्व सामसूम!! शेवटी सव्वा सहा वाजता भेट मागितल्यापासून पाच तासांनी, रिबेन्ट्रॉपने लिपस्कीला भेट दिली.

ही भेट फार वेळ चालणेच शक्य नव्हते. आल्याआल्याच लिपस्कीने वॉर्साहून आलेला कर्नल बेक्चा संदेश वाचून दाखवला व तो पुढे म्हणाला—

" मी एक वाजल्यापासून हा संदेश पोचवण्यासाठी भेटीची वाट पाहात होतो."

यावर रिबेन्ट्रॉपने विचारले—

" पुरेसे अधिकार मिळवून पोलिश प्रश्नावर वाटाघाटी करण्यासाठी, तुम्ही प्रतिनिधी म्हणून आला आहात काय ? "

यावर लिपस्की उत्तरला—

" अशी माझी कसलीही भूमिका नाही— "

" मग तुम्ही जाऊ शकता ! " रिबेन्ट्रॉपने लिपस्कीला दरवाजा दाखवला.

हा सगळा घोटाळा कर्नल बेकने केलेला होता. वाटाघाटींसाठी ३० तारखेपर्यंत प्रतिनिधी यावा, अशी जर्मनांची मागणी ब्रिटनकडे गेलेली असून रिबेन्ट्रॉप अशा प्रतिनिधीची वाट पाहात आहे, याचा अधिकृत पत्ता लिपस्कीला नव्हता ! अपमानित अवस्थेत बिचारा लिपस्की वकिलातीत परतला. झाल्या प्रकाराबद्दल वॉर्सामधील आपल्या परराष्ट्रखात्याला कळवावे म्हणून त्याने फोन उचलला —

परंतु त्याचा फोन जर्मनांनी तोडलेला होता ! !

( On my return to the embassy Lipski later related. " I found myself unable to communicate with Warsaw, as the Germans had cut my telephone. ")

## टेलिफोन्स तोडले

डाल्व्हेरुस लिपस्कीला भेटून परत आला तो थोड्याशा घुश्शातच. हेंडर्सनने त्याच्या कचेरीतून ब्रिटिश परराष्ट्र कचेरीतील सर होरेस विल्सन यांना फोन केला. फोनवर दुपारी त्याने विल्सन यांना सांगितले—

" The German proposals were extremely liberal, but the Polish ambassador has just rejected them. It is clear the Polish are obstructing negotiations. "

[ जर्मनीच्या सूचना पुष्कळच सौम्य होत्या. परंतु पोलिश वकिलाने आताच त्या फेटाळल्या. पोलिश वाटाघाटींत अडथळे आणीत आहेत, असे स्पष्ट दिसते. ]

लिपस्कीबद्दल डाल्व्हेरुस सर होरेस विल्सन यांना एवढे सांगतो न सांगतो तोच सर विल्सन यांना फोनवर काही संशयास्पद आवाज ऐकू आले. त्यांची खात्री झाली की हे बोलणे जर्मन ऐकत आहेत. संभाषण बंद करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु डाल्व्हेरुस बोलतच होता. शेवटी सर विल्सन यांनी त्याला संभाषण बंद करण्यास सांगून फोनच खाली ठेवला.

( I again told Dahlerus to shut up but as he did not, I put down the receiver.")

सर विल्सन यांनी ही घटना ताबडतोब ब्रिटिश वकिलातीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानी घातली. दुपारी २ वाजता हेंडर्सन यांना गुप्त भाषेत लंडनहून संदेश मिळाला—

" You really must be careful for use of telephone. D's conversation at mid-day has certainly been heared by the Germans. "

[ तुम्ही फोनचा वापर काळजीपूर्वक केला पाहिजे. डी (म्हणजे डाल्व्हेरुस) यांचे दुपारी जे बोलणे झाले ते खात्रीने जर्मनांनी ऐकले आहे. ]

हा संदेश हेंडर्सन यांना पोचला तेव्हा जर्मनांनी टेलिफोन तोडीतच आणले होते. आता हेंडर्सनचे बर्लिनमधील वास्तव्यच २४ तासांत संपुष्टात येणार होते. ब्रिटिश वकील हेंडर्सन किंवा फ्रेंच व पोलिश वकिलांना याची कल्पना नसली, तरी ३१ ऑगस्टला उत्तर दुपारी म्हणजे साधारण ३ ते ३।। च्या दरम्यान अॅडॉल्फ हिटलर याने आपला अंतिम निर्णय घेतला होता. जगाला सर्वांत मोठ्या रक्तपाती युद्धाची सुरुवात करा, या आज्ञापत्रावर हिटलरने सही केली होती. या आज्ञापत्राची सुरुवात अशी आहे—

" Supreme Commmander of the Armed Force.

Most Secret

Berlin,

August 31, 1939

Directive No. 1 : For the conduct of war.

Now that all the political possibilities of disposing by peaceful means, of a situation on the Eastern Frontiers (which is intolerable for Germany) are exhausted, I have detarmined on a solution by force.

Date of Attack : September, 1939

Time of Attack : 4.45 A. M.

[ सुप्रीम कमांडर ऑफ दी आर्मड् फोर्सेस.

(अत्यंत गुप्त)

बर्लिन

३१ ऑगस्ट, १९३९

युद्धाबाबतचे पहिले आज्ञापत्र

पूर्व सरहद्दीवर निर्माण झालेल्या व आता जर्मनीला असह्य ठरू पाहाणाऱ्या परिस्थितीचा राजनैतिक वाटाघाटींनी शेवट करण्याचे सर्व उपाय आता थकल्यामुळे, बलाचा वापर करून हा प्रश्न सोडवण्याचे मी ठरवले आहे.

हल्लयाची तारीख : १ सप्टेंबर १९३९

हल्लयाची वेळ : पहाटे ४ वाजून ४५ मि. ]

युरोप खंडावर ३१ ऑगस्ट १९३९ च्या सायंछाया पसरू लागल्या. पंधरा लाख जर्मन सैन्य आपआपल्या नेमलेल्या जागांच्या दिशेने या वेळी पोलंडच्या सरहद्दीजवळ सरकत होते. पहाटे पावणेपाचला या जागा सोडून त्याने पोलंडवर झेप घ्यावयाची होती. सर्व तयारी पुरी होत आली होती. बर्लिनमधील पोलिश वकिलातीचे सर्व

बाह्य संबंध तोडण्यात आले होते. बर्लिनमधील नागरिक मात्र उघडपणे असे म्हणत होते की......आम्हाला युद्ध नको आहे ! सर्वसाधारणपणे जनता युद्धाला अनुकूल नसताना, हिटलरला त्याची फारशी भीती वाटत नव्हती. कारण त्याने एकदा पूर्वी याचे उत्तर दिलेले होते—

"The Victor will not be asked afterwards whether he told the truth or not. In starting & waging war it is not 'right' that metters but 'victory.'"

[ जो विजयी होतो त्याला कुणी हे नंतर विचारीत नाही, की त्याने युद्धाला जे कारण सांगितले ते खरे होते की खोटे ! युद्ध सुरू करताना व लढताना खरे काय याला महत्त्व नसते. महत्त्व असते ते फक्त अंतिम विजयाला ! ]

## जर्मनीचे साळसूद वक्तव्य

परंतु जर्मन जनतेला विश्वासार्ह वाटावे असें कारणही हिटलरने तयार केलेले होते. रात्री ९ वाजता जर्मन रेडिओवरून फ्यूररने पोलंडला शांतता राखण्यासाठी ज्या सोळा मागण्या केल्या होत्या, त्या वाचून दाखवण्यात आल्या. या मागण्यांचे स्वरूप इतके साधेसुधे, होते की शिररसारख्या असंख्य पत्रकारांना पोलंडला युद्धाची अवदसा आठवलेली दिसते असे वाटू लागले. या मागण्या वाचून दाखवल्यानंतर एक प्रदीर्घ वक्तव्य वाचून दाखवण्यात आले. उत्तम प्रचाराचा नमुना म्हणून हे पत्रक वाचावे. हे वाचीत असताना खरोखरच असे वाटते की जर्मनीने आपल्याकडून आपली न्याय्य मागणी मान्य करवून घेण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. परंतु पोलंडच्या अवदसेमुळे त्यांना आता युद्धावाचून दुसरा मार्गच उरलेला नाही. तसे पाहाता या वक्तव्यात केलेले एकही विधान खोटे नाही.

" पोलंड सरकारला आम्ही वाटाघाटींसाठी तयार व्हा असे पुन:पुन्हा ब्रिटिशांमार्फत सांगितले. पुन:पुन्हा सांगितले की ३० तारखेपर्यंत ज्याला वाटाघाटी करण्याचे अधिकार आहेत, असा पोलिश प्रतिनिधी पाठवा. याला पोलंडकडून जबाब काय आला ? तर पोलंडने लष्करभरतीच सुरू केली. अखेर शेवटी त्यांचा वकील सरकारचा संदेश घेऊन आला. त्याला विचारले, की वाटाघाटी करण्याचा अधिकार तुला आहे का ? तो नाही म्हणाला ! दोन दिवस आम्ही प्रतिनिधी येईल येईल म्हणून वाट पाहात आहोत. असे कसे बरे चालेल ? युद्धासारखा धोका नको असेल, तर अशा भलत्या बाबतीत एवढी दिरंगाई करून कसे चालेल ? आम्ही आपले पुन:पुन्हा विनवण्या करीत होतो आणि पोलंडला त्याचे काहीच नव्हते ! आता ज्या मागण्या वाचून दाखवल्या त्या इतक्या समाधानकारक व सौम्य आहेत की, ब्रिटिशांनीदेखील पोलंडला वाटाघाटी करा असा सल्ला दिला. परंतु उन्मत्त पोलंड सरकारला समझोता नकोच असला तर कोण काय करणार ? "

यात वरवर पाहाता काय खोटे होते ? परंतु अखेरीस पुढे आलेल्या सौम्य मागण्या......प्रत्यक्षात कशा पुढे आल्या ? केव्हा पुढे आल्या ? त्याबद्दल निर्णय घेण्यासाठी ब्रिटन–पोलंडला वेळ मिळू नये याबद्दल कशी खबरदारी घेण्यात आली ? पोलिश वकील लिपस्कीला पाच तास का ताटकळत ठेवण्यात आले ? हा सर्व इतिहास पाहिल्यानंतर जर्मनीने प्रचाराचे तंत्र केवढे पुढे नेले होते व त्याचा त्यांनीं किती कौशल्याने उपयोग केला हे पाहून मन थक्क होते.

## पोलंडने आगळीक केली हे दाखवण्यासाठी

उत्तम प्रचार परिणामकारक करावयाचा असेल, तर त्याला घटनांचा आधार लागतो. हा अखेरचा परिणाम साधण्यासाठी नाझींनी पूर्वतयारी केलेली होती.

ऑल्फ्रेड न्यूजॉक्स ( Naujocks ) हा एक हुशार धाडसी S. S. संघटनेचा सभासद सहा–सात दिवसांपूर्वीपासून पोलिश गणवेष घातलेल्या आपल्या साथीदारांसह पोलिश हद्दीत घुसलेला होता. ग्लेविटझ् (Glewitz) या ठिकाणच्या जर्मन रेडिओ स्टेशनवर पोलिश लष्करी गणवेषात हल्ला चढवून पोलंडने आगळीक केली, असा आभास निर्माण करण्याची सर्व तयारी झालेली होती. रेडिओ स्टेशनवर पोलिश लोकांनी तेथील जर्मन माणसेही मारली, या पुराव्यासाठी नाझींनी आपल्या कॉन्सेंट्रेशन कँपमधील काही कैदी भरपूर दारू पाजून जर्मन रेडिओ स्टेशनवर आणून ठेवलेले होते. हा न्यूजॉक्स लढाई आटोपल्यावर दोस्तांचे हाती लागला व त्याने ३१ ऑगस्टला आपण काय केले याची जबानी न्यूरेन्बर्ग खटल्यात दिली. त्याने हकीकत सांगितली—

“ ३१ ऑगस्टला हायड्रीच यांचेकडून हल्ला करण्याचा इशारा देणारा परवलीचा शब्द मिळाला. सायंकाळी ८ वाजता हल्ला करण्याचा संदेश मिळाला होता. यासाठी लागणारे डबाबंद पदार्थ (Canned Goods)......(म्हणजेच दारू पाजलेले मारण्यासाठी आणलेले कैदी) मुलर यांचेकडून येणार होते. यांतील एकाला मी बेहोष अवस्थेत रेडिओ स्टेशनच्या दारातच आणून ठेवला. तो जिवंत होता परंतु बेशुद्ध होता. त्याच्या पापण्या उघडण्याचा मी प्रयत्न केला. परंतु त्याच्या डोळ्यांत मला जीव दिसेना. फक्त श्वासोच्छ्वास चालू होता. आम्ही रेडिओ स्टेशनवर ठरल्याप्रमाणे हल्ला करून ते ताब्यात घेतले व पिस्तुलांचे आवाज काढून आम्ही निघून गेलो—”

त्या रात्री शिररने वॉर्सा, लंडन व पॅरिस येथे फोन लावण्याचा प्रयत्न केला. परंतु सर्व ठिकाणचे संबंध तोडण्यात आलेले त्याला आढळले. लंडन, पॅरिसमध्ये बायकामुलांना शहराबाहेर नेण्याची एकच धांदल त्या दिवशी चालू होती. बर्लिनमध्ये मात्र अशी कोणतीच गडबड नव्हती. ३१ तारखेची रात्र व १ सप्टेंबरची पहाट यांचे बर्लिनमधील वर्णन शिररने केले आहे—

“ १ सप्टेंबरला पहाटे ४ वाजता मी रेडिओ केंद्रावरील माझा कार्यक्रम आटोपून

परतत होतो. ब्रॉड्कास्टिंग स्टेशनपासून अड्लोन् हॉटेलपर्यंत मी मोटारने गेलो. रस्त्यात अजीबात रहदारी नव्हती. घरे अंधारात गुडुप होती. लोक शांतपणे झोपी गेलेले होते :—बहुधा शांततेची आशा करीत आदल्या रात्री ते झोपी गेले असावेत ! '

## ड्यूक ऑफ विंडसरला पत्र

३१ ऑगस्टला हिटलरने वेळात वेळ काढून ड्यूक ऑफ विंडसर (इंग्लंडचे पदच्युत राजे व सिम्प्सनबाईचे यजमान) यांना फ्रान्समधील त्यांच्या निवासावर खालील तार पाठवली—

" I thank you for your telegram of Aug. 27th. You may rest assured that my attitude towards Britain & my desire to avoid another war between our peoples remain unchanged. It depends upon Britain, however, whether my wishes for the future development of German–British realations can be realised.

–Adolf Hitler

[ २७ ऑगस्टच्या तारेबद्दल आभारी आहे. तुम्ही ही खात्री बाळगा, की ब्रिटनबाबतचे माझे धोरण व आपल्या दोन्ही देशांत युद्ध होऊ नये या विषयीची माझी इच्छा अजून कायमच आहे. ब्रिटन-जर्मनी यांचे भविष्यकालात संबंध वाढावे, ही माझी इच्छा पुरी करावयाची किंवा नाही, ही गोष्ट ब्रिटनवरच अवलंबून आहे.

—ॲडाल्फ हिटलर. ]

३१ ऑगस्टला हिटलरने इंग्लंडच्या राजेसाहेबांच्या वडील बंधूंना पाठवलेली ही तार व बर्लिनमधून बायका-मुले हलविण्याचाही त्याने ३१ ऑगस्टला विचार केला नव्हता या दोन्ही गोष्टी पाहता— १ सप्टेंबरला आपण पोलंडवर हल्ला केला तरी ब्रिटन युद्धात पडणार नाही, अशी आशा हिटलरला वाटत होती, याचा पुरावा आहे. ब्रिटन युद्धात पडणारच नाही असे गृहीत धरून तो गाफिल मात्र नव्हता.

नेहमीप्रमाणे हिटलर ३१ ऑगस्टला रात्री झोपी गेला. कारण जनरल हालडेर् आपल्या दैनंदिनीत त्या रात्री लिहितो—

" Fuehrer calm; has slept well. Decision against evacuation shows that he expects France & England will not take action."

## ठिणगी पडली

[ फ्यूरर शांत आहे; त्याला छान झोप लागलेली आहे. शहर खाली न करण्याचा हिटलरने निर्णय घेतला आहे, यावरून फ्रान्स व इंग्लंड काहीही करणार नाहीत, अशी त्याची अपेक्षा दिसते. ]

३१ ऑगस्टची रात्र संपली, पहाट झाली. घड्याळाचा काटा चार वाजून

पंचेचाळिसाव्या मिनिटावर सरकला मात्र आणि उत्तर–दक्षिण व पश्चिमेकडून जर्मन सैन्याचे लोंढे वॉर्साच्या दिशेने पोलंडमध्ये घुसले. जमिनीवरून जर्मन तोफा व आकाशातून जर्मन लष्करी विमाने पोलिश सैन्यावर व जनतेवर आग ओकू लागली. नाशाचे आणि मृत्यूचे थैमान युरोपात सुरू झाले. रणकुंडाच्या पहिल्या पहिल्या ज्वाला आकाशाला जाऊन भिडू लागल्या. हत्याकांड धगधगू लागले. नाझी भस्मासुराचा रणसूर एकदम चढ्जातच लागला. पोलंडच्या भूमीवर रुधिर-स्नाने सुरू झाली......! १–९–१९३९ !!

## पोलंडच्या भूमीवर रुधिरस्नाने सुरू झाली



जर्मन आक्रमणानंतरचे वॉर्सातील एक दृश्य


[ पूर्वार्ध समाप्त ]

# विवाह आणि पत्रिका-मेळन

" काय बाबूराव ! यंदा तुम्ही चतुर्भुज झाला आहात ! वहिनीची ओळख करून द्याना !" माझ्या वाढदिवसाच्या दिवशी माझा मित्रमंडळींना चहापानास बोलवण्याची पद्धत गेली ५।६ वर्षे मी चालू ठेवली आहे. सहकुटुंब सर्वांनी आले पाहिजे अशी माझी सर्वांना आग्रहाची विनंती असते. या निमित्ताने सर्वांच्या गाठीभेटी होतात. दरवर्षी काही मित्रांचे विवाह झाल्याने आपलेपणाने नवीन मंडळीची चौकशी करता येते. " अहो आमची मंडळी वऱ्हाडातली. " बाबूराव म्हणाले, "काय महाराष्ट्र ओस पडला होता म्हणून वऱ्हाडात शोधायला गेलात की काय !" असा मी प्रश्न केला. " नाही बाबा !" बाबू म्हणाला, " विवाह म्हणजे पूर्वजन्माच्या गाठीभेटी. सहज ऑफिस कामानिमित्त फिरतीला गेलो होतो तिकडे ! तेवढ्यात आम्हाला यांनी पकडलं."

" पण काय रे ! आज गोंद्या दिसत नाही ? परवा त्याचं लग्न झाल्याचं कळलं ! पण नुसतं पानसुपारीचं बोलवणंसुद्धा नाही, की आल्यावर मित्रमंडळींना फीस्टदेखील नाही." आमचा एक मित्र म्हणाला. "बरं झालं. आणखी काही त्याला विचारलं नाहीस ! त्याची सगळी ट्रॅजेडी झाली ! बायको ठार वेडी आहे. " " काय म्हणतोस ! लग्नापूर्वी कोणी चौकशी केली नाही का ?" मी विचारणा केली. " बाबा सर्व चौकशी केली ! ज्योतिषाला पत्रिकासुद्धा दाखविली. बिचाऱ्या ज्योतिषांनी तशी पूर्ण कल्पनासुद्धा दिली होती, पण म्हणतात ना ......!"

" बरं, विजय कुठ आहे ? केव्हा येणार आहे ! काही निरोप आहे का ? म्हणजे मुख्य कार्यक्रमाला सुरुवात करता येईल." बाबू म्हणाला, "काहीही म्हणा ! विजा लेकाचा नशीबवान ! दहा हजार रुपये हुंडा देऊन आपली ती कॉलेज ब्यूटी-



## विवाह हे एक अटळ विधिलिखित आहे. तरीही पत्रिका पाहावी असे लेखकाचे प्रतिपादन आहे.

क्वीन मिळाली ! पत्रिकेतील सप्तमस्थान का तो शुक्र फार जोरदार असला पाहिजे! ...... तो आता इथे कलेक्टर म्हणून येणार ! आणि आम्ही बसलोय् खर्डे घाशीत...... एक-एकेकाचे नशीब ! ! ”

दरवर्षी या समारंभाची मला मोठी गंमत वाटते. काही सुखकर, विनोदी, अनपेक्षित आणि काही दु:खदायक घटना ऐकावयास मिळतात. मागील वर्षी (१९६४) मे-जूनमध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेत “ एक वधू-वर परिचय मंडळ असावे,” अशासाठी पालकांची सभा झाली. विवाह जास्तीत जास्त सुखी व्हावेत हा ह्या मंडळाचा हेतू होता. कारण अनोळखी मंडळींच्या गाठीभेटी पडल्याने फसवणूक होते आणि शेवटी निराशा पदरी पडते, असे अनेक पालकांच्या अनुभवास आले आहे. पोळलेल्या वधू-वरांच्या पालकांना परिचय मंडळाची कल्पनासुद्धा पसंत नाही. कारण परिचयाचे नावाखाली काही होतकरू मंडळी मजा मारावयाची असा त्यांचा दावा आहे. नुकतेच परदेशगमन करून आलेल्या एका युवतीस वाटते की, प्रेमविवाहाला उत्तेजन दिल्याने विवाह सुखी होतील.

अगदी पुराणकाळात जावयाचे म्हटले तर राम-सीता; कृष्ण-रुक्मिणी; नल-दमयंती; अज–इंदुमती या जोड्या जरी घेतल्या, तरी कृष्ण–रुक्मिणीशिवाय इतरांना वनवासासारख्या अनेक संकटांतून जावे लागले. या मंडळींच्या पत्रिका न पाहाताच लग्ने झाली होती ना? सीतेने रामास स्वयंवरात वरिले तर कृष्णाने रुक्मिणीचे हरण केले ...... अगदी अलीकडील काळात अडाणी स्त्री म्हणजे एक समस्या होती तर आता सुशिक्षित पुरुष ह्याच स्त्रियांना कूट प्रश्न वाटू लागला आहे. थोडक्यात लग्न ही घटना हाताने वाजणारी टाळी नसल्याने प्रयत्नवादाला त्यात खरोखरी वाव आहे का ? ही झाली मध्यमवर्गाची अवस्था. याखेरीज जो प्रचंड बहुजन समाज आहे, त्यांचे विवाह जमविण्यासाठी कोणते ज्योतिषी आणि कोणती परिचय मंडळे आहेत ! पाळण्यांतच ज्यांची लग्ने लागतात, त्यांना कोणते ज्योतिषी भेटतात ? काही उच्चवर्णीय समाजांत मुंजीचे वेळी बटूला मामा आवर्जून सांगतो की, “ बाबारे संन्यास घेऊ नको, माझी मुलगी मी तुला देईन.” या

: लेखक :

**श्री. के. केळकर**

पद्धतीने अलीकडील काळातसुद्धा पिढ्यान्पिढ्या विवाह होत आहेत. जपानी युवती अमेरिकन सद्गृहस्थाशी योगायोगाने लग्न जमविते, तर परदेशांत गेलेला आमचा तरुण आंग्लयुवतीशी 'म्होतूर' लावून येतो. सुशिक्षित मुली व्यक्तिमत्वावर भाळून प्रेमात पडतात आणि 'काझी' सारखी प्रकरणे निर्माण होतात. व्यवहारात ज्यांना आपण बदसूर जोडपी म्हणतो ती मंडळी लग्नापूर्वी एकमेकांना पाहात नाहीत काय ?

**ज्योतिषाचे स्थान**

विवाह ही एक विधिघटना आहे, असा माझा पूर्वीपासून विश्वास आहे. अलीकडे ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करावयास लागल्यापासून तर त्याची खात्री पटत चालली आहे. विवाहापूर्वी आणि विवाहानंतर पत्रिकेची पुडकी घेऊन मंडळी फिरत असतात. लग्नापूर्वी विवाह केव्हा होईल, पत्नी किंवा वर कसा मिळेल, ही उत्सुकता असते व विवाह झाल्यानंतर तो यशस्वी होईल का म्हणून चिंता लागलेली असते. फिसकटलेल्या विवाहांवर तोडगा विचारण्यासाठी **मांत्रिकापासून ते शेवटी कोर्टापर्यंत सर्वप्रकारे** सल्लामसलती चालू असतात. याची कारणे शोधून काढावीत तेवढी थोडीच आहेत. परंतु सामाजिक दृष्टिकोनातून विचार करण्याचा भाग समाज शास्त्रज्ञांचा आहे. मी फल ज्योतिषशास्त्राचे दृष्टिकोनातून विचार करणारा आहे.

फलज्योतिष हे बऱ्याच अंशी अनुमानिक व अनुभवसिद्ध शास्त्र आहे. विशिष्ट ग्रहांचे विशिष्ट परिणाम होत असतात ते कोणत्याही मानवावर व चराचर सृष्टीवर होतात, हा या शास्त्राचा मूल सिद्धांत आहे. सर्व विश्व बऱ्यावाईट घटनांनी भरलेले आहे या तत्वावर फलज्योतिषातही विभागणी केलेली आहे. हे सर्व १२ ग्रह व द्वादशभावावरून देशकालनिरूप सांगावयाचे असते. **आयुष्यातील महत्वाच्या घटनांसंबंधी आपल्याला कितपत सुखदुःख प्राप्त होईल व ते प्राप्त होण्याचा संभाव्य काल कोणता इतके समजावून घेणे हे या शास्त्राचे सामर्थ्य व क्षेत्र आहे.** यांपेक्षा जास्त अपेक्षा करण्याने विफलता येते व निराशेपोटी सबंध शास्त्रच खोटं आहे, असा लोकापवाद निर्माण होतो.

विवाह हा विधिलिखित ठरविल्यावर त्यात प्रामुख्याने खालील गोष्टींचा अंतर्भाव होतो:– उत्तम वैवाहिक व कौटुंबिक सौख्य, विवाहित किंवा जन्मभर अविवाहित, प्रेमविवाह, पतिपत्नींमधील संबंध, आंतरजातीय विवाह, पुर्नविवाह, बिजवर विवाह, वैधव्य योग, घटस्फोट, विपरीत विषयवासना, संतति–सौख्य, वंध्यत्व इ. या गोष्टींची कल्पना पत्रिकेवरून करून घेतल्यावर प्रयत्नवाद कोठे येतो ?

इतके समजूनसुद्धा माणसाचे भाबडे मन पुन:पुन्हा अदृष्टाची कल्पना जास्त खुलासेवार करून घेण्यासाठीच धावत असते. विवाह ही अटळ घटना असल्याने फार पुरातन कालापासून भारतात व तरत्र ' पत्रिका अगर ज्योतिषशास्त्राच्या इतर

अंगांचा उपयोग करण्याची पद्धती कशी आली हे पाहाणे मनोरंजक ठरणार आहे.

## प्राचीन शास्त्र

भारतात महाभारतकालापूर्वीपासून ज्योतिषशास्त्राचा उपयोग विवाह जमविण्यासाठी करत असावेत, असा भरपूर पुरावा देता येईल. अर्थात त्यावेळी नक्षत्रांचा उपयोग, हल्लीच्या राशीऐवजी होत असावा वानगीदाखल एकच पुरावा देत आहे. "कन्या (पतीला) प्रिय व्हावी अशी इच्छा असेल तर ती निष्ठया (स्वाती) नक्षत्री द्यावी म्हणजे प्रिय होते" (या कामयते दुहितरं प्रियास्यादिती ।। तां निष्ठयां दद्यात् । प्रियैव भवति– तै. ब्रा.) ही झाली परिस्थिती वेदांग कालाची. महाभारतात नक्षत्रांच्या फलितोपयोगी कल्पना जास्त उच्च गेलेल्या दिसतात. अनुशासनपर्व अध्याय ६४ श्लोक ६ ते १४ मध्ये प्रत्येक नक्षत्रावर केलेल्या दानाचे महत्त्व वर्णन केले आहे. द्रौपदीच्या विवाहप्रसंगी पुष्य नक्षत्राबद्दल एक संदर्भ आला आहे. पुष्य विवाह नक्षत्र नाही.

भारतीय पद्धतीत चंद्राला व चंद्र नक्षत्राला विशष महत्त्व दिले आहे. चंद्र म्हणजे मन आणि विवाह सुखी व्हावयाचा असेल तर वधू-वरांची मने एकमेकांशी सुसंगत पाहिजेत अशी कल्पना दृढ आहे व ती बरोबर आहे. वधूवरांची "चंद्र" नक्षत्रे एकमेकांपासून कितवी पडतात यावर "गुण-मेलन" केले जाते. महाराष्ट्रात व इतरत्र जवळपास ३६ गुण पाहाण्याची पद्धती रूढ आहे. दक्षिण हिंदुस्थानात "**पोरुथमा**" म्हणजे '**दशविध**' घटित पाहाण्याची पद्धती आहे. वधूच्या नक्षत्रापासून वराचे नक्षत्र कितवे आहे हे प्रामुख्याने पाहातात.

'विवाह' हे केवळ मानसिक मीलनाने किंवा तादात्म्याने सुखी होतात ही कल्पना एकांगी वाटू लागल्याने शारीरिक सुख, संतती-संपत्ती या गोष्टींनाही तितकेच महत्त्व आले. म्हणून चंद्रनक्षत्राशिवाय लग्नकुंडल्या तपासून घेण्याची पद्धती रूढ झाली. संतती सुखासाठी गुरु, रतिसौख्यासाठी शुक्र, अशा तऱ्हेने सर्व ग्रह तपासण्याची पद्धती आजकाल रूढ झाली आहे. त्यास आपण '**पत्रिका-मेलन**' असे नाव देऊ. सायन पद्धतीत रवीला विशेष महत्त्व असल्याने "रवी" सुद्धा पाहाण्याची पद्धती रूढ झाली. टॉलेमीच्या (१००–१७८ A. D.) काळापासून ही पद्धती अस्तित्वात आहे व अद्यापही ती पाश्चिमात्यांत चालू आहे.

## मंगळाचे खूळ

ग्रहांना नैसर्गिक तसेच राशिनिष्ठ शुभाशुभत्व असते. १, ४, ७, ८ व १२ या स्थानांतील "**मंगळ**" – मंगळ म्हणून समजला जातो. वास्तविक पाहाता सर्व ग्रह शुभ आणि सर्व ग्रह अशुभहि आहेत. ग्रहांच्या एकमेकांच्या संबंधांवरून व पत्रिकेतील भावस्थित परिस्थितीवरून त्यांचे शुभाशुभत्व ठरविणे हे जास्त शास्त्रीय ठरेल. तामसी, धाडसी, युद्ध प्रवर्तक, अपघाती, पाशवीवृत्तीचा, शीघ्रकोपी व **अतिकामी** असा मंगळाचा स्वभावधर्म असल्याने मंगळाची भीती अवास्तव निर्माण झाली व




तो अनर्थकारक ठरला. वस्तुतः अनर्थकारक मंगळ कोणता हेच बहुतेकांना माहीत नाही. त्यामुळे गैरसमज निर्माण होऊन आज त्याच्या पोटी **मंगळाचे खूळ** निर्माण झाले आहे ! कृत्तिका, आश्लेषा, विशाखा, जेष्ठा, मूळ, धनिष्ठा व शततारका इत्यादि क्रूर नक्षत्रांत मंगळ असता मंगळाची तीव्र फले आढळतात. याचा अर्थ असा नव्हे, मंगळ विशिष्ट स्थानी असूच नये. मंगळ नेहमी वाईट फले निर्माण करतो. या फलातून इतर ग्रहांचा जाब बघावा वगैरेसारखी आणखी काही खुळे निर्माण झाली. वास्तविक पाहाता मंगळाइतकेच शनी, राहू, केतू व विशेषतः हर्शल हे ग्रहसुद्धा वैवाहिक सौख्यात बिघाड निर्माण करतात. थोडक्यात एका-एका ग्रहाभोवती पत्रिका पाहून पत्रिका-मेलन करण्याची पद्धती अशास्त्रीय व तर्कदुष्ट आहे. **वधूवरांच्या पत्रिका साकल्याने बघून त्यांचे गुणदोष ठरविणे हे जास्त श्रेयस्कर, हितावह व शास्त्रशुद्ध आहे.**

भारताखेरीज इतर देशांत कोणती पद्धती आहे, या प्रश्नाचे उत्तर देणे जरा अवघड आहे. भारताजवळील ब्रह्मदेश, चीन, जपान इत्यादि देशांबद्दलसुद्धा अशा पद्धतीने कोणी विचार केलेला नाही. चिनी लोकांत पुरातन काळापासून फलज्योतिषाचा; विशेषतः नक्षत्रांचा अभ्यास आहे व त्यांनी नक्षत्रांचा देवतांशी संबंध दृढ केलेला आहे. यावरून एखाद्या पद्धतीचा अवलंब ते करीत असतील, असे वाटते. इंग्लिश आणि अमेरिकन मासिकांवरून तिकडील परिस्थितीची पुसट कल्पना येते. विवाहसंबंध दैवयोगे सुखाचा झाला तर कोणी ज्योतिषाच्या घरी खेटे घालीत नाहीत, पण त्यात बोटे भाजली तर पुढे अमुक एक तारखेला जन्मलेल्या व्यक्तीशी माझे पटेल का; अशा तऱ्हेची पृच्छा अनेक वाचक (बहुधा स्त्रियाच) संपादकाला करून आपली मनोव्यथा वेशीवर टांगतात. ज्योतिषाखेरीज Crystal Gazing चा धंदाही तिकडे चांगला चालतो. या मार्गाने काही मंडळी आपली जिज्ञासा तृप्त करून घेतात. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, पाश्चात्त्यांमध्ये

विवाहविच्छेद बराचसा सुलभ आहे. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य आहे. अर्थात एकदा झालेली चूक सुधारणे शक्य आहे ही भावना पाश्चात्त्य समाजात जास्त प्रबळ आहे. किंबहुना Free-will चा आभास– वाटल्यास साक्षात्कार म्हणा– त्यांना जास्त होतो. भारतातील मुसलमान, पार्शी हे समाज ज्योतिष्याचा सल्ला घेऊन विवाह करतात.

वर निर्देश केलेल्या पद्धतीने विवाहाचे वेळी पत्रिका अगर अन्य पद्धतीने ज्योतिषाचा सल्ला घेतला जातो. परंतु अगदी अलीकडील काळात या पद्धती उपयोगात आणल्या जातात काय हे अजमाविण्यासाठी मी ग्रहनक्षत्रफलादेश सं. मण्डळातर्फे १९६१ साली पुण्यात चाचणी पाहाणी केली त्याचा निष्कर्ष खाली देत आहे :—

| पेठेचे नाव | किती कुटुंबांची पाहाणी केली | कुटुंबे | १९५६–६१ पाच वर्षांतील कार्यसंख्या | किती कुटुंबांत पत्रिका पाहतात | नाहीत |
|---|---|---|---|---|---|
| शनिवार | ५८ | २२ | २८ | १७ | ५ |
| सदाशिव | ७७ | १८ | २१ | १४ | ४ |
| बुधवार | ६१ | २९ | ३२ | २५ | ४ |
| एकूण | १९६ | ६९ | ८१ | ५६ | १३ |

पाच वर्षांत एकंदर ६९ कुटुंबांत ८१ कार्ये झाली. त्यांतील ५६ म्हणजे शे. ८१ टक्के कुटुंबियांनी ज्योतिषाचा सल्ला घेतला, असे नमूद केले आहे. फक्त १३ म्हणजे १९ टक्के कुटुंबांनी ज्योतिषाचा कल घेतलेला आढळला नाही. त्याची कारणे शोधून काढणे फार अवघड झाले.

काही टीकाकार असे म्हणतील की गोळा केलेली आकडेवारी ती पांढरपेशा वर्गातील आहे. त्याला असें उत्तर द्यावेसे वाटते, की आकडेवारी ठराविक एका वर्गातील नसते. अशा पाहणीत सर्व वर्ग येतात. दुसरे असे की अडाणी म्हणून समजले जातात ते काहीच पाहात नाहीत, असे नाही. वधूचे नाव अमुक व वराचे नाव अमुक या गोष्टी विचारात घेऊन राशी ठरवाव्यात आणि त्यांचे पटेल किंवा नाही ते सांगावे अशी या मंडळींची अपेक्षा असते. अलीकडे मात्र जन्मतारखा, वेळ वगैरे गोष्टींची नोंद घेऊन मंडळी पत्रिका करण्यासाठी येतात. अर्थात या गोष्टींचा फायदा पुढील पिढीतील मंडळींस मिळणार आहे.

### आणखी एक चाचणी पाहाणी

| | विभाग १ | विभाग २ | विभाग ३ |
|---|---|---|---|
| चाचणीसाठी घेतलेल्या लग्नांचा आकडा | ८१२ | ६२४ | ३११ |
| पौरुषमा पद्धतीने झालेली लग्ने | ५४७ | — | — |
| पत्रिका पाहून झालेली लग्ने | — | ५१२ | ७८ |
| ज्योतिषाखेरीज इतर पद्धतीने केलेली लग्ने | २६५ | ११२ | २३३ |
| हिंदू | ७०९ | ५६२ | २८० |
| इतर | १०३ | ६२ | ३१ |

विभाग १ ला : दक्षिण हिंदुस्थानात १९४०–४१
विभाग २ रा : उत्तर हिंदुस्थानात १९५१
विभाग ३ रा : दिल्ली १९५५

[ ॲस्ट्रॉलाजिकल मॅगेझीन बेंगलोर; एप्रिल १९५९ अंक, पान ३८१. ]

पुण्याखेरीज व वेगवेगळ्या स्थळी, भिन्न काळी केलेल्या चाचणी पाहाणीत दिल्लीखेरीज झालेल्या विवाहांचे वेळी ज्योतिषपद्धतीचा शे. ८० टक्क्यांचेवर उपयोग केला जातो हे सिद्ध झाले आहे. या सर्व गोष्टींमागे खरोखरच अंधश्रद्धा आहे, की शास्त्र प्रचीती आहे, की एक वेडगळ कल्पना आहे या गोष्टींची छाननी करणे आवश्यक आहे ! परंतु यासंबंधी कोणी चाचणी पाहाणी केलेली आढळत नाही ! खरोखरीच तशी पाहाणी करणे अवघड आहे. कारण या ठिकाणी वैयक्तिक मताचा प्रश्न निर्माण होतो. सुखी वैवाहिक जीवन घालवलेली मंडळी स्वतःच्या कर्तृत्वाकडे बोट दाखविणार, तर विवाह होऊन कौटुंबिक जीवन मकास व निष्कळ झालेली मंडळी दैवाला दोष देणार ! किंवा वडीलधाऱ्या मंडळींना जबाबदार ठरविणार ! कारण लग्नाचे वेळी वधूवरांची वये गद्धेपचंविशीत असल्यामुळे इतर सांसारिक जबाबदारीचा विचार करण्याइतकी मने प्रगल्भित झालेली नसतात ! निव्वळ ती बाहुली असतात.

ज्या देशांत वैयक्तिक स्वातंत्र्य आहे, त्या ठिकाणचे घटस्फोटाचे आकडे भयंकर आहेत ! वैयक्तिक स्वातंत्र्यापेक्षा स्वैराचार फार असे म्हणावे लागते. कारण त्यात जबाबदारीचा अभाव फार दिसतो. आपल्याकडील प्रेमविवाह सर्वस्वी यशस्वी झाले आहेत, असेही ठामपणाने म्हणता येत नाही. याउलट ३६ गुण जमलेल्या विवाहांत थोडक्याच काळात वधू–वरात ६३ आकडा झालेला दिसतो ! असे असूनसुद्धा व्यावहारिक गोष्टींखेरीज विवाह जमविताना ज्योतिषासारख्या शास्त्राचा नकळत सल्ला घेतला जातो. पूर्वजन्माच्या घातलेल्या पूर्वगांठीचा उकल करण्याचा आशावाद त्यात अपेक्षित किंवा अभिप्रेत असतो एवढेच !

## शास्त्राचा 'योग्य' उपयोग व्हावा

इतकी तात्त्विक चर्चा केल्यानंतर, विवाह ही विधिलिखित किंवा दैवाधीन. घटना आहे हे मान्य केल्यानंतर पत्रिका पाहाणे अगर अन्य पद्धतीने विवाह ठरविताना ज्योतिषासारख्या शास्त्रांचा सल्ला घ्यावा किंवा नाही हा प्रश्न राहातोच ! पत्रिका पाहू नये असे मात्र माझे मत नाही, जरूर पाहावी व शाश्वत अशा विधिलिखित घटनांची उत्तम ज्योतिषाकडून पूर्णपणे सत्यस्थिति समजावून घ्यावी, म्हणजे भावी काळातील निराशा टाळता येईल. मानवाने पूर्णपणे सहेतूक प्रयत्न करावेत व हे प्रयत्न शास्त्रास धरून करावेत. परंतु प्रत्यक्षात मात्र या शास्त्राचा सवडीप्रमाणे, सोयीप्रमाणे व अशास्त्रीय पद्धतीने उपयोग करतात ही गोष्ट अत्यंत खेदाची आहे.

सर्वसाधारणपणे मुलींचे पालक स्थळ समजल्यानंतर वराकडे जातांना पत्रिकेसहितच आगमन करतात. काही वरांचे मंडळींना पत्रिका पाहाण्याची जरूरी वाटत नाही. तरी पण मुलीची पत्रिका आलीच आहे तर बघा ! एवढाच त्यांचा विचार असतो. पत्रिका पाहाण्याचे काम पुष्कळदा घरगुती 'गुरुजींकडे' (भटजीकडे) सोपविण्यात येते. सर्वच गुरुजींना ज्योतिषशास्त्राचे ज्ञान उत्तम असतेच असे नाही. असलेल्या तुटपुंज्या ज्ञानावर गुणमीलन (पत्रिकामीलन नाही) केले जाते. मुलगी सुस्वरूप असून पत्रिका न जमल्याने ती नाकारण्यात येते, याउलट पत्रिका जमते, परंतु मुलगी नापसंत असते. अशा गोष्टींमुळे विवाह अनेक वेळा लांबणीवर पडत असतात. यावर काही टीकाकार म्हणतील, " अहो त्या मुलाच्या अगर मुलीच्या लग्नाचे योगच आलेले नव्हते.' यावर आमचे असे म्हणणे आहे की, पत्रिका पाहून लग्नाचा अचूक काळ काढून दिला, तर वधूवरांचे मातापिता थांबण्यास तयार आहेत काय ?" अर्थात 'नाही' असे उत्तर मिळेल. कारण उपवर झालेली कन्या सुस्थळी जाऊन पडावी ही आई–वडिलांची घाई असते.

काही वेळा वधूवरांची पसंती झाल्यावर ज्योतिष्याकडे पत्रिका पाहाण्यासाठी येतात. ज्योतिषी पत्रिका पाहून काही महत्त्वाच्या घटना विशद करतात. वास्तविक त्या पडताळून पाहाणे हे वधूवरांच्या पालकांचे कर्तव्य असते. परन्तु या गोष्टीकडे संपूर्ण दुर्लक्ष केले जाते. दोन वर्षांपूर्वी वधूवरांची पसंती व लग्न मुहूर्त निश्चित झाल्यावर पत्रिका पाहाण्यासाठी मंडळी आली. पत्रिका पाहून मी वधूच्या मेंदूवर



अगर डोक्यावर काहीतरी परिणाम झाला असावा असे निदान करून वधूची संपूर्ण चौकशी करण्याचा सल्ला दिला. "अहो! साखरपुडा झाला. मुलगी ५–६ वेळा पाहिलेली आहे!" असे म्हणून ज्योतिष्याचा सल्ला झिडकारला! लग्नानंतर ती वधू संपूर्णपणे वेडी असल्याचे आढळून आले. विशिष्ट प्रकारच्या गोळ्या देऊन त्य वेड्या मुलीला उत्तेजित करण्याचा प्रयत्न होत असे.

काही वेळा अर्धवट ज्योतिषामुळे पंचाईत होऊन बसते. वधूची पत्रिका दिसेला त्या ज्योतिषाला व भेटेल त्या ठिकाणी दाखविण्याची अगतिक झालेल्या मातापित्यांना नकळत सवय झालेली असते. काही उत्तम ज्योतिषी अभ्यास करून अचूक गोष्टी सांगून आगामी कालाची पूर्ण कल्पना देतात. काही मंडळींना शास्त्राचे ज्ञान बेताचेच असते. साहजिकच घबराट निर्माण होण्याजोगे फलित सांगून ठेविलेले असते आणि तेसुद्धा मृत्यूसारखे! साहजिकच वधूवरांवर अशा गोष्टींचा गंभीर परिणाम होतो. तीन वर्षांपूर्वी अशीच घडलेली घटना मोठी मनोरंजक आहे. वधूवरांच्या पसंतीनंतर विवाह निश्चित झाला. विवाहदिवस ठरविताना वधू कारणमीमांसा न सांगता ऑक्टोबरनंतर विवाह दिवस ठरविण्याचा आग्रह करीत होती. कारण ऑक्टोबरपर्यंत मृत्युयोग असल्याचे भाकित एका अनभिज्ञ ज्योतिषाने सांगून ठेवलेले होते. वधूवरांच्या पत्रिकेचा संपूर्ण अभ्यास करून लग्न केव्हाही उरकण्याचा सल्ला दिला. आजतागायत दोन्ही वधूवर सुखाने नांदत आहेत.

जो दुसऱ्यास फसवितो तो स्वत:च फसतो, अशी एक म्हण आहे. त्यास अनुसरून काही वेळा अजब अनुभव येतात. वधू–वरांची वये कमाल मर्यादेबाहेर गेल्याने अगतिक झालेल्या वधू–वरांना मुलांच्या वयात काही कमी–जास्त फरक करण्याची इच्छा असते. म्हणून ही मंडळी मुलाचे अगर मुलीचे वय कमी असल्याचे सांगतात व पत्रिका बदलतात. पत्रिका देताना काही ठिकाणी जन्मतारखांचा पत्ता नसतो. काही वेळा जन्मतारखा व त्या दिवशीचे ग्रहांचा मेळ नसतो. अशा ठिकाणी निश्चितच हातचलाखी केलेली आहे, म्हणून समजावे. असे करण्यात खरोखरीच काहीही फायदा नसतो. दुसऱ्यास फसविण्यास जातात परन्तु स्वत:स फसवितात.

या विषयावर कितीही पाल्हाळिक लिहिले तरी अपुरेच आहे. विवाहासारख्या, जीवनात मांगल्य निर्माण करणाऱ्या घटनेत असे काळेबेरे प्रकार घडावेत ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

थोडवयात लग्न ही विधिलिखित घटना आहे, हे मान्य करून विवाहविधी उरका! अगर आपणाजवळ इतके धाडस नसल्यास शास्त्रीय ज्ञानाचा उत्तम सल्ला घ्या!

• • •

# नाही गाणे कंठी – नाही हा सुस्वर

न्यूझीलंडचा क्रिकेट संघ इंग्लंडच्या वाटेवर सध्या भारताचा पाहुणचार झोडीत आहे. भारतभर भटकून शिवाय त्यांच्या क्रिकेटच्या सरावात उणीव पडू नये म्हणून भारताबरोबर चार कसोटी सामने हा संघ खेळणार आहे. यातला मद्रासचा पहिला सामना अनिर्णित राहिला आहे. कलकत्ता येथील दुसरा त्या वाटेवर आहे. तिकडे वेस्ट इंडिजला गेलेल्या ऑस्ट्रेलियन संघाशी होणारे कसोटी सामने पाच दिवसांवरून सहा दिवसांवर नेले गेले, आणि येथे भारतात ते पाच दिवसांवरून चार दिवसांवर आणण्यात आले ! भारताच्या क्रिकेट कंट्रोल बोर्डावर कोण जे महाभाग आहेत त्यांना न्यूझीलंड संघाला, भारताच्या पैशाने क्रिकेटचा सराव घडवण्याची काय गरज होती ? चार दिवसांचे हे कसोटी सामने अनिर्णित नाही राहिले तरच नवल ! हे चित्र स्पष्ट दिसत असताना न्यूझीलंड संघासाठी भारतीय खेळाडूंना का राबवण्यात येत आहे, याचा जाब विचारणारे कुणी क्रिकेट तज्ज्ञ भारतात नाहीत काय ? हे वांझोटे सामने पाहायला क्रिकेटशौकीन मूर्खपणाने गर्दी करतील, या आत्मविश्वासावर कंट्रोल बोर्डाने हे ' विकतचे श्राद्ध ' उभे केले आहे.

## वांझोटे सामने

न्यूझीलंडने चार दिवसांपेक्षा जास्त दिवसांचे सामने खेळण्यास नकार दिला, त्यात त्यांच्या संघाच्या हिताचा परिपूर्ण विचार आहे. भारताबरोबर पाच दिवसांच्या सामन्यांत पराभव होईल ही धाकधूक त्यांना आहे. आणि भारतात मार खाल्ला तर इंग्लंडचे ' मार्केट ' जाईल व खेळाडूंचे धैर्यही खचेल, या भीतीने फक्त खेळण्याचा सराव तर घडावा, सामने अनिर्णित ठेवण्याचे श्रेय पदरात पाडावे व जो आर्थिक फायदा होईल तो खिशात घालावा असे हे सर्व लबाडीचे स्वार्थी धोरण या संघाचे आहे. त्यांच्या दृष्टिकोनातून विचार करताना हे योग्यच आहे.

परंतु आमच्या भारतात क्रिकेटची मक्तेदारी महाराज आणि नवाब अशा खाशा स्वाऱ्यांकडे ! सगळ्या जगाच्या क्रिकेटच्या संघांच्या खेळांची काळजी यांना ! ! मग त्याकरता भारताचे व पर्यायाने भारतीय क्रिकेटचे नुकसान झाले तर पर्वा कुणाला ? या न्यूझीलंड संघात जॉन रीड, डाउलिंग, सट्क्लिफ, जार्विस, पोलार्ड, मॉर्गन यांसारखे फलंदाज आहेत. मॉटझ्, कॅमेरॉनसारखे द्रुतगती गोलंदाज आहेत. यूल, पोलार्डसारखे स्पिनर्स आहेत अशी भलावण करूनही भागण्यासारखे नाही. हे

आपण मान्य करू की, हे सर्व उत्तम खेळाडू आहेत. पण म्हणून काय त्यांचा सराव पाहाण्यासाठी आम्ही भारतीयांनी पैसे मोजावे काय ? ज्या खेळांत चुरस निर्माणच होऊ शकत नाही, निकालाच्या संदर्भात जे निश्चित वांझोटे ठरणार आहेत, अशा या कसोटी सामन्यांसाठी गर्दी करणे म्हणजे निव्वळ पैसा व वेळ यांचा अपव्यय आहे.

**रणजी सामन्यांचा उपहास–**

अशा या वांझोटया कसोटी सामन्यांची रटाळ वर्णने आमच्या नभोवाणी केंद्रां-वरून ऐकवण्यापेक्षा तिकडे ऑस्ट्रेलिया-वेस्ट इंडिजमध्ये रंगणाऱ्या सामन्यांचे वर्णन रोज निदान पंधरा मिनिटे ऐकवले तरी श्रोते इंदिराबाईंना धन्यवाद देतील. रणजी करंडक सामन्यांना हजार प्रेक्षकही जमत नाहीत आणि परदेशी पाहुण्यांना पाहायला लोक पैसे मोजून गर्दी करतात, याला कारण आमचे गलथान सरकार आणि या सरकारचे नभोवाणी खाते. सर्व चुरशीच्या रणजी करंडक सामन्यांचे वर्णन नभोवाणीवर का नाही ? या सामन्यांतील खेळाडूंना भेटण्यासाठी आणि सामन्यांची शान वाढवण्यासाठी आमचे ' राष्ट्रपती ' आणि राज्यांचे ' गबर नवरे ' का मैदानावर येत नाहीत ? या सामन्यांचा गवगवा क्रिकेट कंट्रोल बोर्ड तितक्या उत्साहाने का करीत नाही ? तिकडे मुंबईला रणजी करंडकाच्या उपान्त्य सामन्यात हर्डीकरने द्विशतक ठोकले, नवा विक्रम प्रस्थापित केला. उत्तर विभागाने दुसऱ्या डावात शर्थ केली यांची वर्णने नभोवाणीवरून न देता न्यूझीलंड–भारताच्या केवळ क्रिकेट सरावाची वर्णने कसली ऐकवता ?

यावर कुणी असे म्हणेल, की सराव न्यूझीलंडच्या संघाला आहे. तसाच तो आपल्या संघालाही आहे. हे मान्य करूनही मग प्रेक्षकांच्या दृष्टीने या सामन्यांत पाहाण्यासारखे काय राहते ? लोकांनी सामन्यांची भरमसाट तिकिटे खरेदी करून हे वांझोटे सामने का पाहावयाचे ? हे सामने चारऐवजी तीनच ठेवून ते प्रत्येकी पाच दिवसांचे ठेवले असते तर कुणाची तक्रार नव्हती. म्हणजे प्रेक्षकांना पाहाण्या-इतपत चुरस या सामन्यांत निर्माण झाली असती व ' विझी 'चे ते भयानक नभोवाणी-निवेदनही आम्ही सहन केले असते. जोपर्यंत सामने निकाली झालेच पाहिजेत, असा आग्रह आमचे क्रिकेटशौकीन प्रेक्षक धरत नाहीत, तोपर्यंत आमचे क्रिकेट असेच कर्मदरिद्री अवस्थेत राहाणार आहे. आज परदेशांत आपल्या संघाला कुणी निमंत्रणच देत नाही. इथे यायला मात्र सगळेच संघ उत्सुक असतात याचे इंगित हेच आहे की, भारतात प्रेक्षकांना चुरशीची चटक नाही आणि नियंत्रक बोर्डाला आपले हिताहित कळत नाही. इथे हिशेब ठेवला जातो, फक्त विक्रमी भागीदारांचा आणि निश्चित अनिर्णित होणाऱ्या सामन्यांत काढलेल्या शतकांचा आणि द्विशतकांचा. इथे टाळ्यांना तोटा नाही आणि शिवाय समज बेताचीच. जाऊ द्या. यथा राजा तथा प्रजा !

**विंडीजचा महागडा दौरा**

आता लाचारीचे दुसरे उदाहरण पाहा. जशास तसे हे धोरण आपल्या एकंदर



सट्क्लिफ्-रीड : आमच्या पैशाने खुशाल सराव करा ! –

'पांढऱ्याशुभ्र' उच्च तत्त्वज्ञानाशी जुळणारे नाही ! ठीक आहे. 'जशास तसे' नको. परंतु तुम्ही आमचा मान ठेवा तर आम्ही तुमचा ठेवू इतपत स्वाभिमान तरी आपल्याला असावा की नाही ? परंतु लाचारी ही अशी गोष्ट आहे. वेस्ट इंडिज संघाच्या क्रिकेटक्षेत्रातील कर्तृत्वाबद्दल सर्व भारतीयांना आदर आहे. मागे वॉरेलच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर संघ जाण्यापूर्वी विंडिज खेळाडूंना इंग्लिश खेळाडूंपेक्षा कमी पैसे जेव्हा देऊ केले तेव्हा वॉरेलने ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट बोर्डाला अशी चपराक दिली की, तारेने वॉरेल, सोबर्स, कन्हाय यांचे पैसे इंग्लिश खेळाडूंएवढे वाढवण्यात आले ! त्यांचा हा स्वाभिमानही कौतुकास्पद आहे. याच वेस्ट इंडिज संघाने भारतात नोव्हें. १९६५ पासून फेब्रु. १९६६ पर्यंत सहा दिवसांचे पाच कसोटी सामने व इतर तीन दिवसांचे नऊ सामने खेळण्याकरता किती रक्कम मागितली आहे ? त्यांना प्रत्येक कसोटी सामान्यासाठी एक लाख वीस हजार रुपये व तीन दिवसांच्या नऊ सामन्यांसाठी किमान प्रत्येकी तेवीस हजार हवे आहेत ! याशिवाय त्यांना पंचाहत्तर हजार रुपये भारतातील प्रवासखर्च व इतर खर्चासाठी हवे आहेत. शिवाय अट आहे की या कशावरही कसलाही कर असता कामा नये. म्हणजे सुमारे दहा लाख बावन्न हजार रुपये त्यांना आपण द्यावयाचे आहेत.

आपल्याला परवडत असेल तर अर्थातच ते आपण जरूर द्यावे.

त्यांनी इतके पैसे मागितले या बाबतीत कुणाची तक्रार असू नये. त्यांनी ऑस्ट्रेलिया व इंग्लंड यांच्याशी शर्थीच्या लढती देऊन आपली किंमत शाबीत केली आहे. परंतु याबाबतीत नियम असा असतो की, जेवढे कमीत कमी पैसे आपण पाहुण्यांना कबूल करू तेवढे पैसे त्यांच्या देशात आपण दौऱ्यावर गेलो तर आपल्याला मिळायला हवेत.

वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने चक्क कळवले आहे, " आमच्या याच अटी आम्ही तुमच्या दौऱ्याचे वेळी मान्य करू असे बंधन आमचेवर नाही. "

जर वेस्ट इंडिज संघ व भारतीय संघ यांच्या क्रिकेट नैपुण्यांत आज एवढी तफावत असेल तर त्या संघाला येथे बोलावता कशाला ? एवढी तफावत नसेल तर वेस्ट इंडिज संघ हा दौरा करून आपल्यावर उपकार करीत आहे अशा पद्धतीने, त्यांनी अपमानकारक अट घालू नये अशी आमची अपेक्षा असायला हवी. आमच्या भारतासारख्या गरीब देशाला हे जावई खर्च परवडणारे नाहीत. एका साध्या पत्राने हा रोखठोक जबाब दिला गेला असता, तर मग काय हवे होते ? वेस्ट इंडिजची समजूत काढण्याकरता आमचे दिल्लीश्वर बोर्डाधिकारी तोंडात लाळ घोळवीत वेस्ट इंडिजला जाऊन आले. पदरात काय पडले ते कृष्णमाचारी जाणे ! कारण एवढा पैसा हॉल आणि ग्रिफिथकडून थोबाडे फुटण्याकरता खर्ची घालण्यापूर्वी कृष्णमाचारींकडे परकीय चलन मागावेच लागणार आहे !

## घालीन लोटांगण—पुरे करा !

खरे बोलायचे तर वेस्ट इंडिजमध्ये आपण पाचही कसोटी सामने हरलो, त्या-वेळची आपली परिस्थिती आणि आजची परिस्थिती यांत फारसा फरक पडला आहे, असे वेस्ट इंडिज संघाला वाटत नसावे. त्यांना भारतात एवढ्याचसाठी येण्याची इच्छा आहे की, लाचारपणे भारतीय क्रिकेट नियंत्रक मंडळ त्यांच्या भरमसाट अटी मान्य करील, असा विश्वास त्यांना वाटतो !! जोपर्यंत हॉल किंवा ग्रिफिथ यांच्या जवळपास येऊ शकणारे द्रुत गोलंदाज आपलेकडे नाहीत, तोपर्यंत वेस्ट इंडिजला येथे बोलावून हात दाखवून अवलक्षण न करून घेणे चांगले. हा 'तमाशा' फारसा खर्चात पाडणारा, आतबट्ट्याचा व लाचारीचा नसता तर त्यालाही हरकत नव्हती. परंतु हा सगळाच व्यवहार गळेपडूपणाचा आहे. आपला देश गरीब आहे किंवा आम्हाला या खेळात विंडिजइतके प्राविण्य नाही, याचे दुःख असावे पण शरम वाटण्याजोगे यात काही नाही. परंतु आम्ही लाचार आणि स्वाभिमानशून्य आहोत याचेच कौतुक करण्याचा बेशरमपणा मात्र आम्हाला जमत नाही याबद्दल क्रिकेट शौकिनांनी आम्हाला क्षमा करावी. दिवस होळीचे आहेत. हा सगळा मामला नेमका कसा आहे, याचे अगदी ग्राम्य शब्दांत वर्णन करण्याचा मोह आम्हाला होतो आहे. परंतु तो आम्ही आवरतो. ● ● ●



# श्री. सदानंद जोशी यांचे 'अत्रे-दर्शन'

## ते हशे त्या टाळ्या !

'मी अत्रे बोलतोय' या सदानंद जोशी यांच्या एकपात्री कार्यक्रमाच्या यशाबद्दल वृत्तपत्रांतून स्तुतीसुमने आली आहेत व स्वत: आचार्य अत्रे यांनी 'या कार्यक्रमामुळे आपण जिवंतपणी अमर झालो' असे उद्‌गार काढले आहेत. आ. अत्रे यांच्या भाषणातील 'हशा–टाळ्यां'ची ज्यांनी चव घेतली आहे, त्यांच्या लेखनावर जे फिदा आहेत त्यांच्या सर्व चाहत्यांना हे सर्व अभिप्राय कार्यक्रम पाहून यथायोग्यच वाटतील. कारण आचार्यांच्या वक्तृत्वातील 'ते हशे आणि त्या सर्व टाळ्या' सदानंद जोशी यांनी या कार्यक्रमात एकत्र केल्या आहेत. अत्र्यांची नक्कल न करता जरी हे किस्से चारचौघांत कुणी सांगितले तरी हशाची कारंजी उभी राहू शकतील, मग हे सांगणारा जर अत्र्यांची प्रतिकृतीच उभी करू शकला तर त्या कार्यक्रमाला लोक गर्दी करतील हा सदानंद जोशी यांचा धंदेवाईक अंदाज बरोबर ठरला यात नवल नाही.

## नकलाकार जोशी

या कार्यक्रमाबाबत आमची शंका एवढीच आहे की, 'आचार्य अत्र्यांचें साहित्य व व्यक्तिमत्व यांचे दर्शन घडवणारा' असा हा प्रयोग खरोखरच आहे काय ? या कार्यक्रमाचे आपण दोन भाग मात्र केले पाहिजेत. एक अत्र्यांच्या नकलेचा व दुसरा अत्र्यांच्या व्यक्तिमत्व दर्शनाचा. यांतील नकलेच्या भागाबद्दल श्री. सदानंद जोशी यांनी आपल्या अभिनय कौशल्याने तक्रारीला जागा ठेवलेली नाही. अत्रे चालतात

कसे, माईकपाशी वागतात कसे, बोलतात कसे, हुकमी टाळ्या घेतात कसे, हे सर्व सदानंद जोशी यांनी यथातथ्य उभे केले आहे. (फक्त विनोदाच्या पुरात स्वतः अत्रे हसू लागतात, हे हसणे, जोशांना जमलेले नाही.) परंतु ही नक्कल व निवेदन यांत एक महत्त्वाचा विचार सुटलेला आढळला. जे अत्रे प्रेक्षकांसमोर त्यांनी सुरुवातीपासून उभे केले आहेत ते आजकाल महाराष्ट्रापुढे असलेल्या स्वरूपात. साठी उलटलेले अत्रे आपल्या जुन्या आठवणी सांगत आहेत अशा तऱ्हेची निवेदन पद्धती स्वीकारल्यानंतर, अत्रे यांनी लहानपणी कसे भाषण केले हे सांगताना लहान मुलाचा अभिनय श्री. जोशी का सादर करतात? किंवा भावेस्कूलमधील मास्तरांचे संवाद त्यांच्या आवाजात का ऐकवतात? अत्र्यांच्या भूमिकेतून निसटून या नव्याच नकला सादर करताना अत्र्यांचे व्यक्तिमत्व बाजूस राहून फक्त नकलाकार जोशीच डोकावू लागतात व कार्यक्रमावरची त्यांची पकड ढिली पडते.

'असा मी असा मी' मध्ये निवेदक पु. ल. हे 'बेंबट्या जोशी' उभा करताना जे स्वातंत्र्य घेतात ते स्वातंत्र्य अत्रे उभे करताना सदानंद जोशी यांना यशस्वी-पणाने घेता येणार नाही. कारण 'असा मी असा मी'त हे बेंबट्या जोशाद्वारे घडणारे नकलाकार पु. लं.चे दर्शन अधिक आकर्षक ठरले तरी अत्रे द्वारे घडणारे नकलाकार सदानंद जोशी यांचे दर्शन तितके आकर्षक वाटत नाही. कारण 'बेंबट्या जोशी' हा सामान्य कारकून तर अत्रे हे जबरदस्त व्यक्तिमत्व. म्हणून या कार्य-क्रमात इतर नकला सादर करणे हे या कार्यक्रमाला मारक ठरते आहे. हा मोह जोशी यांनी टाळावा असे वाटते. कारण अत्रे हे नकलाकार म्हणून मुळीच प्रसिद्ध नाहीत. (या नकला पाहताना लोक हसतात ते निराळ्या संदर्भात! लोक हसतात हाच निकष मानला तर मध्येच एखादा चुटका सांगूनही लोक हसू शकतील.) तेव्हा नकलेबाबत श्री. जोशी यांनी जे यश मिळवले आहे ते निवेदनाच्या सदोष पद्धतीने काही प्रमाणात गमावले आहे.

आता निवेदनातून अत्र्यांच्या साहित्याचे काय दर्शन घडते ते पाहू. अत्रे यांच्या नाटकांना तोबा गर्दी होते व फडक्यांनी 'काळे गोरे' नावाचे भिकार नाटक लिहिले आहे. नाटककारांची पंगत बसली तर अत्रे यांना निदान आडवे पान तरी मिळेल. परंतु फडके यांना उष्टी काढायलाही कुणी बोलावणार नाही, असे अत्रे यांना वाटते. 'मी उभा आहे' या नाटकात त्यांनी मतदारांच्या याद्यांमध्ये काय विनोद भरलेला असतो हे दाखवलेले आहे. या माहितीव्यतिरिक्त त्यांच्या नाटकांविषयी काहीही या निवेदनात नाही. आता काव्याविषयी. त्यांना व्हावयाचे होते मोठेपणीचे बाल-कवी. परंतु त्यांनी लिहिली मात्र विडंबन काव्ये. त्यांना मर्ढेकरांची कविता समजत नाही व आवडत नाही. उंदीर पितात का मेले? बाहेर का नाही मेले? ते ओले का होते? असे प्रश्न त्यांना पडतात. बस्स् खलास हे अत्र्यांच्या काव्याचे व काव्य-विषयक मतांचे दर्शन!

### नाही मी बोलत

आता त्यांच्या व्यक्तिमत्वाचे काय दर्शन घडते ते पाहू. श्री. काका गाडगीळ व शंकरराव देव या दोन अधिकारावर नसलेल्या निरुपद्रवी व्यक्तींसंबंधी अत्र्यांनी जे जाहीर भाषणातून सांगितले त्याने महाराष्ट्राला हसवले यात शंका नाही. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सगळे वाचावीर दारे–खिडक्या लावून बसले असताना आचार्य अत्रे यांनी मंत्रिपदाची वस्त्रे मिरवणाऱ्यांचे जाहीर सभांतून जे मुंडन केले त्याने महाराष्ट्राला नुसते हसवले नाही तर जागे केले. त्यांच्या वाणीने आणि लेखनाने काँग्रेसी तक्त हादरून गेले. याचे दर्शन या संबंधात का नाही ? त्यावेळी मराठ्यातील एखादा अग्रलेख ते त्वेषाने सांगत आहेत हे का पाहावयास मिळाले नाही ? फडके, गाडगीळ, देव किंवा ढमढेरे यांच्यावरील विनोदाचे मात्र साग्रसंगीत दर्शन आणि खादीचे अभ्रे चढवलेल्यांच्या व त्यावेळी नेहरूंच्या कुशीत शिरलेल्यांबाबत अगदी ' नाही मी बोलत नाथा ' असे का ? आचार्य अत्र्यांच्या व्यक्तिमत्वाची मुख्य प्रेरणा आहे महाराष्ट्रावरील सामाजिक व राजकीय अन्याया-विरुद्ध त्यांना येणारी चीड. त्यांच्या सर्व चळवळींना एका किमान सामाजिक आश-याच्या आग्रहाची जोड आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत म्हणूनच अगदी शर्थीनं त्यांनी ' मराठा ' झुंजत ठेवला. त्यांच्या या कर्तृत्वाची त्यांच्या व्यक्तिमत्वा-तून वजावाट करून कसे चालेल ? प्रत्यक्ष समाजकारणात आणि राजकारणात धडाडीने पाऊल उचलणारे असे चतुरस्त्र साहित्यिक व्यक्तिमत्व (एक स्वा. सावर-कर वगळता) आज फक्त आ. अत्रे यांचेच आहे. कुठल्याही अन्य हयात साहि-त्यिकाला हा अधिकार सांगता येणार नाही. आ. अत्रे यांच्या संयुक्त महाराष्ट्र-विषयक आंदोलनातील साहित्यिक कर्तृत्वाचा व नेतृत्वाचा मागमूस श्री. जोशी यांच्या कार्यक्रमात आढळत नाही. मग आढळते काय ?

### अश्रू कडा

इंग्लंडहून परतल्यानंतर त्यांच्या प्रथम पत्नीचा करुण मृत्यू अथवा ' श्यामच्या आई ' ला राष्ट्रपतिपदक मिळाल्याचे वृत्त आईच्या अस्थिविसर्जनानंतर लगेच हाती पडणे यांतील दारुण नियती या प्रसंगात श्री. जोशी यांनी कौटुंबिक जीवनातील अत्र्यांच्या हळूवार मनाचे दर्शन घडवले आहे. ते मनाला चटका लावून जाते.

अत्र्यांचे व्यक्तिमत्व तीन तासांच्या कार्यक्रमात पकडणे ही गोष्ट सोपी नव्हती. विशेषत: त्यांच्या अनेक क्षेत्रांतील कर्तृत्वाचा भाग अचूक मांडणे ही गोष्ट तर काहीशा अभ्यासाचीच होती. म्हणून श्री. जोशी यांनी फक्त ' ते हशे त्या टाळ्या ' यांचीच झलक दाखवण्याचा सोपा मार्ग पत्करला असावा. त्यामुळे झाले आहे काय तर सर्व कार्यक्रमाचा एक सलग परिणाम प्रेक्षकांच्या मनावर उमटत नाही. नकला-कार जोशी यांचे कौतुक मात्र मनात रेंगाळते. आणि अत्र्यांच्या गाजलेल्या सभांच्या स्मृती जाग्या होतात.

● ● ●

## एलेन रे स्नेज यांचा

# ' हिरोशिमा मोन एमोर '

## चित्रपटाला नवी दिशा सांगणारा फ्रेंच चित्रपट

जगातल्या सर्व देशांत तिथल्या तिथल्या परिस्थितीनुसार चित्रपट निर्माण होतात. क्वचित दोनतीन देशांत तयार होणाऱ्या विवक्षित कालातील चित्रपटांत तोच गुण आढळतो. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील काही इटालिअन व काही जपानी चित्रपट हे भारतीयांना अस्सल भारतीय विषय हाताळणारे वाटतात. दुसरी एक गोष्ट अशी की, चित्रपट दोन प्रकारचे आढळतात. काही चित्रपट हे लोकप्रिय होतात, पैसा मिळवून जातात. परंतु लगेच शिळे होतात; तर काही चित्रपट थिएटरमध्ये फार काळ टिकाव धरू शकत नाहीत तरी ते काळावर मात करून जातात. अलीकडील उदाहरणे म्हणजे राजा परांजपे यांचा ' पेडगावचे शहाणे ', बहलचा ' सूरत और सीरत ', गुरुदत्तांचा ' साहेब बिबी और गुलाम ', राज कपूरचा ' जागते रहो ' वगैरे असे चित्रपट कधी शिळ होत नाहीत. कारण त्यांमागील प्रेरणा ही एखाद्या चांगल्या कलावंताची प्रेरणा असते.

अशा चित्रपटांचे निर्माते व लेखक ही माणसे सतत नव्या कथावस्तूंसाठी किंवा अभिव्यक्तींच्या नव्या प्रयोगांसाठी धडपडणारी असतात. जणू चित्रपट या माध्यमाचे बळ किती मोठे असू शकते याचा ते सतत अंदाज घेत असतात, नवी नवी आव्हाने स्वीकारून. ' सूरत और सीरत ' या चित्रपटाकडेच पाहा ना. एक नाकारलेली अगदी सामान्य मुलगी, तिला नाकारल्यानंतर अपघाताने आंधळा झालेल्या त्याच माणसाशी लग्न करते. त्याला पुन: अपघाताने दृष्टी येते तेव्हा आपल्या आंधळेपणाचा फायदा घेऊन जिने आपल्याला फसविले तिच्याशी तो बोलणे टाकतो, तिच्याशी तुसडेपणाने वागू लागतो. तिचा सगळा त्याग विसरतो. ती मुलगी आता एका मुलाची आई असते. दुसरा पोटात वाढत असतो. संसाराच्या ऐन मध्याला नवऱ्याला येणारी ही दृष्टी चित्रपटात अपघाती असली तरी व्यवहारात विवाहाची काही वर्षे संपल्यावर संसारात नीरसता आणणाऱ्या असंख्य पुरुषांची ही ओळखीचीच शोकांतिका आहे! म्हणून हा चित्रपट कधी शिळा होणार नाही. सर्व चित्रपट पाहताना कॅमेरा किती बोलका असू शकतो याची ओळख सतत पटत



रीव्हा व ओकाडा

जाते. या चित्रपटाचे छायाचित्रकार कुणी किशोर रेगे हे होते. या चित्रपटानेच त्यांचे एवढे सामर्थ्य प्रत्ययाला आले असूनही त्यांचे नाव तद्नंतर मात्र कुठे पुनः का ऐकू आले नाही ते कळत नाही. हा चित्रपट पाहाण्याची संधी आली तर सोडू नका !

## प्रेम म्हणजे काय ?

इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे चित्रपटात आशय व अभिव्यक्तीत निरनिराळे प्रयोग करण्याच्या बाबतीत पाश्चात्त्य चित्रसृष्टी आघाडीवर आहे. असे दोन फ्रेंच चित्रपट नुकतेच पाहाण्यात आले. यातील एक चित्रपट म्हणजे एलेन रे स्नेज यांचा 'हिरोशिमा मोन एमोर' हा चित्रपट. हिरोशिमाच्या हिरवळीवरील ही एक प्रेमाच्या अपमृत्यूची कथा ! हा चित्रपट काय हाताळू पाहातो ते पाहा. तरुण स्त्री–पुरुषांतील प्रेम म्हणजे नेमके काय ? ज्याला प्रेम म्हणतात त्याचे नेमके आधार काय असतात ? म्हणजे ते कशावर उभे राहाते ? कशामुळे सजीव झाल्यासारखे वाटते ? ते संपते किंवा नाहीसे होते म्हणजे नेमके काय घडते ? या प्रेमाचा प्रेमात पडलेल्या व्यक्तींच्या स्मृतीशी किंवा कल्पनाशक्तीशी काही नाते असते काय ? [ असंख्य हिंदी चित्रपट पाहून या भावनेसंबंधी एक फर्मास वाक्य फक्त आपल्याला ठाऊक होऊ शकते, " मोहब्बत की नही जाती, होती है। परंतु होती है' या पलीकडे काय ? छेऽऽऽडो न मेरी जुल्फे सब लोग क्या कहेंगे । ] बस्स संपलं.

## कादंबरी आणि चित्रपट

हा प्रेमविषय हाताळतानाच या फ्रेंच चित्रपटात गतायुष्याची असंख्य रूपे मांडण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. काही गत घटना अशा असतात की, त्या आपण विसरलेले असतो. परंतु आपल्या वर्तमान आयुष्यावर त्या सतत परिणाम करीतच असतात. काही एकदम स्मृतीच्या पडद्यामागून डोकावून आपल्याला दचकावतात, वर्तमान आयुष्याची चव बिघडवतात. काही मात्र कायमच्या दृष्टिआडच राहातात. काही गतायुष्य आपण पुन: सजीव करण्याच्या/व जगण्याच्या प्रयत्नात असतो व ते करणे सहसा जमत नाही.

आता हे सर्व एखाद्या कादंबरीत सहज हाताळता येईल. कादंबरीत मागच्या आयुष्याचे नाते उलगडून दाखवता येते, नवे जोडता येते वा तोडता येते आणि या चित्रपटाचा दिग्दर्शक रे रनेज हा नेमकी अशीच जिद्द बाळगतो. "I want to rediscover at the Cinema the conditions of reading" [मला सिनेमा पाहाणाऱ्या प्रेक्षकाला वाचनाचा आनंद देता येतो का हे पाहावयाचे आहे.]

## कथा

या चित्रपटाची कथावस्तू साधी आहे. तिचा विस्तार फक्त २४ तास. 'ती', एक फ्रेंच नटी हिरोशिमात शांततेच्या प्रचाराचा चित्रपट काढण्यासाठी आलेली आहे. शुटींग संपले आहे. दुसऱ्या दिवशी ती मायदेशाला परत जाणार आहे, त्या दिवशी ती 'त्याच्या' प्रेमात पडते. 'तो' असतो एक जपानी इंजिनियर. हिरोशिमामध्ये अणुस्फोटानं झालेल्या विध्वंसनाची स्मृती तिथले म्युझियम पाहाताना तिच्या मनात जागृत होते. महायुद्धाच्या स्मृतीबरोबर फ्रान्स देश जर्मन वर्चस्वाखाली असताना, चौदा वर्षांपूर्वी ती ज्या जर्मन सैनिकाच्या प्रेमात पडली होती त्याची स्मृती जिवंत होते. त्या प्रेमातील आर्तता, त्या प्रेमाचे अशक्यप्राय स्वरूप, त्या सैनिकाचा मृत्यू या सर्व आठवणी ती त्याला सांगू लागते. काही प्रसंग, आठवणी सांगते, कांही मनश्चक्षूंनी पाहाते. त्याला तिच्या पहिल्या प्रेमाची हकीकत संपूर्ण ऐकाविशी वाटते. हकीकत सांगताना ती पहिल्या प्रेमाच्या आठवणीनं, आर्ततेनं हतबल होते. त्याचा तिला सतत आधार घ्यावा लागतो. त्याच्याविषयी वाटू लागलेले 'नवे प्रेम' तिच्या या मानसिक उद्रेकात निष्प्राण होते. त्याला तिची ही मनाची उलघाल समजतच नाही. ती त्याच्यापासून दूर होते. रात्रभर एकमेकांपासून ती दोघे दूर पळत असतात. पुन: चुकून भेटतही असतात. तो अपमानित होतो, रागावतो, चिडतो.

सकाळ होते. रात्री तिचे एक प्रेम सजीव होते. दुसरे अपमृत्यू पावते. ती निघून जाते. तो आपल्या औट घटकेच्या पहिल्या प्रेमाच्या सुखद स्मृती कुरवाळू लागतो.

चित्रपटभर फ्रान्समधील नेव्हर्स या गावातील तिच्या गतायुष्यातील पहिल्या


प्रेमाचे तिच्या मनात सजीव होणारे प्रसंग आणि 'हिरोशिमामधील' त्यांच्या प्रेमाची प्रत्यक्षात होणारी शोकांतिका या दोन कथा एकत्र सांधल्या आहेत.

### मोलाचे अपयश

'या चित्रपटात आपल्याला काय साधायचे आहे?' या प्रश्नाला उत्तर देताना रे स्नेज म्हणतो, " I want to make films that are experiences. The Cinema for me is still very rough and priomitive medium to approah the Complexity of though and of its mechanism. " म्हणजे रे स्नेज याला मानवी मनाचे व्यापार व त्यांचे स्वरूप उलगडण्यासाठी सिनेमा हे माध्यम काहीसे रुक्ष व अगदीच बालबोध वाटते, असे तो कबूल करतो.

आता माध्यम कमी पडले की रे स्नेज कमी पडला? चित्रपट पाहाताना तो कंटाळवाणा वाटला. मानसिक गुंतागुंतीचा वाटला, परंतु या गुंतागुंतीचे धागे अस्पष्टच राहिले. तेव्हा या चित्रपटाचा उल्लेख यापुढे होत राहील, तो एक नव्या दिशेचा, फसलेला प्रयत्न म्हणूनच. प्रयोग फसलेला असला तरी दिशा नवी होती म्हणून या चित्रपटाचे महत्त्व शिल्लक राहातेच—व तो शिळाही होत नाही.

● ● ●




एक मासा—'प्रिये, तू मला नकार दिलास तर जमिनीवर उडी टाकून मी जीव देईन.'

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

### ● कोंबड्यांचे समाजशास्त्र

रिकामे न्हावी आणि सरकारी समित्या यांच्यांत भिंतीला तुंबड्या लावण्याच्या कामी अधिक तरबेज कोण हे सांगणे कठीणच. आधी मुळी सरकारी समित्यांना रिकामपणाच्या पायी फुरसदच नसते. – अन् ती कधी काळी मिळालीच तर त्या काय उद्योग करून ठेवतील हे " देवो न जानाति कुतो मनुष्यः ? " परवाच एक चुटका वाचला : एका माणसाने उंट प्रथमच पाहिला तेव्हा त्याने दुसऱ्याला विचारले, " हे अजब जनावर काय आहे ? " दुसरा म्हणतो, " तुम्हांला माहीत नाही ? हा घोडा आहे –– एका समितीनें तयार केलेला ! " तात्पर्य काय, समिती-नामक प्राण्याचे तिरके डोके केव्हा कुठे चालेल याचा नेम नाही.

" कोंबड्यांचा सामाजिक दर्जा व त्याचा त्यांच्या अंडेउत्पादनक्षमतेवरील परिणाम " या विषयावर संशोधन करून एक विद्वत्ताप्रचुर अहवाल तयार करण्याचे काम थोड्याच दिवसांपूर्वी ब्रिटिश सरकारच्या एका समितीने केले––आता बोला ! समीतीचा शोध असा की कोंबड्यांच्या समाजशास्त्रात कुणी कुणाला टोचावे याचे कडक नियम आहेत. आणि जिचा ' टोचक ' दर्जा वरचा, ती कोंबडी जास्त अंडी घालू शकते, जिचा खालचा, ती कमी, पण खालच्या दर्जाच्या कोंबड्यांना 'स्टेटस्'-वाल्या कोंबड्यांपासून दूर ठेवले तर मात्र त्यांची अंडीउत्पादनक्षमता तोडीला तोड ठरते. हर हर ! लोकशाहीचे माहेरघर असलेल्या इंग्लंडातल्या कोंबड्यांतदेखील एवढा जबरदस्त सामाजिक उच्च–नीच भाव असावा न ? पण कोंबड्यांच्या न्यूनगंडाचा माणसांच्या ब्रेकफास्टवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असल्याने सर्व कोंबडी समाजाला शक्य तेवढ्या त्वरेने समाजवाद शिकविण्याची नितांत आवश्यकता आहे असे मी पंतप्रधान विल्सन यांच्या निदर्शनास आणू इच्छितो. हवे असले तर भारतीय समाजवादाचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी कोंबड्यांचे एक शिष्टमंडळही इकडे पाठवावे.

### ● मंत्री आणि पाटी–दप्तर

लोकसभेत घोरणे हे पार्लमेंटरी शिष्टाचाराला संमत नसले तरी झोपायला हरकत नाही असे मागे सभापतीनी सांगितल्यापासून बहुतेक एम्पी कायदे घडविणे व झोप काढणे ही दोन्ही महत्त्वाची कामे एकाच वेळी करीत असतात. पण क्वचित् जागेपणी एखादा सभासद लाखाची गोष्ट सांगून जातो. परवा एका सभासदाने

अचानक अशी कल्पना मांडली की मंत्र्यांना राजभाषा हिंदी शिकविणारी एखादी शाळा असावी. आयडिया एकदम अफलातून ! प्रश्न एवढाच की हे शाळकरी मंत्री शिकतील ती हिंदीच असेल काय ? राजधानीत राजभाषेची ससेहोलपट हा एक पीएच्. डी. च्या प्रबंधाचा विषय होऊ शकेल. पण ते सोडले तरी दिल्लीची हिंदी हा एक मोठा विनोद आहे. मंत्री नसलेली जी मुले येथल्या शाळांतून शिकतात त्यांच्या हिंदी क्रमिक पुस्तकांत 'दया' या शब्दाचा अर्थ 'रहम' असा दिला आहे, तर 'मुख्याध्यापिका' म्हणजे 'हेड-मिस्ट्रेस' असे स्पष्टीकरण (?) आहे. 'समय' म्हणजे काय असा तर मुळीच प्रश्न पडायला नको. कारण त्याचे दोन दोन अर्थ दिले आहेत– टाइम आणि वक्त ! अर्थात् या शाळांतून शिकले-सवरलेले दिल्लीचे वकील "वृष्ट" कोर्टात वकीली करीत असल्यास नवल काय ?

दिल्लीच्या बशीत ज्याला बसायचे असेल त्याने "कृपया पंक्तिमें" उभे रहावे असा आदेश दिलेला असतो. (–तसे कोणीच करीत हा नाही भाग वेगळा.) ज्याच्याजवळ स्वतःचे वाहन असेल त्याला "विरामचिह्" असताना डावीकडे वळू नका असे बजावण्यात येते. दिल्लीला 'अशोका' रोड आहे आणि 'अशोका' हॉटेलही आहे. ही अशोका कोण ? बुद्धाला शरण जाण्यापूर्वी जो अशोक चंडाशोक म्हणन ओळखला जायचा त्याला दिल्लीकरांच्या भीतीने एकदम हातात बांगड्या भरून 'अशोका' व्हावे लागले नं ? विच्चारा !

## ● नवऱ्यांना जगविण्याची कला

"हाउ नॉट टु किल युवर हजबंड" नावाचे एक पुस्तक इंग्रजीत लिहिले गेले आहे म्हणे ! पुस्तक अजून अस्मादिकांनी पाहिलेले नाही, तेव्हा ते ऑस्ट्रेलियात खरोखरीच अस्तित्वात असलेल्या "सोसायटी फॉर द प्रिव्हेंशन ऑफ क्रुएल्टी टु हजबंडस्" या संस्थेच्या मार्फत प्रकाशित झाले आहे की काय याची कल्पना नाही. ते काही असले तरी भूतदया ही केवळ कुत्र्या-मांजरांपुरती मर्यादित न राहाता नवऱ्यांनाही दाखविण्यात आली तर आनंदच आहे. तसे पाहिले तर सगळ्या पाळीव प्राण्यांत नवरा हा अत्यंत निरुपद्रवी व प्रसंगी उपयुक्त प्राणी आहे हे कुणालाही पटण्यासारखे आहे. शेजारच्या रमाबाईंच्या नाकावर टिच्चून त्यांच्यापेक्षा चांगली साडी घ्यायची असली तर महिन्याच्या शेवटीही कोण नंदीबैलासारखी मान हलवतो ? नवरा. तिखटजाळ भाजी कोण गोड मानून घेतो ? नवरा. खारट खारट आमटीत "आवडतीचे मीठ" आहे हे जाणून कोण मुकाट्याने मूग गिळतो ? अर्थात् नवरा. तेव्हा बायांनो, मनी, मोत्या आणि नवरा या तिघांनाही सारख्याच प्रेमाने पाळा.

● ● ●



# कणाकणाने उठला सेतु


धनुर्धर रामाची वानरसेना दुष्ट रावणाचें पारिपत्य करण्यासाठीं लंकेला निघाली. पण वाटेंत लाटांचें तांडव करणारा खवळलेला सागर आडवा आला. ही अडचण जणूं अनुल्लंघ्यच वाटूं लागली. पण राम आणि त्याची वानरसेना यांच्या वज्रनिर्धारापुढें सागराच्या तांडवाचें काय चालणार! प्रत्येकानें आजूबाजूला जाऊन एकामागोमाग एक दगड आणून समुद्रांत टाकावयास सुरवात केली. दगडादगडानें सेतु बांधला गेला. रामाची सेना लंकेंत गेली आणि रावणवध करून विजयी झाली.

आज आपल्या राष्ट्रावरहि आणिबाणीची वेळ आली आहे. या क्षणीं प्रत्येकानें आपलें कर्तव्य केलें पाहिजे. दशवर्षीय डिफेन्स डिपॉझिट सर्टिफिकिटें खरेदी करून तुम्हांला तुमचें कर्तव्य बजावतां येईल. ५० रुपयांच्या पटींत ही सर्टिफिकिटें मिळूं शकतात, त्यावर ४३ टक्के दरानें दरसाल व्याज मिळतें व तें प्राप्तिकरमुक्त असतें.

## राष्ट्र संरक्षणासाठीं

## बचत करा

अल्पबचत संचालनालय, महाराष्ट्र शासन, सचिवालय, मुंबई ३२,




मी आता महिन्यातून दोन वेळा आपल्या घरीच मुक्काम करणार आहे.

यापूर्वी आपली केवळ गाठभेटच होत असे. एखाद्या जवळपासच्या फिरत्या वाचनालयातून आपण मला घरी नेत होता, १२ दिवस ठेवून परत करीत होतात.

मला हे जाणेयेणे मुळीच आवडत नव्हते. पण काय करणार ? माझी कमतच आपल्याला परवडत नव्हती. दोघांचाही नाइलाज होता.

आता मात्र तोहि प्रश्न सुटला आहे. पंचवीस पैसे काय ? जातायेता, हसत, आपण कुठेहि, कशासाठीहि खर्च करीत असता.

'मुक्काम' म्हटल्यावर घाबरू नका. हल्लीची जागेची अडचण माझ्या ध्यानात आहे. म्हणून मी आकारहि सुटसुटीत घेतला आहे. शेल्फवर, टेबलावर, ऑफिस बॅगमध्ये किंवा खिशातदेखील माझी सहज सोय होऊन जाईल.

माझे येण्याचे तीन मार्ग आहेत. फिरत्या वाचनालयातून तुम्ही मला चार आणे देऊन घरी नेऊ शकता किंवा कोपऱ्यावरच्या एखाद्या वृत्तपत्रविक्रेत्याकडून चार आण्यात खरेदी करू शकता. नाहीतर सर्वात सोपा उपाय आपल्या घरी वर्तमानपत्र टाकणाऱ्या मुलाला मला आणायला सांगा.

लक्षात ठेवा ! यापुढे माझे मूल्य केवळ पंचवीस पैसे !!

माणूस

MANOOS (Fortnightly) : 15 Mar. 1965 : 25 Paise : Regd NO. B 9304


# स्वस्तिकचा माल आता निर्यातही होऊ लागला

'स्वस्तिक'ची काही 'विशेष' उत्पादने

गम बूटस्

卐

प्रेशर होजेस

卐

वॉटर होज पाईप्स्

卐

ग्लोव्हज

卐

इरेझर्स

卐

ऑईल सील्स

देशाच्या संरक्षणाच्या कामी उपयोगी
पडणाऱ्या वस्तूंचे प्रमुख उत्पादक

## स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि.

स्वस्तिक गृह, खडकी, पुणे ३.

फोन : ५५२०१-२-३


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**